
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. 9438

# सतसमागम

भ. श्री. पंडित



REFBK-0011563

३६४९३
सं.शा
१३।११।७८
निबंध
१५३८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम ........ वि. निबंध
क्र. २५३८ ........ नों. दि. ........

# सन्तसमागम

[ सन्तसाहित्यविषयक नव स्फुट लेखांचा संग्रह ]

लेखक
भवानीशंकर श्रीधर पंडित

दा. क्र. ११५६३

नाग-विदर्भ
प्रकाशन
अमरावती

REFBK-0011563

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

मूल्य रुपये तीन नवे पैसे पन्नास केवळ

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथम आवृत्ति: जुलै १९६१

प्रकाशक
पुं. ना. देशमुख
नागविदर्भ प्रकाशन
अमरावती

मुद्रक
मोहनलाल भट्ट
राष्ट्रभाषा प्रेस
वर्धा

ती. अंबूवहिनी पराडकर

यांस

भक्तिभावपूर्वक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ कों दि ..................

## आरंभीचे चार शब्द

* * * * * * * * * * * * * * * * * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९९५२३

इतुकें दे मजला। दे मजला
मागतसे हरि ! तुजला
सन्तसमागम, अर्चा,
सारासारज्ञानचर्चा.

—*शिवदिनकेसरी*

सन्तसाहित्य हा चिरकालीन चर्चेचा आणि सनातन संशोधनाचा विषय आहे. परंतु प्रस्तुत सन्तसाहित्यविषयक नव लेख सादर करतांना माझी भूमिका संशोधकाची नाहीं हें मी आधींच सांगून टाकतों. मी सन्त साहित्याचा एक विनम्र विद्यार्थी आहे. त्या संजीवक साहित्याचें परिशीलन करतांना ज्या विशेष ज्ञातव्य अशा गोष्टी माझ्या लक्षांत आशा त्या मीं प्रस्तुत पुस्तकांतील स्फुट लेखांत संकलित करण्याचा यथामति यथाशक्ति प्रयत्न केला आहे.

सन्तसाहित्य हें भारतांतील सर्व भाषांना समान आहे. त्यामुळें एका भाषिकानें आपल्या भाषेंतील सन्तसाहित्याचा अभ्यास करतांना अन्य भाषांतील सन्तसाहित्याचा तौलनिक विचार करणें आवश्यक आहे. त्याशिवाय त्याच्या भाषेंतील सन्तसाहित्याची संगति व्यवस्थित लागणार नाहीं. कित्येकदां अज्ञात माहितीच्या दृष्टीनेंहि अन्य भाषांतील सन्तसाहित्याची महती विशेष असते. या संबंधीं मी स्वतःचा अनुभव सांगतों. प्रस्तुत संग्रहांतील कांहीं लेख मीं सुमारें वीस-पंचवीस वर्षांपूर्वीं लिहिले आहेत. एकदां एम्. ए. च्या विद्यार्थ्यांना महिपतींचा 'भक्तविजय' हा ग्रन्थ शिकवीत असतांना त्यास आधारभूत असलेल्या 'भक्तमाल' या हिन्दी ग्रंथाकडे माझें लक्ष वेधलें गेलें. हा ग्रंथ नाभाजीनें लिहिला असून त्यावर प्रियादासानें 'भक्तिरसबोधिनी' ही

टीका रचली आहे. तो सटीक हिन्दी ग्रंथ वाचल्यावर महिपतींना त्या ग्रंथाचें यथार्थ ज्ञान कसें नव्हतें तें माझ्या ध्यानांत आलें. तेव्हां आचार्य रामचन्द्र शुक्ल, मिश्र-बंधु प्रभृति हिन्दी साहित्यसमीक्षकांच्या समीक्षकांचें अवलोकन, अध्ययन व मनन करून मी या संग्रहांतील पहिल्या तीन क्रमांकांचे लेख लिहिले आणि ते लिहून होतांच अभ्यासकांच्या दृष्टीस पडावे म्हणून तत्कालीन प्रसिद्ध नियतकालिकांत प्रसिद्ध केले. अभ्यासकांना त्यांचा कितपत उपयोग पडला हें मात्र मला ठाऊक नाहीं.

गत वर्षी अखिल भारतीय नभोवाणीवर पु. मं. लाड व्याख्यानमाला गुंफण्याकरितां सुविख्यात कन्नड कवि श्री० दत्तोपंत बेंद्रे हे नागपुरास आले होते. त्यांनीं श्री ज्ञानेश्वरीच्या अध्ययनासाठीं कानडी भाषेच्या व वाङमयाच्या अभ्यासाची किती आवश्यकता आहे तें आपल्या भाषणांत नीट पटवून दिलें होतें. कर्नाटकांतील मध्वसंप्रदाय पंढरपुरच्या वारकरी संप्रदायाला कसा जवळचा आहे आणि या दोन्ही संप्रदायांतील भक्ति वात्सल्य भावावर आधारलेली असल्यामुळें त्यांचे संबंध किती जिव्हाळ्याचे आहेत याचेंहि त्यांनीं जितकें भावपूर्ण तितकेंच युक्तिसंगत प्रतिपादन केलें होतें. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं संत साहित्याच्या विचिकित्सेच्या बाबतींत आम्ही महाराष्ट्रीय अभ्यासक अद्यापि राजवाडे, भावे, पांगारकर, भिडे, आजगांवकर, फाटक, रानडे व दांडेकर यांनीं पुरविलेल्या साधन सामुग्रीवरच विसंबून कसाबसा निर्वाह चालवीत आहों. त्यामुळें आमच्या सन्तसाहित्यसमालोचनांत चर्वितचर्वण अधिक आढळतें.

या संग्रहांत एक लेख एकनाथांवर व दुसरा तुकारामांवर आहे. एकनाथांच्या वाङमयाचा अभ्यास करतांना मुसलमानांच्या सूफी पंथांतील साधूंच्या तत्त्वज्ञानाची व तुकारामांच्या गाथेचें अध्ययन करतांना कबीरपंथी अवलियांच्या शिकवणुकीची माहिती असणें आवश्यक आहे. तसा अल्प प्रयत्न मीं त्या लेखांत केला आहे. या लेखांच्या जोडीला कवयत्रींच्या परंपरेवर एक लेख आहे. त्यांत कवयत्रींच्या परंपरा खंडित कां या प्रश्नाची मीमांसा केली आहे. मात्र या लेखांत प्राचीन कवयित्रींबरोबर मध्ययुगांतील अज्ञात

कवयित्री आणि अर्वाचीन ज्ञात कवयित्री यांच्याहि कवित्वाचा ओझरता परामर्श घेतला आहे.

ओवी हा संतांचा अनादि असा आवडता छंद आहे. तेव्हां तिच्या विकासाचा व नियमनाचा ज्यांत विचार केला आहे त्या लेखाला या संग्रहांत स्थान मिळावें हें योग्यच आहे. या लेखापुढें रघुनाथ पंडित--स्थळ, काळ आणि व्यक्ति' हा लेख आहे. रघुनाथ हा एक पंडितकवि होता. तेव्हां त्याची गणना सन्त कवींत करण्याचें कारण नाहीं हें खरें आहे. परंतु तो सन्त नसला, तरी भक्त होता. त्याच्या 'दमयन्ती स्वयंवरां' त जागोजागीं 'रघुनाथ' असे त्याच्या स्वतःच्या व देवाच्या नामाचे निर्देश आहेत; आणि म्हणून त्याच्यावरील लेखाला प्रस्तुत पुस्तकांत स्थान दिलें आहे. या संग्रहांतील शेवटचा लेख 'चंडिदास व विद्यापति' या बंगाली सन्तासंबंधीं आहे. 'सब सन्तनकी जय' या आपल्या थोर परंपरागत न्यायानुसार प्रस्तुत पुस्तकांत त्याचा बुद्धिपुरस्सर समावेश केला आहे.

या संग्रहांतील एकनाथावरला लेख हा भाषणाच्या स्वरूपाचा आहे. तो जेव्हां 'समाधानां' त प्रसिद्ध झाला होता, तेव्हां त्या पत्राचे संपादक प्रा० श्री. ना. बनहट्टी यांनीं लिहिलें होतें;--"येथील सीताबर्डीवरील श्री० जगन्नाथराव जोशी व त्यांचे बंधु नाथषष्ठीचा उत्सव मोठ्या आस्थेनें व भक्तीनें साजरा करीत असतात. त्यांत त्यांनीं प्रा० पंडित याच्या व्याख्यानाचा योग जमवून आणला होता. भोजनप्रसादापेक्षां हा प्रसाद श्रोत्यांना अधिक आवडला." या माझ्या व्याख्यानाला उत्तर देणारा एक लेख येथील एक सद्‌गृहस्थ श्री. सरंजामे यांनीं लिहिला होता. माझ्या व्याख्यानानें त्यांना उत्तर देण्याची स्फूर्ति व्हावी हीच मी माझ्या भाषणाची यशस्विता समजतो. 'सह्याद्रि' मासिकाला दहा वर्षें पूर्ण झाल्यावर त्यांत दहा वर्षांतील उत्कृष्ट लेखांची सूचि प्रसिद्ध झाली होती. त्या सूचींत कै. न. चिं. केळकर यांनीं 'ओवीचा विकास व नियमन' या माझ्या लेखाचा समावेश केला आहे. तेव्हां त्या लेखासंबंधीं मी निराळें लिहिण्याचें कारण दिसत नाहीं. हा लेख वाचून मार्च १९३७ च्या 'सह्याद्रीं' त वि. ज. सहस्रबुद्धे यांनीं 'अभंगाचा छंद

कोणता ? ' हा लेख लिहिला होता; आणि ऑगस्ट व सप्टेंबर १९३७ च्या 'सह्याद्रीं' त श्री० अ. का. प्रियोळकर यांनीं 'ओवी, अभंग व दिंडी हे छंद अस्सल मराठी कीं कानडी ? ' हा लेख लिहिला होता. यावरून हा किती गाजला होता हें कुणाच्याहि निदर्शनास येईल. श्री. प्रियोळकरांसारख्या प्रथम प्रतीच्या संशोधकानें माझ्या या लेखाचा आणि 'रघुनाथ पंडित—स्थळ, काळ व व्यक्ति' या लेखाचा विस्तारानें परामर्श घ्यावा हें मी माझें अहोभाग्य मानतों. अगदीं अलीकडे उज्जयिनी येथील पुरातत्त्व विभागाचे संचालक श्री. कात्रे यांनीं रघुनाथ पंडितावर इंग्रजींत एक प्रबंध लिहिला आहे. त्यामुळें रघुनाथ पंडितावरील माझ्या लेखाचे व त्याच्या प्रसिद्धिकाळीं 'प्रतिभें' त प्रसिद्ध झालेल्या अन्य लेखांचें महत्त्व फारसें राहिलें नाहीं हें खरें आहे. परंतु पुढील अभ्यासकांपुढें मागील सर्व साधनसामुग्री असल्यास त्यांचें कार्य अधिक सुकर व सुखकर होतें म्हणून मीं तो लेख बुद्ध्याच या संग्रहांत समाविष्ट केला आहे.

'चंडीदास व विद्यापति' हा लेख मीं लिहिला, तो लिहिण्यास एक अगदीं वेगळें कारण घडलें. धनतोलींत आमच्या बंगल्याशेजारीं श्रीरामकृष्ण मिशन आहे. या मिशनला ज्यांनीं आपला कष्टार्जित प्लॉट दिला, ते कै. आनंद मोहन चौधरी हे तुकाराम व रामदास यांच्या वाङमयाचें मोठे अभिमानी व व निष्ठावन्त उपासक होते. ते अनेकदां समर्थप्रताप, समर्थांचा लीलानुग्रह, समर्थसंजीवनी, तुकोबांचा गाथा इत्यादि ग्रंथ घेऊन माझ्याकडे येत आणि त्यांचा अर्थ समजावून घेत. ते म्हणत;—"आमचे बंगाली सन्त शृंगारी आहेत. त्यांच्या साहित्यांत महाराष्ट्रीय सन्ताच्या साहित्यांतील भक्ति, ज्ञान आणि वैराग्य यांचें दर्शन होत नाहीं." तरी देखील त्यांच्या मागें लागून मी त्यांच्याकडून बंगाली संतांचीं वचनें व भजनें म्हणवून घेत असे. त्यांच्या सहवासाचें चिन्ह म्हणून मी त्या काळीं हा लेख लिहिला होता. तो केवळ परिचायक स्वरूपाचा आहे. महाराष्ट्रीय सन्तांच्या वाणींत वात्सल्याचा भक्तिभाव आहे, तर वंगदेशीय संतांच्या वाणींत मधुराभक्तीच्या भावनेचा सन्निवेश आहे.

आपल्याकडे प्रतिवर्षी पुष्कळसें अभ्यसनीय उपयुक्त समीक्षणात्मक साहित्य निर्माण होत असतें. परंतु तें नियतकालिकांच्या रद्दींत दडून राहतें. काळाच्या ओघांत तें नष्ट होतें आणि अभ्यासकांनाहि त्याचा विसर पडतो. अशा प्रकारच्या साहित्याचे भोक्तेहि मोजके असतात. त्यामुळें नियतकालिकांचे संपादक त्याला स्थान देण्यास तयार नसतात व प्रकाशक तें प्रकाशांत आणण्यास मागेंपुढें पाहात असतात. माझ्या पूर्वजांच्या पुण्याईनें या सर्व लेखांना सह्याद्रि, महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका, युगवाणी, नवभारत, प्रतिभा समाधान आणि कला या नियतकालिकांच्या संपादकांनीं आपलेपणानें प्रसिद्धि दिली याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहें. आणि आज माझे मित्र अमरावती येथील नागविदर्भ प्रकाशनाचे संचालक श्री. देशमुख हे त्यांना पुस्तकरूपानें प्रसिद्ध करीत आहेत याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. यांत माझें स्वतःचें असें कांहींहि नाहीं.

**फोडिलें भांडार। धन्याचा हा माल। मी हा तो हमाल। भारवाही**

**——भवानीशंकर श्रीधर पंडित**

श्रीधरसदन—श्रद्धानंदनगर
दक्षिण अंबाझरी मार्ग,
नागपूर–अजनी
बुधवार, घटस्थापना, आश्विन शु. १.
शके १८८२, २१-९-१९६०

# अनुक्रमणिका


१ महीपति व नाभाजी आणि प्रियादास १

२ भक्तमालेमधील महाराष्ट्रीय सन्त ९

३ सन्त सेनाजी १८

४ एकनाथांचें चरित्र व कार्य : एक नवी दृष्टि २५

५ तुकाराम व कबीर ३४

६ कवयित्रींची परंपरा ५३

७ ओवीचा विकास आणि नियमन ६७

८ रघुनाथ पंडित : स्थळ, काळ व व्यक्ति ८७

९ चंडीदास व विद्यापति १०६

# सन्त समागम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ........................ वि: ...........
क्रमांक ........................ नों दि ...........

१

# महीपति व नाभाजी आणि प्रियादास

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०५७

## महीपतीचे चरित्र ग्रंथ :

संतचरित्रें रचण्याचा प्रघात महाराष्ट्रांत प्राचीन कालापासून असला तरी तो लोकप्रिय करण्याचें श्रेय महीपतीकडे जातें. महीपतीपूर्वी उद्धव चिद्घन व दासो दिगंबर आणि नंतर भीमस्वामी, राजाराम प्रासादी व नरहरि धुंडिराज मालु हे चरित्रकार होऊन गेले. पण या सर्वांत आज महीपतीच विख्यात आहे. महीपति हा मोठा साक्षेपी चरित्रकार असून त्याने आपली चरित्रविषयक माहिती परिश्रमपूर्वक मिळविली होती असें म्हणतात; परंतु वस्तुतः चिकित्सेच्या अभावामुळे व आधारभूत ग्रंथाच्या अंधानुकरणामुळें त्याचीं चरित्रें ऐतिहासदृष्टचा विशेष उपयुक्त नाहीत. शिवाय आधारभूत ग्रंथाविषयीची त्याची माहितीहि चुकीची आहे. त्याचा आधारभूत ग्रंथ 'भक्तमाल' हा नाभाजीने लिहिला असून त्यावर भक्तिरसबोधिनी ही प्रियादासाची टीका आहे. वस्तुस्थिति अशी असतांना मूळ ग्रंथ प्रियादासाने संस्कृतांत लिहिला असून त्याचें नाभाजीने ग्वाल्हेरी भाषेंत भाषांतर केलें आहे अशी माहिती महीपति देतो. महीपतीने ही भूल कशी केली असावी तें या लेखांत पुढें पाहूं.

महीपतीने भक्तविजय, संतलीलामृत, भक्तलीलामृत व संतविजय असे एकंदर चार चरित्रात्मक ग्रंथ रचले आहेत. त्यांत भक्तविजय हा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ रचतांना महीपतीने नाभाजीचा भक्तमाल व उद्धव

चिद्घनाचा चरित्रसंभार आपल्यासमोर ठेवला होता. त्याच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे :—

म्हणाल निजबुद्धीने त्वरित। आपुलें मतीनें रचिला ग्रंथ।
तरी तैसे नव्हे जो निश्चित। विकल्प चित्तीं न धरावा।
तरी उत्तरदेशीं साचार। नाभाजी विरिंचि अवतार।
तेणें संतचरित्र ग्रंथ थोर। ग्वाल्हेरी भाषेंत लिहींला असे।
आणि मानदेशीं उद्धव चिद्घन। त्यांहीं चरित्रें वर्णिली जाण।
दोहोंचें संमत एक करून। भक्तविजय आरंभिला।

(अ. १, ओ. ३७–६९)

ग्वाल्हेरदेशीं अति उत्तम। नाभाजी नागर ब्राह्मण।
जो वैष्णवांमाजी शिरोमण। अवतार पूर्ण विधीचा।
भक्तचरित्र अति अद्भुत। त्याणें वर्णिलें यथार्थ।
त्याचीं पदें पाहूनि निश्चित। ग्रंथ महाराष्ट्र लिहीला।

(अ. २, ओ. ४८–४९)

यावरून महीपतीने नाभाजीचा भक्तमाल हा 'अति अद्भुत' ग्रंथ पाहिला होता हें स्पष्ट आहे ; व संतांच्या अद्भुत आख्यायिकांचें वर्णन करण्यांत त्याने त्याचें आंधळें अनुकरणहि केलें आहे. परंतु तो समग्र ग्रंथ त्यास नीट समजला होता असें दिसत नाहीं. कारण नाभाजीस तो नागर ब्राह्मण व त्याच्या भाषेस ग्वाल्हेरी भाषा म्हणतो. पण हें बरोबर नाहीं. मात्र अुद्धव चिद्घनासंबंधी 'त्याहीं चरित्रें वर्णिलीं जाण' असा जो उल्लेख आहे तो लक्षांत घेण्यायोग्य आहे. कारण उद्धव चिद्घनाने संतचरित्रात्मक एखादा संपूर्ण ग्रंथ लिहिला किंवा नुसतीं सुटीं चरित्रें लिहिलीं याविषयी वाद आहे. ( महाराष्ट्रसारस्वत भाग २, पृ. १९०—१९१ पाहा.) या उल्लेखावरून यानें सुटीं चरित्रेंच लिहिलीं असावीं असें म्हणण्यास जागा आहे.

**नारायणदास उर्फ नाभाजी :**

आपल्याकडे ज्याप्रमाणे महीपति आदि संतचरित्रकार होऊन गेले त्याप्रमाणे हिंदींत नाभाजी व ध्रुवदास हे दोघे संतचरित्रकार झाले. त्यांत

नाभाजी विशेष विख्यात आहे. नाभाजीची ख्याति फक्त हिंदी प्रांतांतच नव्हे तर त्या बाहेरहि आहे. पं. रामचंद्र शुक्ल यांनीं आपल्या 'हिंदी भाषा का इतिहास' या पुस्तकांत नाभाजी व त्याचा टीकाकार प्रियादास यांची सविस्तर माहिती दिली आहे. नाभाजी हा संवत् १६५७ च्या सुमारास विद्यमान होता. आपल्या भक्तमाल ग्रंथांत तुलसीदासांची स्तुति करतांना त्याने वर्तमानकालीन प्रयोग केला आहे. त्यावरून तो गोस्वामी तुलसीदासांचा समकालीन होता हें उघड आहे. त्यांच्या पश्चात्‌हि तो अनेक वर्षें हयात होता. नाभाजीचें खरें नांव नारायणदास होतें. पण आज तो नाभाजी व नाभादास या नांवांनीच प्रसिद्ध आहे. त्याच्या जातीसंबंधीं मतभेद आहेत. त्याच्या भक्तमाल ग्रंथावर ज्या दोन तीन टीका आहेत त्यांत कांहींनी त्याचा डोंब म्हणून तर काहींनी क्षत्रिय म्हणून निर्देश केला आहे. त्याचा प्रसिद्ध टीकाकार प्रियादास त्यास हनुमानवंशी म्हणतो. मारवाडी भाषेंत हनुमानवंशी हा प्रयोग डोंबासंबंधी योजतात. त्यावरून तो डोंब असावा असा कांहींचा कयास आहे. नाभाजीच्या गुरूचें नांव अग्रदास. कील्हदास हा त्याचा आणखी एक गुरु होता. अग्रदास हा जयपूर राज्यांतील गलता या ठिकाणचा राहणारा. हा प्रथम वल्लभाचार्यांच्या परंपरेंतील होता; परंतु पुढें याने रामाचीं उपासना चालविली. तेव्हा नाभाजी हा आपल्या गुरुप्रमाणेच रामोपासक होता हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. व्रज व अवधी या दोन भाषांवर नाभाजीचें सारखेंच प्रभुत्व होतें. भक्तमाल या ग्रंथाशिवाय त्याने दोन अष्टयाम रचले असून, त्यापैकीं जो गद्यबद्ध आहे तो व्रज भाषेंत आहे व जो पद्यबद्ध आहे तो अवधी भाषेंत आहे. या दोन्ही ग्रंथांत रामाची आराधना आहे. याशिवाय त्याचा रामभक्तीवर एक पदसंग्रहहि उपलब्ध आहे. यावरून महीपतीस नाभाजीसंबंधी अचूक माहिती नव्हती हें स्पष्ट आहे.

**नाभाजीचा भक्तमाल ग्रंथ :**

नाभाजीचा भक्तमाल हा संतांच्या सुरस व चमत्कारिक आख्यायिकांचा ग्रंथ जुन्या भाविक मंडळींत फार प्रिय आहे. बाबू राधाकृष्णदास यांच्या

मतानुसार तो संवत् १६४२ ते ८० च्या दरम्यान केव्हा तरी रचण्यांत आला असावा. तो रचतांना नाभाजीने सांप्रदायिक क्षुद्र बुद्धि आड येऊं दिलेली नाही. त्याने भिन्न भिन्न पंथांच्या व मतांच्या संतांकडे सारख्याच आदराने व उदारतेनें पाहिलें आहे. या ग्रंथांत एकंदर १९८ छप्पय ( षट्पद्या ) असून अदमासें २०० संतांच्या चमत्कारांचें स्तुतियक्त वर्णन आहे. तें करतांना साहजिकच नाभाजीनें सर्व भर भाविकतेवर दिला आहे; त्यांत चिकित्सेचा अंशहि नाहीं. या ग्रंथांत बहुतेक सर्व प्रसिद्ध संतांच्या आख्यायिका अंतर्भूत झाल्या आहेत. त्यांत आपल्याकडील नामदेव व ज्ञानदेव या ज्येष्ठ व श्रेष्ठ संतांच्या आख्यायिकाहि समाविष्ट झाल्या आहेत. नाभाजीने चमत्कारांचें वर्णन करतांना सामान्यतः एका संताला एक छप्पय अशी वांटणी केली आहे. परंतु क्वचित् एकाच संताच्या वांटयाला अनेक छप्पय आले असून, क्वचित् अनेक संतांच्या वांटयाला एकच छप्पय आला आहे. संत जितका थोर तितका त्याचा चमत्कारवृत्तान्त विस्तृत व त्यासाठी जास्त छप्पय अशी साधारण योजना आहे. हे चमत्कारवृत्तान्त सूत्रबद्ध असल्यामुळे त्यांचा अर्थ लावणें कठीण पडतें. शिवाय यांत संतचरित्राचा अंश जवळजवळ शून्य प्रमाणांत असून कोठेहि शक-संवताचा उल्लेख नाहीं. निव्वळ भक्तिमाहात्म्यसूचक अद्‌भुत कथांचे उडते उल्लेख आहेत. तेव्हा या कथांना ऐतिहासिक चरित्र म्हणून कितपत महत्त्व द्यावें हा एक विचारणीय प्रश्न आहे.

**प्रियादास :**

नाभाजीच्या सूत्रबद्ध रचनेमुळें उत्पन्न होणारें अर्थकाठिन्य प्रियादासानें भक्तिरसबोधिनी या नांवाची टीका लिहून दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्याच्या ठिकाणींहि चिकित्सेचा संपूर्ण अभाव असून त्यानें मुळांतील अद्‌भुत कथांत आणखी अद्‌भुत दंतकथांची भर टाकली आहे. प्रियादासाविषयीं महीपति जी माहिती देतो ती अशी:—

प्रियादास नागरब्राह्मण । परम भाविक वैष्णवजन ।
भक्ति ज्ञान वैराग्य पूर्ण । त्याचे ठायीं जाण असती ।
कलियुगीं झाले विष्णुभक्त । त्यांचीं चरित्रें अति अद्‌भुत ।

त्यांचा ग्रंथ संस्कृत । प्रियादासें लिहिलासे ।
मूळींचा ग्रंथ संस्कृत जाण । प्रियादासें केलें वर्णन ।
त्यावरी नाभाजीने जाण । ग्वाल्हेर भाषेंत लिहिला ।
त्याचीं पद्यें एकोनी कानीं। ग्रंथ लिहीला महाराष्ट्रवाणी
जैसे दुधामाजी धारवणी । उदक थोडे घालती ।

[अ० ३, ओ० ३२०–२१ व ३३५–३६]

पण ही माहितीहि संपूर्ण बरोबर नाही. प्रियादास हा वैष्णव असून ज्ञानी होता ही या अवतरणांतील माहिती बरोबर आहे. कारण कृष्णभक्त हरिलाल हे आपले गुरु असून आपण वृंदावनवासी आहों या गोष्टीचा स्वतः प्रियादासाने आपल्या टीकेच्या अंतीं उल्लेख केला आहे. टीकेच्या आरंभीं त्याने निंबार्काचार्यास नमन केलें आहे. या वरून तो निंबार्क संप्रदायांतील असावा असें दिसतें. तो नागरब्राह्मण होता किंवा नाहीं हें कळावयास आज कांहीं मार्ग नाहीं ; परंतु त्याच्या टीकेंत बहुश्रुततेचा व रसिकतेचा जो मधुर मिलाफ झाला आहे. त्यावरून तो सुसंस्कृत ब्राह्मण असावा असा तर्क वाहतो. भक्तमालेवरील टीकेशिवाय त्यानें बुंदेलखंडी भाषेंत भागवत रचलें आहे.

## प्रियादासाची भक्तिरसबोधिनी टीका :

नाभादासाच्या मूळ भक्तमालेपेक्षा प्रियादासाची भक्तिरसबोधिनी टीका विस्तृत आहे. आज ज्यास भक्तमाल असें म्हणतात तो ग्रंथ या टीकेसहित ओळखला जातो. ही टीका संवत् १७६९ मध्ये तयार झाल्याचा स्वतः प्रियादासाचा उल्लेख आहे. म्हणजे मूळ ग्रंथांत व टीकेंत जवळ जवळ एक शतकाचें अंतर आहे. टीकेच्या आरंभीं आपण नाभादासाच्या आज्ञेवरून ती रचत असल्याचा प्रियादासाने खुलासा केला आहे. त्याचा अर्थ अितकाच कीं, त्याने नाभाजीच्या भक्तमालेकडून काव्यलेखनाची स्फूर्ति घेतली. प्रियादासाच्या या टीकेंत एकंदर ६२४ घनाक्षऱ्या आहेत. त्यांत त्याने शब्दार्थ न सांगतां मूळांत जी वर्णनें संक्षिप्त आहेत तीं सविस्तर कथन केलीं आहेत आणि अनेक स्थळीं स्वतःच्या पदरची नवीन व वैचित्र्यपूर्ण माहिती भरीस घातली आहे. येवढेंच नव्हे तर मूळावर भाष्य करतांना त्याने श्रृतिस्मृति

पुराणादि ग्रंथांतून व रामायण-भारत-भागवतादि काव्यांतून विपुल संस्कृत अवतरणें दिलीं आहेत. याशिवाय त्याने मधून मधून हिन्दी कवींच्या काव्यांतील उत्कृष्ट वेंचे दाखल केले आहेत व क्वचित् कांहीं गोष्टींचें व्रज भाषेंत स्पष्टीकरण केलें आहे. त्यामुळें भक्तमालेपेक्षा ही भक्तिरसबोधिनी टीकाच अधिक सरस उतरली आहे. किंबहुना टीकेमुळेंच मूळास शोभा येऊन भक्तमाल-सटीक हा ग्रंथ आजमितीस आपलें लोकप्रियत्व कायम टिकवून राहिला आहे.

## महीपतीची भूल व तिचें निराकरण :

महीपति म्हणतो त्याप्रमाणे त्याने स्वतः हा सटीक ग्रंथ पाहिला होता यांत संशय नाहीं. परंतु त्याने तो 'निश्चित' म्हणजे 'सावध' पाहिला होता असें दिसत नाहीं. किंबहुना 'त्याचीं पद्यें अैकोनी कानीं' येवढाच त्याचा या ग्रंथांशीं परिचय होता असें वाटतें. कारण वरील अवतरणांतील तिसऱ्या ओवींत 'मूळ ग्रंथ संस्कृतांत प्रियादासाने लिहिला असून पुढें तो नाभाजीनें ग्वाल्हेर भाषेंत लिहिला' असें जें तो सांगतो, तें अुघड अुघड चूक आहे. त्याची अशी ही भूल होण्याचें कारण त्याने भक्तमालसटीक हा ग्रंथ प्रत्यक्ष पाहिला असला तरी अपरिचित भाषेमुळें त्याला तो नीट समजला नसावा, आणि त्यांतील संस्कृत अवतरणें पाहून 'प्रियादासाने तो संस्कृतांत लिहिला व नंतर नाभाजीने प्राकृतांत लिहीला' असा त्याचा गैरसमज झाला असावा. संस्कृत अवतरणें पुराणांतील व प्राचीन काव्यांतील आहेत येवढें जरी त्यास कळलें असतें तरी त्याची अशी भूल झाली नसती. परंतु 'नेणें संकृतवाणी निश्चिती' (अ. १, ओ. १८) असा त्याने स्वतःच कबुली जबाब दिला आहे.

महीपतीचें 'त्याचीं पद्यें अैकोनी कानीं' हें प्रांजल निवेदन प्रमाणभूत धरल्यास हिंदी व मराठी या दोन्ही भाषा जाणणाऱ्या अेखाद्या दुभाष्या पुराणिकाच्या मुखाने त्याने हा ग्रंथ श्रवण केला असावा असें वाटतें. हा दुभाष्या बहुधा ग्वाल्हेरकडील महाराष्ट्रीय असावा. कारण महीपति हा महादजी शिंद्यांचा समकालीन होता. दिल्लीच्या बादशहाला महादजींचा वचक होता. महादजी कृष्णाचे परम उपासक व कवि होते. ते वर्षांतून कांहीं महिने मथुरा

वृंदावनास राहत. त्या सुमारास हा ग्रंथ मथुरा-ग्वाल्हेरकडून महाराष्ट्रांत आला असावा. महीपति नाभाजीच्या भाषेस ग्वाल्हेरी भाषा म्हणतो तें बहुधा हा ग्रंथ त्या प्रांतांतून आपल्याकडे आला म्हणून म्हणत असावा. वस्तुतः या ग्रंथांत अवधी व व्रजभाषा आहेत. ग्वाल्हेरी अशी स्वतंत्र भाषाच मुळीं अस्तित्वांत नाहीं. हा ग्रंथ मथुरा-ग्वाल्हेरकडचा, तेव्हां नाभाजी हा वैष्णव, व तिकडील कृष्णपूजकांत नागरब्राह्मणांचा भरणा फार, तेव्हां नाभाजी हा नागरब्राह्मण असा महीपतीचा विपरीत ग्रह झाला असावा.

## हे चरित्रग्रंथ कीं कथाग्रंथ ?

महीपतीने भक्तमालसटीक ग्रंथ पाहिला व अैकला असला तरी त्यांतून त्याने फक्त सतरा अठरा संतांचीच माहिती निवडली आहे. त्यांत जयदेव, कबीर, सेना, राकाबांका, नरसी मेहेता, मीरा, तुलसीदास अित्यादि संत अंतर्भूत होतात. नामदेव व ज्ञानदेव यांचे भक्तमालेंतील वृत्तान्त महीपतीला पटले नसावेत असें दिसतें. कारण भक्त विजयांत त्याने या दोघांची माहिती स्वतंत्र रीतीने दिली आहे. भक्तमालेंत नामदेव हे वामदेवाच्या विधवा मुलीचे पुत्र, ज्ञानदेव हे विष्णुस्वामिसंप्रदायी, नामदेव व त्रिलोचन हे ज्ञानदेवांचे शिष्य, सोपानदेव, महानदेव व ज्ञानदेव हे तिघे बंधु अित्यादि विलक्षण व निराधार माहिती आहे. ही माहिती आपल्याकडील माहितीशीं विसंगत आहे. तेव्हां महीपतीने तिच्यावर विश्वास ठेवला नाहीं ; परंतु साक्षात् श्रीरामांनी तुलसीदासाचें रामायण लिहिलें या अद्भुत कथेवर मात्र त्याचा विश्वास बसला (अ. ३, ओ. ३२२ पासून पुढे पाहा). नाभादास काय, प्रियादास काय, व महीपति काय सर्वच भाविक ! त्यांच्याकडून चिकित्सेची अपेक्षा व्यर्थ आहे. ते ज्या युगांत जन्मले त्या युगाची कल्पनाच अशी कीं, प्रत्येक संत, प्रत्येक कवि व प्रत्येक प्रचारक हा प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार. त्याच्या ठिकाणीं अद्भुत कृत्य करण्याचें नैसर्गिक सामर्थ्य असतें. सर्वसामान्य मनुष्यापेक्षां तो निराळ्या

कोटींतला असतो. तेव्हां त्याच्या लौकिक चरित्रांत फारसें खोल न शिरतां ज्या सुरस व चमत्कारिक आख्यायिका प्रचलित असतील त्यांचीच मुक्तकंठाने स्तुति करावी. तोच मोक्षाचा सरळ व सोपा मार्ग आहे. सारांश, भक्तमाल व भक्तविजय यांसारख्या ग्रंथांना चरित्रग्रंथ म्हणून कितपत मानावे हा चिकित्सक बुद्धीला अेक प्रश्न आहे.

म. सा. पत्रिका आक्टोबर १९४२

● ● ●

# २

# भक्तमालेमधील महाराष्ट्रीय संत

मागील लेखांत नाभाजींच्या भक्तमालेची व प्रियादासांच्या तिच्यावरल्या भक्तिरसबोधिनी टीकेची सविस्तर माहिती दिली होती. प्रस्तुत लेखांत ज्ञानदेव, नामदेव आणि बिल्वमंगल या तिघा महाराष्ट्रीय संतांची भक्तमालेंत अंतर्गत असलेली माहिती देण्याचा आणि आपल्या संतसाहित्याच्या संशोधनास ती कशी उपयुक्त आहे हें दाखविण्याचा मनोदय आहे. यापैकीं पहिली दोन नांवें सर्वांच्या परिचयाचीं आहेत. तिसरें नांव महाराष्ट्रांत परिचित व प्रचलित नाहीं. परंतु चैत्र शके १८२८ च्या सरस्वती मंदिर मासिकांतील 'नाभाजी महापति वर्णित हिंदुस्थानी व महाराष्ट्री संत' या आपल्या लेखांत इतिहासाचार्य राजवाडे हे बिल्वमंगल हा महाराष्ट्रीय असल्याचें सांगतात. बिल्वमंगल म्हणजेच आपला पुंडलिक, कारण या दोघांचा जीवन वृत्तांत एकसारखा आहे असें ते म्हणतात. मात्र आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ ते भरभक्कम पुरावा पुढे करीत नाहींत. तेव्हां तोहि महाराष्ट्रीय असावा असें मानून प्रस्तुत ठिकाणीं त्याचीहि माहिती जमेस धरली आहे.

भारताच्या निरनिराळ्या प्रांतांतील साहित्याच्या इतिहासांकडे पाहिलें तर एक गोष्ट स्पष्ट दिसते. ती हीं की त्या सर्वांना संतसाहित्याचें युग हें समान आहे. अनेक संत हे कवीहि होते. त्यांपैकी जवळ जवळ दोनशे संतांची ओळख नाभाजींनी भक्तमालेच्या तीनशेंसोळा 'छप्पय्यां' त म्हणजेच षट्पद्यांत करून दिली आहे. महिपतींनी भक्तविजय सजवितांना हिंदी

भाषेंतील या ग्रंथाचा हवा तेवढा आधार घेतला आहे. बंगालींतहि या ग्रंथाचा अनुवाद आहे. हा ग्रंथ सूत्रबद्ध असल्यामुळें त्यावर प्रियादासांनी भक्ति-रसबोधिनी टीका रचली आहे. ही टीका मूळ ग्रंथानंतर जवळ जवळ शंभर वर्षांनी लिहिण्यांत आली आहे. तिच्यांत मूळांतील माहिती स्पष्ट करण्या-पेक्षा गोष्टीवेल्हाळपणा व पाल्हाळच अधिक आहे. त्यामुळें ती विशेष विचारांत घेण्याचें कारण नाही. परंतु मूळ ग्रंथाने मात्र नेमकी आवश्यक व बरीच विश्वसनीय अशी माहिती दिली आहे. तेव्हां ती विचारांत घेणें आवश्यक आहे. हिन्दी साहित्याचे सुप्रसिद्ध आलोचक मिश्र बंधु यांनी संवत् १६५७ हा नाभाजींचा आविर्भावकाल मानला आहे. तेव्हां ते अकबराच्या राज्यत्वकालांत विद्यमान होते असें दिसतें. आपले एकनाथ हे त्याच सुमारास झाले. म्हणूनच भक्तमालेंत एकनाथापूर्वींच्या फक्त तिघा महाराष्ट्रीय संतांची माहिती आली असावी.

भक्तमालेंत नाभाजींनी उपर्युक्त तिघा संतांची जी माहिती दिली आहे ती बरीच नवीन आहे. ज्ञानदेव दोन होते की एक ? ज्ञानदेव आणि नामदेव समकालीन होते किंवा नव्हते ? आणि ज्ञानेश्वरींतील प्रतिपादन वस्तुतः अद्वैत् सिद्धांताच्या पक्षाचें असून त्यांत भक्तिमताची किंचित छाया मात्र पडलेली आहे, असें असतांना तो ग्रंथ भक्तिमताचे कट्टर अभिमानी वैष्णवपंथी जे पंढरीच्या विठ्ठलाचे वारकरी त्यांना 'आई' म्हणून कसा मान्य व प्रिय झाला ? या आजपर्यंतच्या तीन्ही विवाद्य प्रश्नांवर थोडा फार ओझरता अंधुक प्रकाश पाडण्याच्या दृष्टीने ती उपयुक्त वाटण्याचाहि संभव आहे. संतसाहित्यासंबंधीं प्रत्यक्ष प्रमाणाने अधिकार वाणीने, व निर्णायक अभिनि-वेशाने लिहिणें अत्यंत कठीण आहे. कारण ते निर्माण होऊन सातशेंवर वर्षें झाल्यामुळें आणि मध्यंतरीच्या जुलूमजबरदस्तीच्या राजकीय परिवर्तनांमुळें त्याची समग्र साधन सामग्री उपलब्ध नाहीं; आणि जी कांहीं थोडी फार आहे आहे ती तुटपुंज्या स्वरूपाची, गुंतागुंतीची व विवाद्य आहे. तेव्हां संशोधकाला जेथे प्रमाण नसेल तेथे अनुमानाचा आधार घ्यावा लागतो, त्यास इलाज नाहीं.

भक्तमालेंत ज्ञानदेवांवर नाभाजींचा जो छप्पय आहे तो असा:—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रो वि: ..........


विष्णुस्वामी संप्रदाय दृढ ज्ञानदेव गंभीर मति ॥
नामदेव, त्रिलोचन शिष्य सूर शशि सदृश उजागर
गिरा गंग उनहारि, काव्य रचना प्रेमाकर ॥
आचारज हरिदास अतुलबल आनंददायन
तेहि मारग वल्लभ बिहित पृथुपधतिपरायन ॥
नवधा प्रधान सेवा सदृढ मनवचक्रम हरिचरनरति
विष्णुस्वामी संप्रदाय दृढज्ञान देव गंभीर मति ॥

( पहा भक्तमाला. सं. ज्वाला प्रसाद मिश्र. पृ. ३६३ )

या छप्पयांची भाषा सहज समजण्यासारखी सोपी असल्यामुळे मी प्रत्येक ओळीचा अर्थ देण्याच्या भानगडींत पडत नाही. मात्र त्यांत ज्ञानदेवांच्या चरित्रांशी संबंधित असणारे जे तीन निर्देश आहेत त्यांकडे चिकित्सकांचें लक्ष वेधूं इच्छितों.

नाभाजींच्या माहितीप्रमाणें ज्ञानदेव हे विष्णुस्वामी संप्रदायी होते, नामदेव व त्रिलोचन हे चंद्रसूर्यासारखे त्यांचे दोन तेजस्वी शिष्य होते आणि पुष्टिपद्धतीच्या भक्तीचे पुरस्कर्ते वल्लभाचार्य हे ज्ञानदेवांच्याच मार्गाचे अनुसरण करणारे होते. ही माहिती आपल्याकडे बरीचशी अनोळखी व अनोखी आहे. नाभाजींनी ती तत्कालीन परंपरागत माहितीच्या व जनश्रुतीच्या आधारावर दिली असावी हें उघड आहे. परंतु जनश्रुति ही अगदीच वाऱ्यावरली असते असें नाही. तिलाहि सत्याचा थोडाफार आधार असावा लागतो तेव्हा त्या दृष्टीने या निर्देशांची चिकित्सा होणें आवश्यक आहे.

प्रथम आपण नाभाजी ज्या विष्णुस्वामींचा उल्लेख करतात ते विष्णुस्वामी कोण होते आणि त्यांनी कोणता संप्रदाय स्थापन केला होता तें पाहूं. विष्णुस्वामीसंबंधी सविस्तर व एकत्र अशी माहिती मिळत नाही. निरनिराळ्या ग्रंथांत त्यांच्याविषयीं जी माहिती विखुरलेली आहे तीच पुढे संकलित करून देत आहें.

महाराष्ट्रांत आणि उत्तर भारतांत भक्तिमताचा व वैष्णव पंथाचा वारसा दाक्षिणात्य आचार्यांकडून आला आहे. विष्णुस्वामी हे त्या आचार्या-

पैकीच एक होते. रामानुज, मध्व आणि निंबार्क यांच्याप्रमाणेंच विष्णुस्वामींनी वैष्णवधर्माच्या प्रसारास साहाय्य केलें, आणि स्वत: एक स्वतंत्र संप्रदाय स्थापन करून भक्तिमताच्या प्रचारास हातभार लावला. या चौघा आचार्यांच्या मनांत किंचित् भिन्नता होती. रामानुज विशिष्टाद्वैती, मध्व द्वैती, निंबार्क द्वैताद्वैती आणि विष्णुस्वामी शुद्धाद्वैती होते. (पाहा. Encyclopaedia of Religion and Ethics. vol. XII Page 511.) परंतु मतभिन्नता असूनहि कांहीं बाबतींत या चौघांचें मतैक्य होतें. भक्तीच्या क्षेत्रांत जातीपातींचीं बंधनें नकोत. ब्राह्मण श्रेष्ठ असला, तरी शूद्रालाहि भक्तीचा अधिकार आहे. ब्रह्मनिरूपण अद्वैत वादाहून कांही बाबतींत अगदी निराळें आहे. गुरु हा ब्रह्माचा अंश असल्यामुळें तो ब्रह्माचा प्रतिनिधि आहे. त्याचा महिमा सर्वांपेक्षां अधिक व अगाध आहे. वैकुंठाची प्राप्ति करून घेणें हेंच भक्तीचें अंतिम उद्दिष्ट आहे. अशा प्रकारचीं या चौघांचीं जवळ जवळ सारखींच मतें होतीं. भक्तिमताच्या प्रचारासाठीं देशी भाषांच्या अवलंबनास या आचार्यांनी उत्तेजन दिलें.

विष्णुस्वामी हे आरंभीं मध्वाचार्यांचे अनुयायी होते. परंतु पुढे त्यांनी अद्वैतवाद हा मायारहित आहे असें मानून शुद्धाद्वैत मताचें प्रतिपादन केलें. विष्णुस्वामींनी कृष्णाला आराध्यदैवत मानलें आहे, आणि भक्तींत राधेला मुख्य स्थान दिलें आहे. निंबार्कांनीहि आपल्या संप्रदायांत राधेला मान व महत्त्व दिलें आहे. पंढरपुरचा विठु म्हणजे मूळचा विष्णु. तोच पुढे कान्हा कसा झाला आणि रखमाईच्या जोडीलाच त्याच्याजवळ 'राही' म्हणजे राधी ही कशी उभी राहिली या कोड्याचाहि यामुळे थोडा फार उलगडा होण्याजोगा आहे. विष्णुस्वामींनी गीता व वेदान्त सूत्रें यांवर भाष्यें लिहिलीं होतीं. पण तीं आज उपलब्ध नाहीत. त्यांनी शुद्धाद्वैतमतावर आपल्या विष्णुस्वामी-संप्रदायाची स्थापना केली होती. आरंभी त्रिवेंद्रम व त्रावणकोर हीं या संप्रदायाचीं केंद्रें होतीं. पुढें याच संप्रदायांत बिल्वमंगल या नांवाचा एक संत उदयास आला. याने 'कृष्णकर्णामृत' या नांवाचें एक गीतिकाव्य लिहिलें होतें. त्यांतील गाणीं गात गात हा गांवोगांवी हिंडला आणि अशा रीतीने त्याने

आपल्या संचारक्षेत्रांत विष्णुस्वामींच्या मताचा प्रचार केला. याच बिल्वमंगलाला इतिहासाचार्य राजवाडे हे पंढरीचा पुंडलिक म्हणतात. राजवाड्यांच्या म्हणण्यांत जर खरोखरच कांही तथ्य असेल तर नाभाजी सांगतात त्याप्रमाणें ज्ञानदेवांचा आणि विष्णुस्वामीसंप्रदायाचा संबंध जुळूं शकतो. भक्तमाल व भक्तिरसबोधिनी यांत बिल्वमंगलाची माहिती पुढीलप्रमाणें आहे :—

बिल्वमंगल हा आपल्या पूर्वायुष्यांत अत्यंत व्यसनी व दुराचारी असतो. तो आपल्या माता-पित्यांची अवहेलना करतो. चिंतामणी या नांवाच्या एका वेश्येच्या जाळ्यांत तो अडकलेला असतो. तिचा विरह त्याला सहन होत नाही. तिला भेटण्यासाठीं तो एकदा रात्रीं प्रेतालाच नाव समजून त्यावर आरूढ होतो आणि नदीच्या परतीरावर जातो. तिच्या रंगमहालाच्या माडीवरून खाली एक साप लोंबकळत असतो. बिल्वमंगल त्या सापालाच प्रेमाचा रज्जु समजतो आणि त्याच्या आधारें वरील मजल्यावर चढतो. पुढे त्याला उपरति होते आणि तो संन्यास घेतो. उत्तरभारतांत हीच कथा तुलसीदास व सूरदास यांच्या नांवावर अप्रबुद्ध समाजांत सांगण्यांत येते. ती अर्थातच अप्रामाणिक आहे. राजवाडे म्हणतात की या कथेचें पुंडलिकाच्या कथेशीं साम्य आहे; तेव्हा बिल्वमंगल म्हणजेच पुंडलिक होय. तो कृष्णा व वेणा यांच्या संगमावरील रहिवाशी होता अशी माहिती नाभाजी देतात. तेव्हां तो उत्तर भारतांतील नव्हता हें उघड आहे.

रामानुज, मध्व, निंबार्क व विष्णुस्वामी या चौघा मुख्य आचार्यांच्या मतांचा विचार केला म्हणजे असें दिसतें की रामानुजांनी भक्ति व ज्ञान यांच्या समुच्चयास महत्त्व दिलें आहे, तर विष्णुस्वामी, मध्व आणि निंबार्क यांनी ज्ञानापेक्षा भक्तीस अधिक महत्व दिलें आहे. रामानुजांचा भर आत्मचिंतनावर आहे आणि अन्य तिघांचा भर आत्मसमर्पणावर आहे. रामानुजांना विष्णूची म्हणजे नारायणाची भक्ति मान्य होती. पण बाकींच्या तिघांना श्रीकृष्ण-भक्ति हवी होती.

ज्ञानदेवांप्रमाणेंच पुष्टिपद्धतीच्या भक्तीचे पुरस्कर्ते वल्लभाचार्य यांचे वडीलहि विष्णुस्वामीच्या संप्रदायामधील होते. याचा परिणाम असा झाला

की वल्लभाचार्यांनी विष्णुस्वामींचें शुद्धाद्वैत मत उचललें आणि त्यावर आपल्या नव्या पुष्टिमार्गाच्या संप्रदायाची उभारणी केली. विष्णुस्वामींचाच आदर्श समोर ठेवून त्यांनी सर्वसाधारण जनांत कृष्णभक्तीचा प्रसार केला. विक्रमाच्या सतराव्या शतकांत विष्णुस्वामींचा जवळ जवळ नामशेष झालेला संप्रदाय हा वल्लभाचार्यांच्या नवीन संप्रदायांत विलीन झाला. त्यामुळें पुढे त्याचें नांव ऐकूं येईनासें झालें.

वल्लभाचार्यांच्या चिरंजीवाचें नांव विठ्ठलनाथ होतें. वल्लभाचार्य समाधिस्थ झाल्यावर नव्या संप्रदायाचें आचार्यपद त्यांच्याकडे आलें. त्यांनी कृष्णकाव्य लिहिणारे सूरदास नंददासादि आठ प्रमुख कवि घेऊन 'अष्ठछापा' ची स्थापना केली. विष्णुस्वामी व वल्लभाचार्य दाक्षिणात्य होते. पंढरपुरचा देव हा त्यांच्याकडून महाराष्ट्रांत आला आहे. त्याला 'कानडा' असें नांव आहे. त्याचें विठ्ठल हें नांव आणि वल्लभांच्या चिरंजीवांचें विठ्ठल हें नांव लक्षांत घेतलें की विष्णुस्वामींचा आणि ज्ञानदेवांचा कांहीतरी संबंध असावा अशी शंका मनास चाटून जाते.

विष्णुस्वामी हे ज्ञानदेवांपेक्षा तीस वर्षांनी वडील होते असें फरकुहार यांचें मत आहे. (पाहा,—An outline of Religious History in India--by J. N. Farquhar Page 238.) ज्ञानदेव हे विष्णुस्वामींच्या संप्रदायांतले. आणि शके १२१२ हा त्यांच्या भावार्थदीपिकेचा लेखनकाल. तेव्हा त्यावरून साहेबमजुकरांनीं हा कयास केला असावा.

महानुभावांचा पूज्य ग्रंथ 'लीळाचरित्र एकांक' यांत विष्णुस्वामीविषयीं दोन आख्यायिका आहेत. त्यावरून ते महानुभाव पंथाचे प्रस्थापक चक्रधर यांचे समकालीन होते असें दिसतें. ( पाहा;—लीळाचरित्र एकांक. संपादक, ह. ना. नेने. लीळा ४६ व ४७. ) यांपैकी पहिली लीळा अशी;—

गोविंदस्वामी हे विष्णुस्वामींचे शिष्य होते. ते चक्रधरांची भेट घेण्याचे टाळीत असत. पण एकदा योगायोगाने त्यांची व चक्रधरांची दृष्टादृष्ट झाली. ती होतांच गोविंदस्वामींची समाधि लागली. त्यामुळें त्यांनी चक्रधरांचें शिष्यत्व पत्करलें. विष्णुस्वामींना हें आवडलें नाही. त्यांनी गोविंदस्वामींचा

छळ आरंभिला. परंतु त्यांच्या स्वप्नांत क्रोधव्याप्त नृसिंह प्रकट झाले आणि त्यांनी त्यांना गोविंदस्वामींचा छळ न करण्याची समज दिली. तेव्हा विष्णुस्वामी आपल्या कृत्यापासून परावृत्त झाले. दुसरी लीळा अशी :—

विष्णुस्वामींना 'घुटिकासिद्धि' प्राप्त झालेली होती. ते तोंडांत पाण्याचा घुटका घेत व आकाशांत उंच उड्डाण करीत. मग ते लपून छपून दूरवर एकाद्या शिष्यांच्या घरीं जात आणि दाराआड उभे राहून त्याचें व त्याच्या पत्नीचें बोलणें ऐकत आणि दुसरे दिवशीं शिष्याला तेंच बोलणें यथातथ्य ऐकवून आश्चर्यचकित करून टाकत. एकदा शिंक आल्यामुळें त्यांच्या तोंडातलें पाणी बाहेर आलें आणि ते खालीं कोसळलें. सुदैवानें ते नदीच्या पाण्यांत पडले. दगडधोंड्यावर आदळले असते तर दगावले असते. चक्रधर व ज्ञानदेव यांचा आविर्भावकाल लक्षांत घेतला असतां विष्णुस्वामी त्यांचे समकालीन होते या विषयीं संशय राहात नाही. ज्ञानदेवांची योगसिद्धि व विष्णुस्वामी यांची योगसिद्धि यांचा मेळहि घालतां येण्याजोगा आहे. विष्णुस्वामीसंबंधीं चक्रधरांची जी 'वृत्ति' होती ती लक्षांत घेतली की विष्णुस्वामी संप्रदायांतील ज्ञानदेवाच्या वारकऱ्यांचा महानुभावांवर इतका रोष कां याचाहि उलगडा होतो.

श्री. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांच्या मध्ययुगीन चरित्रकोषांत विष्णुस्वामींसंबंधीं पुढील अर्थाची माहिती आहे :—

वल्लभाचार्यांनी आपल्या संप्रदायप्रदीप या ग्रंथांत विष्णुस्वामींची माहिती दिली आहे. ते एका ब्राह्मण प्रधानाचे पुत्र होते. 'साकार सिद्धि' ग्रंथांत त्यांनी शंकरमताचें खंडन केलें आहे. प्रारंभीं ते नृसिंहाचे उपासक होते. पण पुढे ते परमेश्वराच्या सच्चिदानंद स्वरूपाला मानूं लागले. त्यांनीं आपला स्वतंत्र संप्रदाय स्थापन करून थोडे दिवस झाले नाहीत तोंच त्यांना मृत्यु आला: त्यांच्या पश्चात् श्रीधर, ज्ञानदेव, बिल्वमंगल आदि शिष्य त्यांच्या गादीवर बसले. बिल्वमंगल हा या गादीवरील अंतिम आचार्य होय.

यांपैकी नृसिंहाच्या उपासनेची माहिती लीळाचरित्रांतील माहितीशीं जुळते. ज्ञानदेव हे जर खरोखरच या संप्रदायांतले असतील व बिल्वमंगल

हा राजवाडे म्हणतात त्या प्रमाणे जर खरोखरच पुंडलिक असेल, तर मग पंढरीचें माहात्म्य वाढविणाऱ्या पुंडलिकाने आपल्याच संप्रदायांतील ज्ञानदेवांच्या ग्रंथाचें महत्त्व मान्य करावें यांत कांही नवल नाही. ज्ञानदेवांच्या 'भावार्थदीपिके'—च्या प्रतिपादनाचा झोक जरी अद्वैताकडे झुकत असला, तरी नवव्या अध्यायांत त्यांनी आपलें भक्तिमत अतिशय सरसतेने प्रकट केलेंच आहे. तेव्हा भावार्थदीपिका रचणारे ज्ञानदेव आणि हरिपाठाचे भक्तियुक्त अभंग गाणारे ज्ञानदेव हे दोन नसून एकच असावेत असें वाटतें. बिल्वमंगलाच्या मृत्यूनंतर विष्णुस्वामीसंप्रदाय वल्लभांच्या संप्रदायांत मिसळून गेला. तेव्हा पुष्टिपद्धतीच्या भक्तीचे पुरस्कर्ते वल्लभ हे ज्ञानदेवांच्या मार्गाचें अनुसरण करणारे होत असें जें नाभाजी सांगतात तेंहि पटण्यासारखेंच आहे.

नाभाजींनी नामदेवासंबंधी जो छप्पय लिहिला आहे तो असा :—

**नामदेव प्रतिज्ञा निर्बही ज्यों त्रेता नरहरिदासकी ।।**
**बालदशा 'बीठल' पानी जाके पै पीयौ**
**मृतक गऊ जिवाय परचौ असुरनकौ दीयौ**
**सेज सलिल ते काढ़ि पहिल जैसी ही होती**
**देवल उलट्यो देखि सकुचि रहे सबही सोती**
**पंडुरनाथ कृत अनुग ज्यों छानि सुकर छाई घासकी**
**नामदेव प्रतिज्ञा निर्बही ज्यों त्रेता नरहरिदासकी ।।**

या छप्पयाचा अर्थ स्पष्ट आहे. तेव्हा तो देत नाही. यांत नामदेवांनी जे चमत्कार केले ते कथन केले आहेत. ते सारे चमत्कार महाराष्ट्रांत सर्वश्रुत आहेत. तेव्हा नाभाजींना अभिप्रेत असलेले नामदेव आपलेच महाराष्ट्रीय आहेत यांत शंका नाहीं. नामदेव हे ज्ञानदेवाचे शिष्य होते असें नाभाजी म्हणतात, आणि त्या दोघांनी बरोबर तीर्थयात्रा केली ही गोष्ट महाराष्ट्रांत सर्वतोमुखी आहे. तेव्हा ते दोघे समकालीन होते किंवा नव्हते हा वादच करण्याचें कारण उरत नाही. नाभाजींच्या म्हणण्याप्रमाणें त्रिलोचन हे ज्ञानदेवांचे दुसरे शिष्य होते. या त्रिलोचनांचें नांव महाराष्ट्रांत अगदींच माहीत नाही. An outline of the Religious Literature of India

या ग्रंथाचे लेखक J. N. Farquhar यांनीं आपल्या ग्रंथांत पृ. २९०–३०० वर त्रिलोचनासंबंधी पुढील टीप दिली आहे.

Another Maratha singer Trilochan by name, seems to have been a contempcrary of Namdev, but very little is known about him. Three of his Hindi hymns appear in Granth, but his Marathi hymns and even his memory seem to be lost to his native land.

साहेबमजुकरांचें हें विधान पूर्णतया बरोबर नाही. कारण महीपतींनी भक्तविजयाच्या शेवटच्या अध्यायांत त्रिलोचनाचा नामनिर्देश केला आहे, आणि मोरोपंतांनी 'सन्मणिमालेंतील नव्वदाव्या आर्येंत त्याचा उल्लेख केला आहे;—

**गावा त्रिलोचनाभिध अखिल शुभगुणार्थि कल्पनग, वाणी**
**हरिजनयशींच रमशिल तरि काय मना, सुखासि मग वाणी ?**

तेव्हा नाभाजी सांगतात त्याप्रमाणें नामदेव व त्रिलोचन हे दोघे ज्ञानदेवांचे शिष्य असणें शक्य आहे.

सारांश, ज्ञानेश्वरी लिहिणारे व अभंग गाणारे असे दोघे ज्ञानदेव होते कां ? ज्ञानदेव व नामदेव हे समकालीन होते किंवा नव्हते आणि ज्ञानेश्वरी हा ग्रंथ वैष्णवांना पूज्य कसा झाला ?—या तीन्ही विवाद्य प्रश्नांचा निरास करण्याच्या कामीं नाभाजींच्या माहितीचा थोडाफार उपयोग होईल अशी आशा आहे.

**—युगवाणी, जानेवारी १९५३**

● ● ●

# ३

# संत सेनाजी

## संतसाहित्य व संशोधन

आपणा भारतीयांत इतिहासलेखनाची पूर्वापार प्रथा नसल्यामुळे प्राचीन संतसाहित्य हा विद्वानांच्या वाङ्मयीन संशोधनाचा अेक कायमचा विषय होऊन बसला आहे. आपले संतकवि स्वतःसंबंधी फारशी वाच्यतां करीत नसल्यामळें आणि त्यांच्या विषयी अितरत्र आढळणारी माहिती प्रमाणभूत नसल्यामळें त्यांचें व्यक्तित्व, स्थलकाल व चरित्र यांविषयीं निश्चित व निश्चित लिहिणें मोठे दुर्घट झालें आहे. संतांचें लक्ष स्वोद्धाराकडे असे. त्यामुळे त्यांच्या साहित्यावरून त्या काळाविषयीचे कांहीं सामाजिक व राजकीय निष्कर्ष काढणेंहि अत्यंत बिकट आहे.

संतांच्या साहित्याच्या अभ्यासांतहि अनेक अडचणी आहेत. त्यांची साहित्यसामग्री संदिग्ध असून काळाच्या ओघांत तिच्यांत असंख्य अपपाठ व प्रक्षिप्त भाग घुसले आहेत. तिचे मूळ पाठ निश्चित करतांना प्राचीन हस्तलिखितांची अतिशय आवश्यकता भासते. परंतु प्राचीन व विश्वसनीय अशी हस्तलिखितें अत्यल्प प्रमाणांत उपलब्ध आहेत. संतांच्या ग्रांथिक साहित्यास ‘अथ’ व ‘अिति’ असल्यामळे त्यांच्या मूळ संहितेंत विशेष ढवळाढवळ झालेली नाही. परंतु अभंगासारख्या मौखिक, गेय व रचनेस सोप्या असणाऱ्या साहित्यांत मात्र न भूतो न भविष्यति अशा प्रकारचे फेरबदल झाले आहेत. शिवाय अभंगसाहित्य परंपरेने जनतेच्या नित्यपठनांत असल्यामुळे त्याच्या पाठांचें व भाषेचें आधुनिकीकरण झालें आहे.

'आपण बहुलग्नें करिती। विध्वा तैसिच ठेविती॥
तरुण विध्वा मनांत जळे। आपण छपरपलंगीं लोळे॥'

ह्या अभंग तुकाराममहाराजांच्या प्रासादिक वाणींतून बाहेर पडला असेल अशी कुणी कल्पना तरी करील का? परंतु 'संतवचनसुधा' या पुस्तकाच्या २४४ पृष्ठावर तो तुकोबांच्या नांवावर 'दडपश्चमे' करण्यांत आला आहे. (प्र. दामोदर सांवळाराम आणि मंडळी—सन १९१७). संतश्रेष्ठ नामदेव हे कबीर व नरसी मेहेता यांच्यापूर्वीं होऊन गेले हें

'जागे सुक, अुद्धव, अक्रुर, हणवंत जागे लैं लेंगूर।
संकर जागे, चरनसेवकालि, जागे नामा, जैदेव'

या कबीरांच्या वचनावरून आणि

'पूर्वे पंढरपूर मझारे। नामदेव गाय संजीवन करे'

या नरसी मेहेतांच्या वचनांवरून स्पष्ट आहे (अनुक्रमें श्यामसुंदर दासकृत 'कबीर ग्रंथावलि' आणि अिच्छाराम देसाअी कृत 'नरसी मेहेता कविता संग्रह हे ग्रंथ पाहा). परंतु नंतर होऊन गेलेल्या या दोघां संतांचीं चरित्रें त्यांच्यापूर्वीं झालेल्या नामदेवांच्या नांवाने उपलब्ध आहेत. तीं अर्थातच विश्वसनीय नाहींत (पाहा नामदेव महाराज यांच्या अभंगांची गाथा—आवटे शके १८३०, पृष्ठें ६०६ व ६३३). तात्पर्य, संतसाहित्यसंशोधन हें कार्य मोठें जिकरीचें, किचकट व गुंतागुंतीचें आहे.

संतसाहित्याचें संशोधन हें अशा प्रकारे त्रासदायक आहे हें खरें, परंतु तें महत्वाचें असल्यामुळें चिकित्सक संशोधकाला, संशोधनार्थ अन्तस्साक्ष, बहिस्साक्ष, अैतिहासिक घडामोडी, भाषाविकास, अन्य ग्रंथांतील अवतरणें, तर्क अित्यादिकांचा आधार घ्यावा लागतो. प्रस्तुत निबंधांत संत सेनाजी महाराष्ट्रांतले होते कीं महाराष्ट्राबाहेरले होते या विषयाचा विचार करावयाचा आहे.

बाराव्या शतकाच्या अखेरी अखेरीपासून महम्मदीयांची हिंदुस्थानावर व पर्यायाने हिंदुधर्मावर वारंवार जोराची आक्रमणें होऊं लागलीं. तेव्हां त्याविरुद्ध तोड म्हणून हिंदूंतील विचारवंत संतांनी भक्तिसंप्रदायाची स्थापना केली आणि त्याच्या प्रसाराच्या कार्यास मोठ्या उत्साहाने सुरुवात केली. या भक्तिसंप्रदायांत सर्व मतांचे व सर्व जातींचे भगवद्भक्त प्रविष्ट झाले,

आणि त्यांनीं भक्तीस मान्यत्व मिळवून दिलें. संत सेनाजी हे या भगवद्भक्ता पैकीच होते.

## त्यांच्यासंबंधीची मराठी साहित्यांतली माहिती

मराठी साहित्यांत संत सेनाजीसंबंधीची माहिती पुढील ठिकाणीं आढळते. त्यांचा चरित्रपर एक अभंग जनाबाईच्या नांवाने आहे. (पहा नामदेवांचा गाथा—आवटे.) त्या अभंगांत, सेनांना राजाकडे जाण्यास अुशीर लागला, तेव्हां देवानेंच सेनाजींचे रूप घेऊन राजाची श्मश्रु केली ही सर्वप्रसिद्ध कथा ओवण्यांत आली आहे. हीच कथा संतचरित्रकार महिपति यांनी आपल्या 'भक्तविजया' च्या ३४ व्या अध्यायांत सांगितली आहे. त्यांत त्यांनी सेना ज्या राजाच्या पदरी होते तो राजा अविंध होता असा उल्लेख केला आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनी 'सरस्वती मंदिरा' च्या चैत्र शके १८२८ च्या अंकांत नाभाजी महीपति वर्णित हिंदुस्थानी व महाराष्ट्रीं संत' हा लेख लिहिला होता. त्यांत त्यांनीं 'भक्त-विजयांत' १५६ संतांसंबंधी माहिती असून त्यांपैकी ११६ संत महीपतींनी नाभाजींच्या 'भक्तमाले'वरून घेतले आहेत, असें म्हटलें आहे. त्यांचा तो लेख सध्या हाताशी नसल्यामुळें सेनांसंबंधीं त्यांनीं काय लिहिलें आहे तें कळण्यास मार्ग नाहीं. पांगारकर हे संतसाहित्यावरले अधिकारी ग्रंथकार होते. त्यांनी आपल्या 'मराठी वाङमयाच्या इतिहासाच्या पहिल्या खंडां' त सेनांच्या काव्याचें विवेचन केलें आहे, परंतु त्यांच्या चरित्रासंबंधी मुग्धता स्वीकारली आहे. 'संतकाव्य-समालोचन' कर्ते ग्रामोपाध्ये हे ज्या राजाच्या पदरीं सेनाजी होते त्या राजास बिदरचा बादशाह समजतात (पृ. १५९ पाहा.) या त्यांच्या समजुतीमागे कदाचित् 'अविंध राजा' हा महीपतींचा उल्लेख असावा.

## त्यांच्यासंबंधी हिन्दी साहित्यांतली माहिती

हिन्दी साहित्यांतहि संत सेनाजीसंबंधीची माहिती आहे. हिंदी साहित्यांत नाभाजीचा 'भक्तमाल' हा ग्रंथ व प्रियादासाची त्या ग्रंथावरली 'टीका' यांचा फार बोलबाला आहे. 'हिंदी साहित्य का आलोचनात्मक इतिहास' या

ग्रंथाचे कर्ते रामकुमार वर्मा यांच्या मतानुसार नाभाजी संवत् १६५७ च्या सुमारास आणि प्रियादास संवत् १७६९ च्या सुमारास होऊन गेले. (पाहा पृ. ५४० व ५४२) नाभाजींनी सेनाजीसंबंधीं पुढील 'छप्पय' लिहिला आहे :—

**विदित बात जग जानिये हरि भये सहायक सेनके**
**प्रभू दासके काजरूप नापितको कीनो**
**क्षुप्र छुरहरी गही पानि दर्पण तहँ लीनो**
**तादृशि ह्वै तिहिकाल भूपके तेल लगायो**
**उलटि राव भयो शिष्य प्रगट परचौ जब पायो**
**श्याम रहत सम्मुख सदा ज्यों बच्छा हित धेनुके**
**विदित बात जग जानिये इ०**

[पाहा. भक्तमाल सटीक पृ. १५७]

या 'छप्पया' वर प्रियादासाने 'बांधो गढवास, हरि साधुसेवा आशा लगी' इत्यादि टीका केली आहे. सिखांच्या 'ग्रंथसाहेबां' त निरनिराळ्या सोळा संतांच्या वाणीचें संकलन करण्यांत आलें आहे. त्यांत सेनांच्या कवितांनाहि स्थळ मिळालें आहे. सेनांच्या हिंदी कवितेचा नमुना पुढे देत आहे :—

**'जबसों गोपाल मधुबनको सिधारे आली,**
**मधुबन भयो सधुदानव विरदम सों**
**सेन कहैं सारिका, सिखंडी, खंजरी,**
**सुक मिलिकै कलेश कीनो कालिंदी कदम सों'**

प्राचीन हिंदी काव्यसाहित्याचे अधिकारी आलोचक मिश्रबंधु यांनी 'मिश्रबंधु विनोद–भाग १, तृतीय संस्करण' यांत पृष्ठ २३६ वर सेनांसंबंधी टीप लिहिली आहे. तिच्यांत ते म्हणतात 'सेन नाअी रीवाँवांसीका कविताकाल सं. १४५७ के लगभग था। यह स्वामी रामानन्दके शिष्य थे। अिनकी कविता सिखोंके ग्रन्थ साहबमें है। कहते है कि रीवाँके महाराजा अिस महात्माके शिष्य हो गअे थे।'

हे विखुरलेले उल्लेख एकत्रित केल्यास सेनाजींविषयी पुढील माहिती मिळते :—

सेनाजींचें नांव सेनापति असें होतें. ते सुप्रसिद्ध साधु व धर्मसुधारक रामानन्द यांचे शिष्य होते. रामानंद विक्रमाच्या १५ व्या शतकांत विद्यमान होते. तेव्हा सेनाजी त्या सुमारास होऊन गेले. ते जातीने न्हावी होते. आणि रेवा संस्थानांतील बांधवगडाचे अधिपति राजाराम महाराज यांच्या पदरीं सेवावृत्ति करून होते. एकदा ते साधुसेवेंत मग्न असल्यामुळे राजाकडे जाण्यास त्यांना उशीर झाला. तेव्हा स्वतः देवाने सेनांचें रूप घेऊन राजसेवा केली. पुढे सेनांनी प्रत्यक्ष येऊन विलंब झाल्याबद्दल राजाची क्षमा मागितली. त्या वेळीं राजास आश्चर्य वाटलें. शेवटीं सेनांना कळलें की हें सर्व कृत्य देवाने केवळ आपल्या भक्तीला वश होऊन केलें. सिखांच्या 'ग्रंथसाहेबां' त नामदेव, कबीर, मीरा आदि संतांच्या कवितांच्या जोडीनेच सेनांच्या कवितांना जागा मिळाली आहे. त्यावरून भक्तीच्या क्षेत्रांत त्यांचा अधिकार किती मोठा होता हें उघड होतें.

**दोन वादग्रस्त प्रश्न :**

आता दोन वादग्रस्त प्रश्न उपस्थित होतात. ते असे कीं, सेनाजी हे महाराष्ट्रांतले की महाराष्ट्रा बाहेरले ? आणि ते जर महाराष्ट्रा बाहेरले असले, तर त्यांच्या नांवावर १५० मराठी अभंग आहेत ते कसे ? या प्रश्नांचा खुलासा असा :—

संतचरित्रकार महीपति यांनी 'भक्तविजय' हा ग्रंथ नाभाजींच्या 'भक्तमाले' वरून लिहिला हें प्रसिद्धच आहे. परंतु हा सटीक ग्रंथ त्यांनी फक्त कानांनी ऐकला होता. त्यांच्याच शब्दांत म्हणावयाचें म्हणजे

**त्यांचीं पद्यें ऐकोनी कानीं। ग्रंथ लिहिला महाराष्ट्रवाणी।**
**जैसे उदकामाजी धारवणी। दुग्ध थोडे घालती ॥'**

(पाहा भक्तविजय अ. ३।३६.)

हा ग्रंथ नीटसा समजला नसल्यामुळे महीपतींनी अनेक घोटाळे केले आहेत. सर्वांत मजेदार घोटाळा म्हणजे 'मूळींचा ग्रंथ संस्कृत जाण'। प्रियादासें केलें वर्णन। त्यावरी नाभाजीने जाण। ग्वाल्हेर भाषेंत लिहिला।' (अ. ३।३६) हा होय. हा महीपतींचा अपसमज होता.

वस्तुतः मूळ ग्रंथ ब्रिजभाषेंत असून तो नाभाजींनी लिहिला आहे व

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम .................... दि: ....................
 आं० .................... नों दि .................... 

त्यावर प्रियादासांनी टीका लिहिली असून तिच्यांत संस्कृत सुभाषितांचीं अनेक अवतरणें दिलीं आहेत. महीपतीची स्थिति

'नेणें संस्कृतवाणी निश्चिती'

अशी असल्यामुळें साहजिकच त्यांना अवतरणांचा उलगडा झाला नाही. नाभाजी व प्रियादास यांच्या जीवनकालांतही एक शतकांहून अधिक वर्षांचें अन्तर होतें. महीपतींच्या या दिशाभूलीसंबंधी मी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या आक्टो. १९४२ अंकांत अेक लेख लिहिला होता. तेव्हा सेनाजींची माहिती ही तपशिलाशिवाय 'भक्तिविजया' च्या द्वारें महाराष्ट्रांत आली आणि ती संतचरित्रात्मक व पवित्र असल्यामुळें सर्वत्र प्रसार पावली हें उघड आहे. हिंदी ग्रंथकारांनी अि. स. १४०१ हा सेनांचा आविर्भावकाळ म्हणून दिला आहे. आणि मराठी ग्रंथकारांनी इ: स. १३५० हा नामदेवांचा मृत्युकाळ म्हणून दिला आहे. जनाबाई या नामदेवांच्या दासी, तेव्हा त्यांच्या समकालीन. अर्थात् त्यांनी सेनाजींच्यावर चरित्रपर अभंग लिहावा हें संभवनीय वाटत नाहीं. तो कोणी तरी त्यांच्या नांवाने मागाहून लिहिला असावा. सारांश, संत सेनाजी हे महाराष्ट्राबाहेरले होते याविषयी संशय नाहीं.

सेनाजी हे जर महाराष्ट्राबाहेरले, तर त्यांच्या नांवावर १५० मराठी अभंग आहेत हे कसे, या दुसऱ्या प्रश्नास दोन उत्तरें आहेत.

एक उत्तर असें कीं, महाराष्ट्रांतील नामदेव ज्याप्रमाणें पंजाबांत गेले व तेथे त्यांनीं भक्तीच्या प्रसाराचें कार्य केलें, त्याप्रमाणेच सेनाजींनीं महाराष्ट्रांत येऊन कार्य केलें असावें आणि अभंग रचले असावेत. त्या युगांत भक्तिप्रसारार्थ संतांचा स्वच्छंद संचार सर्वत्र असे. तेव्हा हिंदी मुलुखांतले सेनाजी महाराष्ट्रांत येऊन जाणें शक्य आहे. ज्याप्रमाणे नामदेवांबरोबर त्यांचे पंजाबी शिष्य महाराष्ट्रांत येत, त्याचप्रमाणे सेनाजींचें महाराष्ट्रांतलें आगमन संभवनीय आहे. 'An outline of the Religious literature of India' या ग्रंथाचे लेखक G. N. Farquhar यांनी आपल्या ग्रंथांत पृ. २९०–३०० वर 'संतत्रिलोचन' याच्या संबंधी पुढील टीप लिहिली आहे; :—

'Another Maratha singer Trilochan by name, seems to have been a contemporary of Namdev, but very little

is known about him, Three of his Hindi hymns appear in his Granth, but his Marathi hymns and even his memory seem to be lost in his native land.'

हे त्रिलोचन नामदेवांचे पंजाबी शिष्य असावेत असें त्यांच्या नांवावरून वाटतें. मात्र फर्क्युहरसाहेबांचें त्यांच्याविषयीचें म्हणणें पूर्णतया बरोबर नाही. कारण महीपतींनी 'भक्तविजया' च्या शेवटच्या अध्यायांत त्रिलोचनांचा नामनिर्देश केला आहे, आणि मोरोपंतांनी 'सन्मणिमालें' तील ९० व्या आर्येंत त्यांचा पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे :—

**'गावा त्रिलोचनाभिध अखिल शुभगुणार्थि कल्पनग, वाणी।**
**हरिजनयशींच रमशिल तरि काय मना, सुखासि मग वाणी।'**

त्रिलोचन महाराष्ट्रीय नव्हते. तेव्हा ते मराठींत लिहिणार कसे ? परंतु महाराष्ट्रीय नामदेवांनी मात्र हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांत कविता लिहिली आहे. नामदेवांच्या हिंदी कवितेसंबंधी एक गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. ती ही की तीवर मराठीची छाया कायम आहे. उदाहरणार्थ पुढील चरण पाहा :

**'पांडे तुम्हरी गायत्री लोधेका खेत खाती थी।**
**लैकरि ढेंगा टँगरि तोरि लंगत लंगत जाती थी।'**

सेनाजींच्या नांवावर जे मराठी अभंग आहेत, त्यांच्यावर हिंदीची पुसटहि छटा नाही, परंतु 'आम्ही बारीक बारीक। करूं हजामत बारीक' या प्रसिद्ध अभंगांत मात्र 'हजामत' 'बारीक', 'ऐना' 'बगल' इत्यादि यावनी शब्द आले आहेत. सेनाजींच्या अभंगांवर ज्ञानेश्वरांची छाप आहे, असें पांगारकर म्हणतात. परंतु ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयांत यावनी शब्दांचा संपर्क नाहीं हें लक्षांत घेणें आवश्यक आहे. तेव्हां दुसरें उत्तर असें की, हे अभंग सेनाजींच्या नांवावर अन्य कुणी तरी रचिले असावेत. सारांश, संत सेनाजी हे महाराष्ट्राबाहेरले होते. कदाचित् महाराष्ट्र ही त्यांची कर्मभूमि असावी. ती तशी असल्यास त्यांनी मराठी अभंग रचले असावेत. ती तशी नसल्यास ते इतर कोणी तरी त्यांच्या नांवावर लिहिले असावेत.

**—सह्याद्रि, जुलै १९५०**

● ● ●

# ४

# एकनाथांचें चरित्र व कार्य : एक नवी दृष्टि

## चिकित्सा व श्रद्धा

आज नाथषष्ठीचा दिवस आहे. या मंगल मुहूर्तावर नाथांच्या चरित्रावर व कार्यावर बोलण्याचा माझा विचार आहे. वास्तविक या विषयावर बोलण्याचा माझा अधिकार नाही, कारण मी सन्तसाहित्यांत मुरलेलों नाही. मी केवळ मराठी वाङ्मयाचा एक नम्र विद्यार्थी आहे. वाङ्मयाचा अभ्यास करतांना माझ्या वाचनांत ज्या विशेष गोष्टी आल्या, त्याच आजच्या भाषणांत मांडण्याचा माझा विचार आहे. नाथांचें चरित्र सर्वांच्या परिचयाचें आहे तेव्हां त्याची पुनरुक्ति मी येथें करीत नाहीं. परंतु त्याकडे केवळ भाविकतेने न पाहतां चिकित्सकतेनेहि पाहण्याची आवश्यकता आहे अशा मताचें मी प्रतिपादन करीत आहे. चिकित्सा ही कांहीशीं कर्कश, कठोर व भेदक असते. पण तिच्यांत श्रद्धेचा अंश नसतो असें नाहीं. श्रद्धा हवी पण ती आंधळी नको, येवढाच काय तो तिचा आग्रह असतो.

एकनाथांनी आपल्या एका पदांत

**भक्तिज्ञानाविरहित इतरा गोष्टी न कराव्या ।**
**प्रेमभराने वैराग्याच्या युक्ति विवराव्या ।।**

असे उद्गार काढले आहेत, पण आपण आज इथे एका नवीन दृष्टीने गोष्टी सांगणार आहोंत व युक्तिवाद करणार आहोंत.

## नाथांच्या चरित्राचीं साधनें

नाथासंबंधींच्या माहितीचीं केशवबुवा व महीपति यांचीं चरित्रें जुनीं आहेत. महिपतींनी 'संतलीलामृतां' त व 'भक्तविजयां' त नाथांचें चरित्र वर्णिले आहे. भक्तविजयांत तें अध्याय ४५–४६ मध्यें आलें आहे. त्यांच्यांतील कांहीं कथांचा आज नव्या दृष्टीने विचार करावयाचा आहे. याशिवाय नाथांचें चरित्र व चारित्र्य यासंबंधी दासोपंत, मुक्तेश्वर, तुकोबा, निळोबा कृष्णदयार्णव, श्रीधर, देवदास, अमृतराय, मोरोपंत व बाळाजीपंत पराडकर यांनीही धन्योद्गार काढले आहेत. अर्वाचीन लेखकांपैकी सहस्त्रबुद्धे, पांगारकर, व आजगांवकर यांचीं नाथचरित्रें प्रसिद्ध असून न्यायमूर्ति रानडे, चिपळुणकर व भावे यांचीं नाथांच्या वाङ्मयाविषयींचीं मतें सर्वश्रुत आहेत.

## नवी दृष्टि म्हणजे काय ?

नाथांच्या चरित्राकडे नव्या दृष्टीने पाहावयाचें म्हणजे काय, हें स्पष्ट करण्यासाठीं आपण भक्तविजयांतील कांहीं कथा घेऊं. त्यांत एका कथेंत एकनाथ हें जनार्दन स्वामींनी पिकदाणींत थुंकलेला पिक पीत असें म्हटलें आहे. ही कथा अर्वाचीनांतल्या भाविकांनाहि रुचण्याजोगी किंवा पटण्याजोगी नाहीं. पत्नी ही पतीच्या उष्टचा ताटांत जेवते हें खरें. पण त्यांत "भक्तविजया" तील कथेंतला ओंगळवाणा प्रकार नाहीं. तेव्हां या कथेचा मथितार्थ येवढाच कीं एकनाथ हे जनार्दनांचे एकनिष्ठ शिष्य होते. पुढे दोन कथा असून एकींत दत्तांनी जनार्दनस्वामींना मुसलमानी अधिकाऱ्याच्या वेशाने दर्शन दिलें व दुसरींत एकनाथांना मलंग फकिराच्या वेशाने दत्तांचा साक्षात्कार झाला असे कथाभाग आले आहेत. त्यांचें तात्पर्य इतकेंच की तत्कालीन मुसलमान राज्यकर्त्यांना हिंदूबद्दल आणि त्यांच्या धर्माबद्दल सहानुभूति वाटावी म्हणून या कथा कल्पिण्यांत आल्या असाव्यात. एकनाथांकडे प्रत्यक्ष परमेश्वर हे श्रीखंडयाच्या रूपाने पाणी भरीत व चंदन उगाळीत अशी एक कथा आहे. श्रीखंडया हें नांव श्रीखंड म्हणजे चंदन उगाळण्यावरून पडलें असावें हें उघड आहे. हा श्रीखंडया परदेशी ब्राह्मण असल्याचा उल्लेख 'भक्तविजयां' त आहे. आणि परदेशी ब्राह्मण हे पाणके म्हणून महाराष्ट्रां त

पिढ्या न् पिढ्या प्रसिद्ध आहेत. तेव्हां श्रीखंड्या हा नाथांना काशीयात्रेंत भेटलेला परदेशी ब्राह्मण असावा असा निष्कर्ष काढतां येतो. नाथांचे समकालीन तुलसीदास यांच्या संबंधींचा.

**चित्रकूटके घाटपर, भइ संतनकी भीर।**
**तुलसिदास चंदन घिसे, तिलक करे रघुवीर।।**

हा दोहा आणि नाथांविषयींची

**श्रीएकनाथसदनीं माधवजी सर्व काम हें करितो।**
**स्वकरें चंदन घासी, गंगेचें पाणि कावडी भरिती।।**

ही आर्या—या दोहोंतील कल्पनासाम्याहि लक्षांत घेण्यासारखें आहे.

**नाथांची त्रिविध उपासना**

वयाच्या १३ व्या वर्षी नाथांचा जनार्दनस्वामींशी संबंध आला. जनार्दनस्वामी हे आदर्श गृहस्थाश्रमी होते. ते दत्तोपासक होते. त्यांच्या वेळीं मुसलमानांची राजवट होती. त्या राजवटींत ते दौलताबादचे सुभेदार होते. ते सरकारांत व प्रजाजनांत सारखेच प्रिय होते. हिंदु व मुसलमान दोन्ही समाज त्यांस चहात होते. अशा या विवेकी गुरूकडून नाथांसारख्या 'शांतिजलधी' ला दत्ताची उपासना लाभली होती.

नाथांच्या घराण्यांत पंढरपूरच्या विठोबाची उपासना होती. विजयनगरच्या राजाने विजयनगरला नेलेली विठ्ठलाची मूर्ति नाथांचे पणजे भानुदास यांनी पंढरपुरास परत आणल्याची कथा प्रसिद्ध आहे. पैठणाहून नाथांच्या घरांतून अजून पंढरपुरास पालखी जात असते. तेव्हां विठ्ठलाची उपासना त्यांना घरांतच मिळाली होती.

नाथांचा 'ज्ञानेश्वरी' चा व्यासंग प्रदीर्घ व गाढ होता. त्यांनी परिश्रमपूर्वक संशोधन करून 'ज्ञानेश्वरी' ची शुद्ध प्रत तयार केली आणि आळंदीस जाऊन ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला या घटना सर्वश्रुत आहेत. ज्ञानेश्वर हे नाथपंथी होते. ज्ञानेश्वरींत त्यांनी आपली नाथपरंपरा दिली आहे. या नाथपरंपरेची व दत्तपरंपरेची सांगड घालण्यांत आलेली आहे.

**जय जय दत्त राजयोगी जय जय महाराज योगी।**
**शैली, शृंगी, कंथा, झोली, विभूति लगाई तनमो।**
**कोटि चंद्रका तेज, झुलत है चले आपनीं गतमो॥**

या महादेवसुताच्या प्रसिद्ध पदांत दत्तांना योगी म्हटलें असून नाथपंथी बैरागी जीं बाह्यचिन्हें धारण करतात, तीं दत्तांनी धारण केलीं असल्याचा उल्लेख आहे. तेव्हा हें पद वरील विधानाची साक्ष देईल. शिवाय अवधूत म्हणजे दत्तात्रेय हे आदिनाथाचे शिष्य अशी एक आख्यायिकाहि प्रचलित आहे. एकनाथांच्या पूर्वपुरुषांचीं नांवें भानुदास, सूर्यनारायण व चक्रपाणी अशीं असतांना त्यांचें स्वतःचें नांव मात्र एकनाथ आहे. त्यांचें मूळ नांव निराळें असावें असा एक होरा वाहतो. त्यांच्या नांवांतील 'नाथ' या उपपदावरून त्यांचीं नाथसंप्रदायाची उपासना व्यक्त होण्यासारखी आहे. तात्पर्य दत्त, वारकरी व नाथ या तीन्ही संप्रदायांची उपासना एकनाथांनी स्वीकारली होती असें दिसतें. ज्ञानेश्वर हे नाथपंथी की वारकरी हा एक जुना वाद आहे. एकनाथ हे ज्याप्रमाणे तीन पंथांचे उपासक होते. त्याप्रमाणे ज्ञानेश्वर हे कदाचित् नाथ व वारकरी या दोन्ही पंथांचे उपासक असण्याचा संभव आहे.

**दत्तपंथ**

मुसलमानांच्या आगमनानंतर हिंदुस्थानांत निरनिराळ्या वैष्णव पंथांचा उदय झाला. दत्तपंथांचा उदय असाच झाला असावा. मार्कंडेय पुराणांतील दत्त हे भ्रष्ट असून, दुसऱ्या एका पुराणांत, त्यांचा कार्तिकेय अर्जुनाशीं संवाद होतो व ते आपल्या दुराचरणाचा कबुलीजबाब देतात, असें वर्णन आहे. अनसूयेच्या आख्यानांत तिच्या पातिव्रत्याच्या तेजाने दिपून ब्रह्मदेव, विष्णु व शंकर तिच्या उदरी येतात येवढाच कथाभाग आहे. दत्तपंथांत हरिहरांच्या एकतेची कल्पना आहे. यापूर्वीं शैववैष्णवांचीं भांडणें होतीं. त्यांचें निराकरण करण्याचा प्रयत्न दत्तपंथांत आहे. हरिहरांचें हें अद्वय नाथांना संमत होतें असें त्यांच्या

**'अद्वयभजनें अखंडस्मरणें वाजवि करटाळी'**

या पंक्तीवरून स्पष्ट होतें. दत्तसंप्रदाय हा खास महाराष्ट्रांतला आहे. श्रीपाद श्रीवल्लभ, नरसिंह सरस्वती व जनार्दन स्वामी हे या पंथाचे प्रणेते होत.

महानुभाव पंथांतहि दत्तोपासना आहे. तिचा व नंतरच्या दत्त पंथाचा कितपत संबंध आहे हें पाहण्याचें काम संशोधकांचें आहे. त्या दृष्टीने प्रयत्न व्हावयास हवा. दत्तपंथ हा महाराष्ट्रांतच फोंफावला हें माहूर, गाणगापूर, औदुंबर व नरसोबाची वाडी या पवित्र क्षेत्रांवरून आणि 'सह्यगिरिवासी' या दत्तांच्या विशेषणावरून सहज लक्षांत येण्याजोगें आहे. गिरनार, आबू व नेपाळ येथेंहि दत्तांच्या पादुका आहेत. त्या कदाचित् महाराष्ट्रांतूनच तेथे गेल्या असाव्यात जोधपूर बिकानेर रल्वेंत काम करणारे एक सद्गृहस्थ श्री नरहरपंत गोखले. यांनी जोधपूर येथें १९२४ सालीं एक दत्तमंदीर स्थापन केल्याचें मला माहित आहे.

दत्ताचा संप्रदाय मुसलमानी अमदानींत प्रस्थापित झाला असावा यासंबंधी प्रा. न. र. फाटक यांनी कांही बिनतोड प्रमाणें पुढे आणलीं आहेत. त्यांच्याच जोडीला मीहि कांही प्रमाणें मांडीत आहे. दत्तांची दिगंबरवृत्ति व माहूरला शय्या तर करवीरला भिक्षा आणि एक ठिकाणीं भोजन तर दुसऱ्या ठिकाणीं हस्तप्रक्षालन ही दिनचर्या तत्कालीन महाराष्ट्रीय जीवनांतील अस्थिरतेची द्योतक आहे. दत्तांच्या पादुकापूजनाची कल्पना मुसलमानांच्या कदमे-रसूल किंवा पंजासाहेबच्या पूजनाशीं जुळती आहे. मूर्तीची पूजा न करतां एकाद्या बोधचिन्हाची पूजा करावयाची ही कल्पना हिंदुस्थानाबाहेरील आहे. मूर्तिपूजेविषयींचे एकनाथांचे पुढील उद्गार चिंतनीय आहेत. ते म्हणतात,

**प्रतिमाचि देवो ऐसा ज्याचा भावो ।**
**तो न करी निर्वाहो आम्हांलागीं ।**

किंवा

**देव दगडाचा । भक्त तो मेणाचा ।**
**खरेंपणा नाहीं । देवाचें तें ठायीं ।**

गुरूवर देवत्वाचा आरोप करावयाचा ही कल्पनाहि इस्लामी अगर ख्रिस्ती आहे. महम्मद पैगंबर व येशू ख्रिस्त हे या कल्पनेमुळेच देवत्व पावले आहेत. आपल्याकडील सिख्ख संप्रदायांत 'ग्रंथसाहेबाची पूजा' व गुरूचें सर्वसत्ताधीशत्त्व मान्य आहे. त्याला कारण तो संप्रदाय मुसलमानी अंमलांत

अस्तित्वांत आला हेंच असावें. दत्तपंथांत दत्ताला गुरु म्हणतात त्याच्या मुळाशीं गुरु व देव याचें अभिन्नत्व असावें. स्वतः एकनाथांनीहि 'भागवता' च्या १२ व्या अध्यायांत

**'गुरू भगवंत दोन्ही एक'**

असे उद्‌गार काढले आहेत. वास्तविक गुरुवार हें नांव इतर वारांच्या नांवाप्रमाणें एका ग्रहाच्या नांवावरून पडले आहे. बृहस्पति हा ग्रह देवांचा गुरू म्हणून त्याच्या वाराला गुरुवार म्हणतात. परंतु दत्तपंथीयांनी दत्त हे गुरु म्हणून गुरुवारलाच उपासाचा व भजनाचा वार करून टाकलें आहे. गुरुवारीं रात्री पादुकांपुढें निरंजन तेवत ठेवावयाचें हा प्रघात जुमेरातला म्हणजे गुरुवारच्या रात्रीं पीरापुढें चिराग जाळण्याच्या मुसलमानी प्रघाताशीं समान आहे. दत्त हे मुसलमानी वेषांत वावरतात त्यासंबंधींच्या कथा मागे आल्याच आहेत. दत्तांबरोबर एक गाय व चार कुत्रीं दाखविण्याचा प्रघात आहे. एक गाय म्हणजे भक्ति व चार कुत्रीं म्हणजे चार वेद. चार वेद हे भक्तीसमोर दीनवाणे आहेत असें दाखविण्याची कल्पना बहुधा या प्रघातामागें असावी.

## एकनाथ व इतर संत

ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम व रामदास या चार संतांच्या ज्ञानेश्वरी, भागवत, गाथा व दासबोध या चार ग्रंथांना महाराष्ट्राचे चार वेद मानण्यांत येते. या चौघांच्या चरित्राकडे तौलनिक दृष्टीने पाहिल्यास कांहीं चिंतनीय गोष्टी आढळांत येतात. ज्ञानेश्वर व नामदेव नाथांपूर्वीं ३०० वर्षें जन्मास आले होते. त्यावेळीं दक्षिणेवर मुसलमानांचे हल्ले झाले नव्हते; आणि तुकाराम व रामदास हे नाथांनंतर ३०० वर्षांनी जन्मास आले, त्यावेळीं शिवाजीमहाराजांच्या पराक्रमामुळें महाराष्ट्र हा स्वतंत्र झाला होता. मात्र नाथांच्या काळीं तो परतंत्र होता. तेव्हां तशा प्रतिकूल परिस्थितींत नाथांनी स्वधर्म, स्वजन व स्वभाषा यांच्या रक्षणाचें थोर कार्य केलें हें लक्षांत घेणें आवश्यक आहे. ज्ञानेश्वर व रामदास हे ब्रह्मचारी होते. नामदेव व तुकोबा हे गृहस्थाश्रमी असले, तरी संसाराकडे त्यांचे दुर्लक्ष होतें. परंतु एकनाथ हें प्रपंच व परमार्थ दोन्ही साधत होते हें विशेष आहे. इतर संतांप्रमाणें एकनाथां-

नाहि घरांत पुत्राचा व बाहेर पैठणकर ब्राह्मणांचा विरोध होता. रामदासांच्या संप्रदायांत फक्त ब्राह्मणांनांच प्रवेश होता आणि तुकोबा हे समदृष्टि व सहिष्णु असले, तरी त्यांच्या अभंगवाणींत महार या शब्दाचा शिव्याशापासारखा उपयोग केलेला आढळतो. परंतु एकनाथ हे अतिशय शांत सहनशील, समदृष्टि व दयाळू होते. इतर संतांच्या चरित्रांत चमत्कार आहेत. ते साधारणांच्या आटोक्याबाहेरचे वाटतात. परंतु एकनाथांच्या आयुष्यांतील, थुंकणाऱ्या यवनावर न रागावणें, तहानलेल्या गाढवाला गंगा पाजणें, महारांना जेवूं घालणें, त्यांच्याकडे जेवणास जाणें व महाराचें शेंबडे पोर कडेवर घेणें या गोष्टी चमत्कारांत जमा होण्याजोग्या नाहींत. एकनाथ इतरांच्या मानाने अधिक आपुलकीचे व जवळचे वाटतात याचें कारण त्यांच्या या साध्या चरित्रांत आहे.

**ज्ञानेश्वरी व भागवत**

ज्ञानेश्वरांप्रमाणेच एकनाथांनी मराठींत ग्रंथलेखन करून देव, भक्त व नाम ही त्रयी असणाऱ्या भागवत धर्माचा जयजयकार केला आणि लोकजागृतीचें कार्य केलें. एकनाथांच्या नांवावर बरेच ग्रंथ आहेत. पण त्यांपैकी नाथभागवत, रामायण व रुक्मिणीस्वयंवर हे तीन ग्रंथ विशेष विख्यात आहेत. त्या सर्वांचा भागवत हा ग्रंथ मेरुमणी आहे. ज्ञानेश्वरी व भागवत या दोन्ही ग्रंथांत कृष्ण हीच विभूति उपदेशक आहे. परंतु ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरींतला कृष्ण हा किंकर्तव्यमूढ व शोकसंविग्नमानस धनुर्धरास प्रतिपक्षाविरुद्ध युद्धास प्रवृत्त करणारा कुशल राजनीतिज्ञ आहे, तर नाथांच्या भागवतांतील कृष्ण हा शांत व दांत उद्धवास भक्तीच्या आनंदांत निमग्न करणारा प्रेमळ परमेश्वर आहे. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी हा कौरवपांडवांच्या इतिहासाचा एक भाग आहे, तर नाथांचें भागवत हा परमात्म्याच्या चरित्राचा एक अंश आहे. ज्ञानदेवांचा अर्जुन व नाथांचा उद्धव या दोन भूमिकाच त्यांच्या निर्मात्यांच्या वृत्तीवर प्रकाश पाडण्यास समर्थ आहेत. ज्ञानेश्वरींत केवळ ज्ञानेश्वरांची आवड म्हणून मूळांत नसलेली 'योगचर्चा' आली आहे, तर भागवतांत नाथांनी त्यांना प्रिय असणाऱ्या 'गुरुभक्ती'चा विस्तार विशेष केला आहे. मात्र ज्ञानेश्वरींतलें काव्य भागवतांत

नाही. ज्ञानेश्वर हे कल्पनेंत तरंगत ठेवतात, तर नाथ हे व्यवहाराच्या सीमा ओलांडत नाहीत. ज्ञानेश्वरांनी आपलीं 'अक्षरें रसिकें' मेळविलीं आहेत, तर नाथांची भाषा ही साधी सरळ व सुगम आहे. तिच्यांत काव्य नाही असें नाही. मात्र तें ज्ञानेश्वरीप्रमाणे अखंड नाही. मधून मधून तें दृष्टोत्पत्तीस येतें. वानगीदाखल 'पिंगले' चें हें शब्दचित्र पहा. त्यांतील रंग किती उठावदार आहेत हें निराळ्याने सांगण्याचें कारण नाही;—

**'ते स्वैरिणी स्वैराचारी। सायंकाळीं उभी द्वारीं**
**नाना अलंकार अंबरीं। शृंगारकुसरी शोभत॥**
**येत्या पुरुषास हाणी खडा। एकासी म्हणे ध्या जी विडा**
**डोळा घाली ज्या त्या कडा। एकापुढे भंवरी दे॥'**

## नाथांचें भक्तिसार

नाथांकडे 'कवि' या दृष्टीने न पाहतां 'संत' या दृष्टीने पाहणें आवश्यक आहे. समाजांत बहुसंख्येने असलेली 'भाळीभोळीं कशीं तरतील' ही काळजी त्यांना होती. या जनांना आधीं पोटोबा हवा आणि मग विठोबा हवा. त्यांना योग नको, ज्ञान नको अथवा कर्म नको. कारण त्यांना इंद्रियनिग्रह नाही. तेव्हां त्यांच्यासाठी नाथांनी २९ व्या अध्यायांत 'निरहंकृत भक्ति ही श्रेयस्कर होय' असें सार काढलें आहे. उद्धव भगवान् कृष्णांना म्हणतो की मन हें अनावर आहे;—

**वारा बांधवेल मोटें। अग्नी प्राशवेल अवचटें॥**
**समुद्र घोंटवेल घोटें। मन आत्मनिष्ठे तरी नये॥**

यावर 'मेघगंभीर गर्जोनी स्वानंद' कृष्ण म्हणतात की,—

**भाळयाभोळया ब्रह्मप्राप्ती। पावावया सुगम स्थिति॥**
**ये अर्थी दाटुनी माझी भक्ति। तिसी मी श्रीपति सदा वश॥**
**माझें करितां अनन्य भजन। मी सर्वथा भक्ताधीन॥**
**तेथ जातिगोत ज्ञातेपण। उंच नीच वर्ण मी न म्हणे॥**

यावर उद्धव अशी शंका घेतात की वेदांत तर चांडाळादिकांना अपूज्य मानलें असून फक्त ब्राह्मणांनाच पूज्य मानलें आहे. त्यावर कृष्ण म्हणतात

की, "उद्धवा ! वेद हे अंधारांतील दिव्याप्रमाणे आहेत. सूर्य उगवल्यावर दिव्याचें महत्व उरत नाही. त्यांचप्रमाणे माझ्या उपदेशानंतर वेदांचें महत्त्व राहत नाही."

एकनाथांनी आपल्या ग्रंथांत व चरित्रांत दोन्ही ठिकाणीं या उपदेशाचें पालन केलें म्हणूनच आज इतक्या शतकानंतरहि त्यांच्या चरित्राची व कार्याची स्मृति कायम आहे.

—समाधान, ३ एप्रिल, १९४९

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ....................
........................ नों दि ..................

# ५

# तुकाराम व कबीर

संतश्रेष्ठ तुकाराम हे अशिक्षित व अनभ्यस्त होते असा एक सार्वत्रिक समज आहे. पण तो बरोबर नाहीं. तुकारामांनीं आपल्या पूर्वगामी कवींच्या काव्यांचा अभ्यास केला होता. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें झाले, तर

**'कांहीं पाठ केलीं। संतांचीं उत्तरें। विश्वासें आदरें। करोनियां ॥'**

असें म्हणतां येईल. तुकाराम अर्ध्या हळकुंडाने पिवळे झाले नव्हते. त्यांनीं आपल्या अगोदर होऊन गेलेल्या ज्ञानदेव, नामदेव व एकनाथ या संतांच्या ग्रंथांचा अत्यंत कसून अभ्यास केला होता. ते स्वत: जरी संस्कृतज्ञ नव्हते, तरी सुसंस्कृत व बहुश्रुत होते. गीता, भागवत व भर्तृहरींचें शतकत्रय त्यांच्या कानावरून गेलें होतें. ज्यांना या विषयी विशेष जिज्ञासा असेल त्यांनीं पांगारकरांच्या 'तुकाराम चरित्रां'तील 'तुकोबाचें ग्रंथाध्ययन' हें सविस्तर प्रकरण अवश्य वाचावें.

तुकारामांच्या प्रतिभेची विशाल गंगा अभंग वाहतांना तिला अध्ययनाच्या अनेक उपनद्या मिळाल्या होत्या. तुकारामाचें अंत:करण पराकाष्ठेचें संस्कारक्षम होतें. अभंगांतील उपमा दृष्टान्तावर जसा त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाचा ठसा उमटला आहे, तसा त्यांतील तत्वज्ञानावर त्यांच्या व्यापक अनुभवाचा व विस्तृत वाचनाचा परिणाम झाला आहे. हिंदी भाषेशीं त्यांचा अल्प परिचय होता. त्या भाषेंत त्यांनीं मोजकी कविता लिहिली आहे. इ. स. १९४० सालीं पुण्यास हिन्दी साहित्य संमेलनाचें अधिवेशन भरलें होतें.

त्यांत श्री न. चिं. केळकरांचें भाषण झालें तें ता. २७–१२–४० च्या 'केसरीं' त प्रसिद्ध झालें होतें. त्यांत केळकर म्हणतात: "तुकारामांच्या नांवावर कांहीं हिंदी कविता मोडतात. पण मला त्यांचा उल्लेख विश्वसनीय वाटत नाहीं". त्यांना असें कां वाटतें, याचें कारण त्यांनीं दिलेलें नाहीं. प्रस्तुत निबंधांत मी या विपरीत ग्रहाचें यथामति निराकरण करणार आहे.

## तुकारामांची हिन्दी भाषा

तुकारामांच्या कवित्वावर कबीराच्या लोकोत्तर वाणीचा व साध्या शिकवणीचा विलक्षण प्रभाव पडला आहे. कबीर हा शिकंदर लोदीचा समकालीन होता व तुकाराम हे शिवकालीन होते. तेव्हां या दोघांच्या काळांत जवळ जवळ शें-सवाशें वर्षांचें अंतर आहे. परंतु कबीर पंथीयांचा उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत अनिरुद्ध संचार असल्यामुळें आणि दक्षिणेंतील लोक तीर्थयात्रेच्या निमित्तानें उत्तरेकडे जात असल्यामुळें तुकारामांची हिन्दीशीं तोंडओळख होती. पांगारकरांच्या मताप्रमाणें तुकाराम एकवार काशी, गया व द्वारका या तीर्थांस जाऊन आले होते. शिवाय चांभारगोंदें येथील शेख महम्मद या कबीरपंथी अवलियाशीं त्यांचा स्नेहसंबंध होता. तुकारामांची हिन्दी भाषा मराठी इतकी सफाईदार नसली, तरी तिचा आशय सहज समजण्यासारखा आहे. वानगीदाखल हीं दोन अवतरणें पहा :—

**(१) मेरे रामको नाम जो लेवें बारोंबार**
**त्याकें पाऊं मेरे तनकी पैंजार !**
**ज्याका चित लगा मेरे रामको नाम ;**
**कहे तुका मेरा चित लगा त्याके पाव ॥**

**(२) तुका[१] सुरा नहिं सबदका रे, जब कमाई न होय**
**चोट साहे घनकी रे, हीरा नीबरे तोय ॥**

यांत पायांतील पैंजार व घणाचा घाव खाणारा हिरा अशा दोन कल्पना आहेत. याच कल्पना त्यांनीं आपल्या अभंगांत गोंवल्या आहेत :

---

१ सुरा—शूर; नीबरे–निमावतो, वांचतो; तोय—तेव्हां.

(१) होईन मोचे वाहाणा, पायीं सकलां संतजनां।

(२) हीरा ठेवितां ऐरणीं, वांचे मारितां जो घणीं।

वस्तुतः या कल्पनांचा उगम कबीरांत आहे तो असा :

(१) सपनेहू[२] बरडाइकै जिह मुख निकसै राम,

ताके पाकी पनही, मेरे तनको चाम!

(२) हीरा[३] वही सराहिए सहै घननकी चोट ;

अर्थात् कबीराच्या हिंदी रचनेंत व तुकारामांच्या हिंदी रचनेंत तफावत आहे. कबीरानें जशी मराठी भाषा लिहिली असती, तशी तुकारामांनीं हिंदी भाषा लिहिली आहे. पुण्यापाशीं राहणाऱ्या तुकारामांनीं हिंदी मुलखांत राहणाऱ्या महाराष्ट्रीयाप्रमाणें सफाईदारपणें हिंदी भाषा लिहावी अशी अपेक्षा करणें अन्याय्य होईल. उलट त्या काळीही तुकारामादि आपल्या संतांना हिंदीच्या सुगमतेची व पर्यायानें राष्ट्रीयतेची अंतरंग ओळख पटली होती याचें साभिमान कौतुक वाटतें.

तुकारामांनीं आपल्या अभंगांत दोन तीन ठिकाणीं कबीराचा निर्देश केला आहे (आवटे—तुकाराम-गाथा, अभंग ११४१, २०३४, ३०४६ पाहा).

काशीच्या नागरीप्रचारिणी सभेच्या वतीनें श्यामसुंदरदास यांनीं कबीराची प्रमाणभूत पदावलि संपादिली आहे. तिची हिंदी भाषा नामें, क्रियापदें, अव्ययें आणि क्वचित् कारक यांच्या दृष्टीनें प्रचलित मराठीला अत्यंत निकट आहे. ज्यांना संस्कृत प्राकृतचें थोडेंफार ज्ञान असेल, त्यांना कबीर अनायासें समजूं शकेल. मासला म्हणून पुढील कांहीं दोहे पहा :

(१) [४]सतगुरुको महिमा अनँत, अनँत किया उपगार।

लोचन अनँत उघाडिया, अनँत दिखावणहार॥

---

२ बरडाइकै—बरळतांना; निकसै—निघतें.

३ सराहिए—स्तवावा.

४ दिखावणहार—दाखवणारा.

(२) कबीर कहता जात हूँ, सुणता है सब कोइ।
राम कहें भल होइगा, नहिं तर भला न होइ॥

(३) इस तनका दीवा करौं, बाती मेल्यूं जीव।
लोही सींचौ तेल ज्यूं, कब मुख देखो पीव॥

(४) पाथरहीका देहुरा, पाथरहीका देव।
पूजणहारा अंधला, लागा खोटी सेव॥

(५) जिहि घर साध न पूजिये, हरिकी सेवा नाहिं।
ते घर मडहटसारखे, भूत वसे तिन माँहि॥

(६) घरि परमेसुर पाहुणा, सुणौ सनेही दास।
षटरसभोजन भगति करि, ज्यूं कदै न छोडै पास॥

(७) राम कह्या तिनि कहि लिया, जुरा पहूंचो आइ।
मंदिर लागै द्वार थैं, तब कुछ काढण न जाई॥

(८) यहु तन जालौं मसि करौं, लिखौं राम का नाउँ।
लेखणि करौं करंककी, लाखी राम पठाऊँ॥

(९) कबिरा नवै सो आपको, परको नवै न कोय।
घालि तराजू तौलिये, नवै सो भारि होय॥

(१०) या दुनियामें आइके, छाँडि देइ तूं ऐंठ।
लेना होइ सों लअिले, उठीं जात हैं पैंठ॥

(११) बोली एक अमोल है, जो कोइ बोलै जानि।
हिये तराजू तौलिके, तब मुखबाहर आनि॥

(१२) खरी कसौटी नामकी, खोटा टिकै न कोय।
नाम कसौटी सो टिकै, जीवन मिरतक होय॥

---

मेल्यूं-मिळवूं; लोही-रक्त; ज्यूं-जसें; पीव-प्रिय; देहुरा-देव्हारा; सेव-सेवा; साध-साधु; मडहट-स्मशान; माँहि-मध्यें; सनेही-स्नेही; पास-पाश; जुरा-जरा, वृद्धत्व; पहुँची-पोंचली; पठाऊँ-पाठवीन; नवै-नम्र होतो; पैंठ-पेठ, बाजार; हिये-हृदय; मरतक-मृतक.

या अवतरणांवरून हिन्दी-मराठी या संस्कृतोद्भव भाषा कशा समीपच्या संबंधिनी आहेत हें सहज निदर्शनास येईल. तेव्हां तुकारामांना कबीराच्या काव्याचे रसग्रहण सहजसाध्य होतें असें विधान केल्यास आश्चर्याचें कारण नाहीं.

**इतर हिन्दी सन्तांच्या वाणीचा परिचय :**

कबीराशिवाय तुलसीदास, मीराबाई, मलूकदास, दादू दयाल आदि हिन्दी संतांची वाणी तुकारामांच्या श्रवणपथावर पडली होती. उदाहरणार्थ तुलसीदासांच्या 'विनयपत्रिकें' त हें पद आहे :

**जाके प्रिय न राम बैदेही। तजिये ताहि कोटि बैरीसम, यद्यपि परम सनेही ॥**
**तज्यो पिता प्रह्लाद, बिभीषण बंधु, भरत महतारी ।**

तुकारामांच्या अभंगांत याचें मराठी रूपांतर आहे, तें असें :

**नारायणीं जेणें घडे अंतराय । हो कां बापमाय त्यजावीं तीं ॥**
**येर प्रिया पुत्रा असे कोण लेखा । करिती ते दुःखा पात्र शत्रू ॥**
**प्रल्हादें जनक, बिभीषणें बंधु । आणि माता निंद्यु भरतें केलीं ॥**

पांगारकरांनीं 'तुकाराम-चरित्रां'त याच अर्थाचा पुढील दोहा दिला आहे :

**प्रल्हादने पिता तजे, भरतने अपनी माय ।**
**बिभीसनने भाई त्यजे, श्रीरामके कार्य ॥**

परंतु तो कबीराच्या ग्रंथांत आढळत नाहीं.

**'करमगत टारे[५] नाहीं टरे। सतवादी हरिचँदसे राजा नीचघर नीर भरे ॥**
**पांच पांडु अरु कुंती द्रौपदी हाड हिमालय गरे॥'**

हे मीराबाईचें गीत आणि

**'आलें देवाचिया मना, तेथें कोणाचें चालेना ।**
**हरिश्चंद्र ताराराणी, वाहे डोंबाघरीं पाणी ॥**
**पांडवांचा साहाकारी, राज्यावरोनि केलें दुरी ॥'**

हा तुकारामांचा अभंग;—यांचे तोंडवळे एकसारखे आहेत. मलूकदासानें लिहिलेला आळशी कामचुकारांचा मूलमंत्र हिंदी साहित्यांत सर्वत्र प्रसिद्ध आहे।

**अजगर करै न चाकरी, पंछी करै न काम ।**
**दासमलूका यों कहै, सबके दाता राम ॥**

---

५. टारे—टाळून; गरे—गळलीं; अरु—आणि; पंछी—पक्षी.

याचाच तुकारामांनीं आपल्या दोन अभंगांत भावानुवाद केला आहे :

**पक्षी, अजगर न करी संचित । तयासि अनंत प्रतिपाळी ॥**

आणि,

**पक्षीयांचें घरीं नाही सामुगरी । त्यांची चिंता करी नारायण ॥**
**अजगर जनावर वारुळांत राहे । त्याजकडे पाहे पांडुरंग ॥**

याप्रमाणें तुकारामांची हिंदी संतांच्या वाणीच्या द्वारें हिंदी भाषेशीं ओळख होती. त्यांतल्या त्यांत त्यांचा कबीराच्या वाणीशीं विशेष संबंध होता.

## तुकाराम व कबीर यांमधील साम्य

तुकारामांत व कबीरांत कांहीं बाबतींत अतिशय साम्य व कांहीं बाबतींत विलक्षण वैषम्य आहे. तुकाराम व कबीर दोघेहि संत व उपदेशक होते. दोघांचीं काव्यें अटपट आहेत. त्यांत पांचपेंच अथवा साहित्यसौंदर्य नाहीं. मनाला जें वाटलें, अनुभवाला जें पटलें तें सरळ भाषेंत आणि साध्या शब्दांत त्यांनीं सांगितलें आहे. तें सांगतांना त्यांनीं कृत्रिम छंदबंधनाची तमा बाळगली नाहीं. डफाच्या थापेंत जे शब्द सामावले ते कबीरानें लोकांच्या कानीं घातले,तर चिपळ्यांच्या तालांत जे शब्द बसले ते तुकारामांनीं श्रोत्यांना ऐकवले. जनतेला भक्ति ज्ञान-वैराग्याचा आदेश देतांना दोघांनींहि व्यवहार सोडला नाहीं. पाण्यांत राहूनही कमळाचें पान त्यापासून अलिप्त असतें किंवा धूरांत राहूनही अग्नी त्यापासून वेगळा असतो; त्याप्रमाणेंच हे दोघे संसारांत असूनहि त्यांत नसल्यासारखे होते. तुकारामांना भक्तिमार्गांत आपल्या अडाणी बायकोचा त्रास सोसावा लागला, तर कबीरांच्या मतांचें त्यांचा जाणता पुत्र कमाल यानेंच खंडन केलें. त्यासंबंधीं

**'डूबा वंस कबीर का । उपजा पूत कमाल'**

हें वचन प्रसिद्ध आहे. तुकाराम व कबीर दोघेहि क्षुद्र जातिभेद व मानीव स्पृश्या-स्पृश्यता यांच्या विरुद्ध होते. यासंबंधीं त्यांचे पुढील साम्यदर्शक उद्गार पहा :

**तुकाराम : तुम्ही नका करूं गर्व । उंच याती मिळुनी सर्व ॥**
**शुक्र शोणिताच्या खाणी । तुम्हां आम्हां एकच योनी ॥**
**रक्त मांस चर्म हाडें । सर्वां ठायीं समपाडें ।**

कबीर : एक बूंद एक मलमूतर एक चाम एक गूदा।
एक [६]जोति थैं सब उपजा कौन ब्राह्मन कौन सूदा ? ।।

दोघेही वैष्णव होते. त्यामुळें त्यांनीं वैष्णवांची स्तुति केली असून शाक्तादि पंथावर टीका केली आहे. अुदाहरणार्थ, कबीराचीं हीं वचनें घ्या :

कबीर [७]धनि ते सुन्दरी, जिनि जाया बैसनों पूत।
राम सुमिरै निरभै हुआ, सब जग गया अऊत।।
साकत ब्राह्मन मति मिलै, बैसनों मिलै चँडाल।
अंक माल दे भेटिये, मानौं मिलैं गोपाल।।

तुकारामांनीं कबीरांनाच दुजोरा दिला आहे :

वैष्णव चांभार धन्य त्यांची माता। शुद्ध उभयतां कुळयाती ।।

शाक्तांवर राग काढतांना कबीरानें त्यांना कुत्र्याचे भाऊबंद म्हटलें आहे :

साकत सूनहा[८] दोनों भाई। एक नीदैं एक भौंकत जाई ।।

तुकारामांनीं त्यांना उघड उघड गाढव म्हटलें आहे :

शाक्त गधडा जयें देशीं। तेथें राशी पापाच्या ।।

तुकाराम व कबीर दोघेही स्पष्टवक्ते व निर्भीड टीकाकार होते. समाजांतील सोंगाढोंगावर त्यांनीं आपल्या तीव्र वाणीचे फटकारे ओढले आहेत. समाजांतील एकूण एक अन्याय त्यांनीं वेशीवर टांगले आहेत. विशेषतः जोगी-जंगम, बुवा-बैरागी, मांत्रिक-ज्योतिषी, यति-संन्यासी, संसारी-कथेकरी इत्यादिकांच्या दांभिकतेचा त्यांनीं परिस्फोट केला आहे. नमुन्यादाखल दोघांच्या ढोंगी वैराग्यावरील मर्मभेदक टीका पहाः——

---

६ जोति—ज्योति; सूदा—शूद्र; गूदा—योनी; चाम—चामडें.

७ धनि—धन्यः; जाया—जन्म दिला; बैसनों—वैष्णव; सुमिरै—स्मरण करून; निरभै—निर्भय; साकत—शाक्त; मति—नको.

८ सूनहा—श्वान; नीदैं—निजतो.

(१) साधु भया तो क्या हुआ, माला पहिरी[१] चार।
बाहर भेस बनाइया, भीतर भरी भँगार॥
माला तिलक लगाइके, भक्ति न आई हाथ।
दाढी मुँड मुँडाइके, चले दुनीके साथ॥
दाढी मूँछ मुँडाइके हूआ घोटमघोट।
मनको क्यों नहिं मुँडिए, जामें भरिया खोट॥
मूँड मुँडाए हरि मिलै, सब कोइ लेय मुँडाय।
बारबार के मूँडने, भैड न वैकुंठ जाय॥
केसन कहाँ बिगारिया, जो मुँडौ सो बार॥
मनकों क्यौं नहिं मुँडिये, जामें विषैबिकार॥

(२) मन न रँगाये रँगाये जोगी कपरा।
आसन मारि मँदिरमें बैठे,
नाम छाडि पूजन लागे पथरा।
कनवा फड़ाय जोगी जटवा बढौ ले,
दाढि बढाय जोगि होइ गैले बकरा।
जंगल जाय जोगी धुनिया रमौ लै,
काम जराय जोगी बनि गैले हिजरा।
मथवा मुडाय जोगी कपड़ा रँगौले,
गीता बाँचिकै होइ गैले लबरा।
कहत कबीर सुनो भाई साधो,
जम दरवजवाँ बाँधल जैबे पकरा॥

---

९ पहिरी–घातली; भेस--वेष; भँगार–भांगेची नशा; दुनी–दुनिया, संसार; खोट–खोटेपणा, लबाडी; भया–झाला; मथवा–माथें, डोकें; हिजरा–नपुंसक; जम–यम; भैड–मेंढरें; बिगारिया–बिघडलें; विषैविकार–विषय व विकार; सो बार–शंभर वेळां; कनवा–कान; धुनिया–धुनी, आगोटी; रमौले–पेटवलें; लबरा—-वाचाळ; पकरा–पकडील

(१) स्नान संध्या टिळेमाळा। पोटीं क्रोधाचा उमाळा॥
(२) मुद्रा लाविती कोरोनि। मान व्हावयासी जनीं॥
(३) भांग भुर्का[९] हें साधन। पचनीं पडे मद्यपान;
(४) अंतरीं पापाच्या कोढी। वरी बोडी डोई दाढी॥
जें बोडिलें तें निघालें। काय सांग पालटलें॥
(५) होउनि संन्यासी भगवी लुगडीं।
वासना न सोडी विषयांची॥
(६) कान फाडूनियां मुद्रा ते घालिती।
नाथ म्हणवती जगामाजीं॥
(७) लांब लांब जटा काय वाढवूनि।
पावडें घेउनि क्रोधें चाले॥
(८) दाढी डोई मुंडी मुंडुनिया सर्व।
पांघुरती बरवें वस्त्र काळें॥

## ज्ञानाश्रयी कबीर, भावजीवी तुकाराम

तुकाराम व कबीर या दोघां सूक्तिकारांचें अनेक बाबतींत असें साम्य असलें, तरी कांहीं बाबतींत वैषम्य देखील आहे. कबीर हा निर्गुणाचा उपासक व विशिष्ट तत्त्वांचा प्रणेता होता, तर तुकाराम हे सगुणोपासक व विशिष्ट मतप्रणालीचे प्रचारक होते.

सुन्दर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां॥

अशी तुकारामांनीं आपल्या आराध्याची आराधना केली आहे.

जाके मुँह[१०]—माया नहीं, नाहीं रूप–कुरूप।
पुहुपवास तें पातरा, ऐसा तत्त्व अनूप॥

---

९ भुर्का—तमाखूचा फक्का; कोढी—कोटी, राशी.

१० मुंह—मुख, तोंड; पुहुपबास—पुष्पसुवास ; पातरा—पातळ.

चार भुजाके भजनमें, भलि परे सब संत।
कबिरा सुमिरै तासुको, जाके भुजा अनँत॥
पानीहूँ ते पातला, धूआँ हूँ ते झीन।
पवन हुँ ते अतिऊतला, दोस्त कबीरा कीन॥
आदि होत सब आपमैं, सकल होत तामाँहि।
ज्यों तरवरके बीजमें, डार पात फल छाँहि॥

अशी कबीरानें आराधना केली आहे. कबीर हा त्याच्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या एका विशिष्ट पंथाचा प्रवर्तक होता. उलट तुकाराम हे वारकरी संप्रदायाचे एक अनुयायी होते. तुकारामांची वाणी बहुतेक स्थळीं प्रेमळ असून प्रसंगविशेषानें कठोर बनली आहे. उलट कबीराची वाणी बहुतेक ठिकाणीं रूक्ष असून प्रसंगोपात्त सरस उतरली आहे. कबीराच्या काव्यांत क्वचित् गूढवाद आहे. काळ समीप आला हें सांगतांना तो रुपकात्मक भाषा प्रयुक्त करतो :

'माली आवत देखि कै कलियाँ करी पुकार।
फूली फूली चुनि[११] लिये, कालि हमारी बार॥'

उलट 'नको नको मना ! गुंतूं मायाजाळीं। काळ आला जवळीं ग्रासावया॥' अशा सरळ भाषेचा तुकाराम अवलंब करतात. जिवा-शिवांच्या भेटी-गांठीचें वर्णन करतांना तुकारामांनीं उपमा-अलंकारांची सरळ भाषा योजिली आहे :

'कन्या सासुऱ्याशी जाए। मागें परतून पाहे॥
तैसें झालें माझ्या जिवा। केव्हां भेटसी केशवा॥'

हीच गोष्ट आडपडद्यानें सांगतांना कबीरानें एका नवविवाहिता वधूच्या तोंडीं पुढील गीत घातले आहे :

---

झीन–क्षीण, बारीक; ऊतला–चंचल, उतावळा; कीन–केला; डार–डहाळी; छाहिं–छाया; भूलि परे–विस्मरण पावले.

११ फूलि फूलि–फुललेल्या ; चुनि लिअे–वेंचून घेतल्या; कालि–उद्यां; बार–पाळी.

'दुलहिनि[१२] गावहुँ मंगलचार। हम घरि आये राजाराम भ्रतार॥'
कबीराचें काव्य ज्ञानाश्रयी आहे. त्यांत हृदयंगम 'माधुर्यभाव' नाहीं असें नाहीं :

बिरहिन[१३] देय सँदेसरा, सुनो हमारे पीव।
जलबिन मच्छी क्यों जिये, पानीमें का जीव॥
अँखिया तो झांई परी, पंथ निहार निहार।
जीहडियाँ छाला पडा, नाँव पुकार पुकार॥

परंतु तो ज्या प्रमाणांत तुकारामांत आहे, त्या प्रमाणांत कबीरांत त्याचा आढळ होत नाहीं. तुकाराम भावजीवी आहेत. त्यांच्या काव्यांत ज्ञानाची मात्रा कमी आहे. परतु उपर्युक्त प्रकारचा 'माधुर्यभाव' ओतप्रोत भरला आहे. या विधानाची साक्ष हा अभंग देईल :

वाटुली पाहतां सिणले डोळुले। दाविसी पाउलें कै वो डोळां॥

## गाढ अनुभूतीचा खोल ठसा

तुकाराम व कबीर हे दोघे अजून लोकप्रिय आहेत. याचें कारण त्यांचें कवित्व स्पष्ट व प्रभावशाली आहे. त्यांचें विषयप्रतिपादन निर्भीक असून त्यावर त्यांच्या गाढ अनुभूतीचा खोल ठसा उमटला आहे. त्यांचा अनुभव सत्यावर अधिष्ठित असून सर्वव्यापी आहे. तो निवेदन करतांना त्यांनीं तो काव्याहून सरस व कलेहून सुंदर वठवला आहे. एखाद्या तत्त्वाचें प्रतिपादन करतांना तुकाराम व कबीर त्याच्या जोडीला रोजच्या व्यवहारांतील उपमा-दृष्टान्त अशा रीतीनें मांडतात कीं श्रोत्यांच्या अंतःकरणावर त्यांचा अमोघ परिणाम होतो. उदाहरणार्थ, 'ज्याच्या ठिकाणीं भक्तिभाव नाहीं त्याचा देह श्वास घेत असून सुद्धां स्मशानाप्रमाणें आहे' हें सांगतांना कबीरानें लोहारा-

---

१२ दुलहिनि—वधू.

१३ बिरहिन देय सँदेसरा—विरहिणी निरोप पाठवत आहे; पीव—प्रियकरा; अँखिया—डोळे; झांई—झांपड; निहार—न्याहाळून; जीहडियाँ—जिव्हेला; छाला—लहान लहान खळगे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.



अनुक्रम ............ वि: ............ क्रमांक ............ नों. दि. ............

च्या भात्याची उपमा योजिली आहे, ती किती अन्वर्थक व नवीन आहे तें पहा :

जा घट[14] प्रेम न संचरै, सो घट जान मसान ।
जैसे खाल लुहारकी, साँस लेत बिन प्रान ।।

'हा बद्ध व हा मुक्त आहे या शाब्दिक वादांत कांहीं अर्थ नाहीं' हें सांगतांना तुकारामांनीं पुढील समर्पक व मौलिक दृष्टान्त दिले आहेत :

खापराचे होन खेळती लेंकुरें । कोण त्या वेव्हारें लाभहानी ।।
मंगलदायक करिती कुमारी । काय त्यांची खरी सोयरीक ।।
सारीं[15] झालीं मेलीं लटिकें वचन । बद्ध मुक्त शीण तुका म्हणे ।।

तुकारामांचें यांतील सूक्ष्म निरीक्षण पाहिलें म्हणजे मन क्षणभर आश्चर्यानें थक्क होतें. जनसाधारणांच्या मनाची पकड पक्की घेतल्यामुळेंच तुकाराम व कबीर यांच्या काव्यांचें नकळत आधुनिकीकरण झालें आहे. त्यांच्या लोकप्रियतेचा अवास्तव फायदा घेऊन कांहीं आचरटांनीं आपल्या थातुरमातुर कृती त्यांच्या प्रातःस्मरणीय नांवाखालीं 'दडपश्चमे' केल्या आहेत. त्यामुळें त्यांच्या काव्याचा अभ्यास करतांना अतिशय सावध रहावें लागतें.

## दोघांनी दिलेल्या दृष्टान्तांतील सादृश्य

कबीरानें तुकारामाप्रमाणेंच स्फुट रचना केली आहे. त्यानें निरनिराळ्या दृष्टांतांनीं निरनिराळ्या विषयांचें निरूपण केलें आहे. त्याच्या निरूपणांत ईश्वर, नाम, स्मरण, भक्ति, सद्गुरु, साधु, दुर्जन इत्यादि विषय आहेत. या विषयांचीं लक्षणें त्यानें दृष्टांताच्या द्वारें स्पष्ट केलीं आहेत. त्यांना कबीरपंथांत 'अंग' अशी संज्ञा आहे. या दृष्टान्तांपैकीं कांहींचा तुकारामांनीं आपल्या काव्यांत उपयोग केला आहे. ईश्वराच्या सर्वशक्तिमत्ते-विषयीं कबीर म्हणतो :

---

१४ घट—शरीर ; खाल—वारा भरण्याचा भाता.

१५ सारीं—सारीपटाच्या, सोंगट्याच्या खेळांत; झालीं मेलीं— (नरद किंवा सोंगटीस उद्देशून).

**‘साहेब[१६] सों सब होत हैं, बंदे तें कछु नाहिं।**
**राई तें पर्वत करे, पर्वत राई माहिं॥’**

याचाच तुकारामांनी पुढील अनुवाद केला आहे :

**तुज केलिया नव्हे ऐसें काई। डोंगराची राई क्षणमात्रे॥**

ईश्वर हा सर्वव्यापी आहे या विषयीं ते दोघे म्हणतात :

**वारी[१७] तेरे नामपर, जित देखूं तित तूं। —कबीर**
**जेथें देखें तेथें तुझींच पाउलें॥ —तुकाराम**

ईश्वर हा पति व भक्त हा पत्नी आहे. त्यांच्या अन्योन्य प्रेमसंबंधांविषयीं दोघांची एकवाक्यता आहे :

**पतिवरता पतिको भजै, और न आन सुहाय —क०**
**पतिव्रता नेणे आणिकांची स्तुति।**
**सर्व भावें पती ध्यानीं मनीं॥ —तु०**

आत्मानुभवासंबंधीं दोघांचें विवरण सारखेंच आहे :

**आतमअनुभवज्ञानकी जो कोइ पूछै[१८] बात।**
**सों गुंगा गुड खाईके कहै कौन मुखस्वाद॥ —क०**
**खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं। —तु०**

ईश्वराशीं तदाकार होण्याबाबत दोघांनींही मीठ पाण्याचा दाखला दिला आहे :

**नोंन[१९] गला पानी मिला, बहुरि न भरि है गौन।**
**सुरतशब्द मेला भया, काल रहा गहि मौन॥—क०**
**मीठ सागरीं मिळालें। नाहीं परतोनी आलें॥**
**रूपीं रूप बहाल जरी। चुके जन्ममृत्यू फेरी॥—तु०**

---

१६ साहेब–श्रेष्ठ, ईश्वर; बंदा–भक्त.

१७ वारी–कुर्वंडी जाणें; जित-तित–जेथें-तेथें; सुहाय–आवडणें.

१८ पूछै–पुसे, विचारी; गुंगा–मूक; गुड–गूळ.

१९ नोंन–लवण, मीठ; बहुरि–पुन्हा; गौन–गमन करून, परतून; मेला–मीलन; भया–झालें; गहि–ग्रहण करून, धरून.

ईश्वर हा प्रत्येकाच्या अन्तर्यामीं वास करीत आहे. परंतु भ्रांतीमुळें तो कोणास ओळखतां येत नाहीं. हें सांगतांना कबीरानें जो दृष्टान्त दिला आहे;

**तेरा साँई[२०] तुज्झमें, ज्यों पुहूपनमें बास।**
**कस्तूरीका मिरग ज्यों फिरफिर ढूँढ़ै घास॥**

तोच तुकारामांनीं आपल्या एका अभंगांत दिला आहे:

**देहीं असोनियां देव, वृथा फिरतो निदैंव।**
**देव आहे अन्तर्यामीं, व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं।**
**नाभीं मृगाचे कस्तूरी, व्यर्थ हिंडे वनांतरीं॥**

देवाचें नाम व स्मरण यांविषयीं दोघांचें म्हणणें सारखेंच आहे. दोघांनींहि भक्तीचा महिमा वर्णन केला आहे. कबीरानें तिच्याविषयीं म्हटलें आहे:

**भुक्ति मुक्ति माँगौ नहीं, भक्तिदान दै मोहिँ[२१]**
**और कोइ याचौ नहीं, निसदिन याचौ तोहिँ॥**

तुकारामांनीं याच भावार्थाची प्रार्थना केली आहे:

**हेंचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥**
**न लगे मुक्ति धनसंपदा। संत-संग देई सदा॥**

भक्तीबरोबरच त्यांनीं साधुत्वाची प्रशंसा केली आहे. साधुत्व कसें असावें यासंबंधीं दोघांची अगदीं एकवाक्यता आहे. कबीर म्हणतो:

**उदर समाता अन्न लै, तनहि समाता चीर[२२]**
**अधिकहि संग्रह ना करै, ताका नाम फकीर;**
**वादविवादे विष घना, बोले बहुत उपाध**
**मौन गहै सबकी सहै, सुमिरै नाम अगाध।**

---

२० साँई—स्वामी; ज्यों पुहुपनमें बास—जसा पुष्पांत सुवास; मिरग—मृग; ढूँढ़ै—धुंडी, शोधी; घास—चारा.

२१ मोहिं-तोहिं—मला-तुला.

२२ चीर—वस्त्र; घना—पुष्कळ करून; गहै—ग्रहण; सहै—सहन करतो, सोसतो.

अगदीं असेच तुकारामाचे उद्‌गार आहेत :

**निर्वाहापुरतें अन्न–आच्छादन । आश्रमासी स्थान कोपी गुहा ।।**
**कोठेंहि चित्तासी नसावें बंधन । हृदयीं नारायण सांठवावा ।।**
**नये बोलों फार बैसों जनामधीं । सावधान बुद्धी इंद्रियदमीं ।।**

संतांची व सत्संगाची दोघांनींहि सारख्याच शब्दांत स्तुति केली असून साधूंच्या समागमांत असज्जनही साधु होतात असें सांगितलें आहे. यासंबंधी कांहीं उतारे पहा :

**(१) साधु गाँठि[२३] न बाँधई, उदर समाता लेय ।**
**आगेपाछे हरि खड़े, जब माँगे तब देय ।।**
**जीवन्मुक्तै ह्वै रहै, तजै खलकको आस ।**
**आगे पीछे हरि फिरै, क्यों दुख पायै दास ।। —क०**

**भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश निवारूनी ।।**
**निर्वाणीं गोविंद असें मागें पुढें । कांहींच सांकडें पडों नेदी ।। —तु०**

**(२) कबिरा खाईकोटकी,[२४] पानी पिबै न कोय ।**
**जाय मिलै जब गँगसे सब गंगोदक होय ।।**
**कबिरा चँदनके निकट, नीम भी चँदन होय ।**
**सरिता ओहळ ओघा । गंगे मिळोन झाल्या गंगा ।।**
**चंदनाच्या वासें । तरु चंदन झाले स्पर्शें ।।**

**समानार्थक अवतरणें :**

तुकाराम व कबीर यांनीं भक्तीचा व साधुत्वाचा जसा डांगोरा पिटला आहे तसा बेगडी भक्ति व दुर्जनत्व यांचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. दुर्जनांचा सहवास अंतीं अहितकर असतो हें त्यांनीं दाखले देऊन पटविलें आहे. बेगडी भक्तीबद्दल ते दोघे म्हणतात :

---

२३ गाँठि–गांठोडें; लेय–घेतो; खड़े–उभे; खलक–जग, संसार.
२४ खाईकोट–खांचा, खळगे, डोह इत्यादि.
नीम–कडू लिंब.

देखादेखी भक्तिका, रँग नहीं ठहराय। —क०
तैसा भक्तिवाद काय, रंगबेगडीचा न्याय। —तु०

दुर्जन, त्यांचा न पालटणारा स्वभाव व कुसंग याबद्दल ते पुढें दिल्याप्रमाणें सारखेंच विवेचन करतात :

(१) मुखकी मीठो जो कहैं, हृदया है मति आन। —क०
तुका म्हणे पोटीं। भाव आणिक जया होटीं॥ —तु०

(२) जो विभूति[२५] साधुन तजी, तेहि विभूति लपटाय।
जोन वमन कर डारिया, स्वान स्वाद करि खाय॥ —क०

सुनीयांसीं क्षीर वाढिल्या ओकवी। भोग त्या पोसवी धणीवरी॥—तु०

(३) संगति भई तो क्या भया, हिरदा[२६] भय कठोर।
नौ नेजा पानो चढे, तऊ न भिजै कोर॥ —क०

दुष्टाचें चित्त न भिनें अंतरीं। जरी जन्मवरी उपदेशिला.॥
कुचर[२७] मूग नयेचि पाका। पाहतां सारिखा होता तैसा॥—तु०

ईश्वर हा सर्वांचा पालक आहे, जे त्याचे दास असतात, त्यांना चिंता वाहावी लागत नाहीं, हें तत्व कबीरानें पुढील प्रमाणें पुढें मांडलें आहे.—

कबीर का तूँ चितवैं, का तेरा चँत्या होई।
अणाँत्या हरिजी करै, जो तोहि चँत्या न होइ॥

ईश्वराच्या ठायीं असणारा हाच विश्वास तुकारामांनीं या शब्दांत व्यक्त केला आहे—

हरिचिया दासा नाहीं भय चिंता। दुःख निवारितां नारायण॥
न लगे वाहणें संसार उद्वेग। जडों नेदी पांग देवराया॥

---

२५ विभूति–भस्म; वमन–ओकारी; डारिया–टाकली.

२६ हिरदा–हृदय; नौ–नव, नवीन; नेजा–धान्य; तऊ–तरी; कोर–किंचित्.

२७ कुचर–न भिजणारें व शिजणारें धान्य.

पोट, मन, भिक्षा, कनक आणि कामिनी यांच्यावर दोघांनीं पुढील ताशेरे झाडले आहेत.—

पोट—इही उदरकै कारणै, जग जांच्यौ[२८] निसजाम ।
स्वामीपणो जु सिरि चढ्यौ, सन्या न एको काम ।। —क०
पोट लागलें पाठीसीं । हिंडवितें देशोदेशीं ।। —तु०

मन—बाजीगरका[२९] बँदरा, ऐसा जिउ मन साथ ।।
नाना नाच नचायिकै, राखै अपने हाथ ।। —क०
नसता अधिकार । उपदेशिसी बलात्कार ।।
तरि ते केले हो चार । माकडा आणि गारोडी । —तु०

भिक्षा—माँगन मरनसमान है, मत कोई माँगो भीख ।
माँगन तें मरना भला, यह सतगुरुकी सीख । —क०
भिक्षापात्र अवलंबणें । जळों जिणें लाजिरवाणें ।।
ऐसीयासी नारायणें । उपेक्षीजे सर्वथा ।। —तु०

कनककामिनी—चलों चलों सब कोई कहैं, पहुँचे बिरला कोय ।
एक कनक औ कामिनी, दुरगम घाटी दोय ।—क०
स्त्रिया, धन बा हें खोटें । नागवले मोठमोठे ।
म्हणोनी सांडा दोनी । सुख पावाल निदानी ।। —तु०

मनुष्यानें एकाच गोष्टीचा पिच्छा पुरवून ती साध्य करावी, हें तत्व कबीरानें ज्या शब्दांत सांगितलें आहे, त्याच शब्दांत तें तुकारामांनीं उपदेशिलें आहे :—

एकै साधे सब सधै, सब साधै सब जाय
जो तूं सिंचै मूलको, फुलै फलै अधाय

अशी कबीराची भाषा हिन्दी आहे, तर—

सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ।।
नको पृथकाचे भरीं । पडों, एक मूळ धरी ।।

---

२८ जांच्यौ—याचिलें; निसजाम—निशिदिनीं.

२९ बाजीगर—गारुडी.

ग्रं. क. २९५२३

अशी तुकारामांची भाषा मराठी आहे. शब्दांचें मूल्यमापन दोघांनीं सारखेंच केले आहे :—

सब्द बराबर धन नहीं, जो कोई जानै बोल;
हीरा तो दामौं मिलै, सब्दहि मोल न तोल ॥—क०

आम्हां घरी धन शब्दांचींच रत्नें ॥ —तु०

दोघांनाही उच्चारांआचारांतील विसंगति संमत नाहीं. जो वचनानुसार वागतो त्याच्याविषयीं दोघांनाही आदर आहे :—

कथनी[३०] मीठी खाँडसी, करनी विषकी लोय ।
कथनी तजि करनी करै, विषसे अमृत होय ॥—क०

विष खावें ग्रासोग्रासी । धन्य तोची एक सोसी ॥—तु०

या शब्दांत तो प्रकट झाला आहे. उलट बोलणें एक व करणें भलतेंच अशा कथेकऱ्यांबद्दल दोघांनीहि तिरस्कार व्यक्त केला आहे :—

करता दीसै कीरतन, उँचा करि करि तुंड ।
जाणै बूझै कुछ नहीं, यौंही आधा रुँड ॥—क०

आशाबद्ध वक्ता । भय श्रोतियांच्या चित्ता ॥
गातो तेंहि नाहीं ठावें । तोंड वासी कांहीं द्यावें ॥—तु०

निंदकांची स्तुति करतांना दोघेहि रंगले आहेत :—

निंदक नियरा[३१] राखिए, आँगन कुटी छँवाय ।
बिनपानी साबुनबिना, निर्मल करै सुभाय ॥
न्यंदक दूरि न कीजिए, दीजै आदर मान ।
निरमल तनमन सबकरै, बकिबकि आनहि आन ॥—क०

निंदक तो परउपकारी । काय वर्णूं त्याची थोरी ।
तो रजकाहुनी भला । परि सर्व गुणें आगळा ॥

---

३० कथनी–उच्चार, भाषण; करनी–करणी, कृति, आचरण; खाँड–साखर; सी–प्रमाणें; लोय–चिकट गोळा.

३१ नियरा–जवळ, शेजारीं; छँवाय–छावून, शाकारून; सुभाय–स्वभाव; बकिबकि–बडबडून; आनहि आन–वाटेल ते, भलतें सलतें.

नेघे मोल धुतो फुका। पाप वरच्यावरी देखा ॥
करितसे साधकां। शुद्ध सरिते तिहीं लोका ॥

सद्गुरुसंबंधीं दोघेही सश्रद्ध आहेत. त्यांचा महिमा दोघांनीं सारखाच वर्णन केला आहे.—

पारसमैं अरु सँतमैं, बडो अंतरो जान।
वह लोहा कंचन करै यह करै आपसमान ॥

सद्गुरूवांचूनी सांपडेना सोय। धरावे ते पाय आधीं त्यांचे ॥
आपणांसारिखे करिती तात्काळ। नाहीं काळवेळ तयांलागीं ॥

नम्रत्वाविषयीं प्रश्नच नाहीं. मनुष्यानें लीनतेंत समाधान मानावें. त्यानें सदैव नम्र असावें याविषयीं दोघांचें मतैक्य आहे. तें दोघांनीं पुढील शब्दांत प्रकट केलें आहे :—

लघुता[३२] तें प्रभुता मिलै, प्रभुता तें प्रभू दूरि।
चींटी लै शक्कर चली, हाथींके सिर धूरि ॥
कबीर कूता राम का, मुतिया[३३] मेरा नाँउ।
गले रामकी जेवडी[३४], जित खैंचे तित जाऊँ ॥—क०
लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा ॥
ऐरावत रत्न थोर। तया अंकुशाचा मार ॥
तुझे दारींचा कुतरा। नको मोकलूं दातारा ॥—तु०

आतांपर्यंतच्या समानार्थक अवतारणांवरून कबीराचा तुकारामांवर केवढा प्रभाव पडला होता तें स्पष्ट होईल.तुकारामांची हिंदी भाषेशीं कामचलाऊ ओळख होती हें यावरून दिसून येतें. पूर्वगामी ग्रंथकारांच्या कृतींचा व्यासंग हा प्रतिभा-साधनाचा एक मार्ग आहे. जगांतील कोणत्याही श्रेष्ठ साहित्यिकांची कृति पहा; तिच्यांत त्याच्या परिशीलनाचें पुसट प्रतिबिंब पडलें आहे हें सहज लक्षांत येईल.

—**नवभारत**. ऑगष्ट १९४९

● ● ●

---

३२ लघुता—लहानपण; प्रभुता—मोठेपणा; चींटी—मुंगी; धूरि—अंकुश.
३३ मुतिया—मोत्या. ३४ जेवडी—पट्टा, सांखळी.

# ६

# कवयित्रींची परंपरा

महाराष्ट्रांतील नद्यांचा जीवनौघ अखंड वाहणारा नाहीं. बरड व खडकाळ पात्रांतून मार्ग काढावा लागत असल्याने तो ठिकठिकाणीं खंडित झाला आहे. कुठे विशाल शिळांच्या कवेलगत असणाऱ्या सखल भागीं त्याचे अथांग डोह बनले आहेत, तर कुठे उतरंडीकडे पसरत जाणाऱ्या सपाट जागांवर त्यांचे पाट झुळझुळत आहेत. कुठे कुठें या पाटांच्या मध्येंच मदारीप्रमाणें उंच उठल्यामुळें कातळांच्या टेंगळांचीं बेटें तयार झालीं आहेत. पावसाळ्याचे चार महिने वगळले, तर इतर आठ महिन्यांत त्यांचे प्रवाह अनिरुद्ध वाहतांना क्वचितच दृष्टीस पडतील. नद्यांप्रमाणेंच हुबेहूब **महाराष्ट्रांतल्या कवयित्रींच्या परंपरेची स्थिति** आहे. कवींच्या परंपरे प्रमाणें ती अभंग नाहीं. त्रुटित आहे. याचें कारण काय? कवींच्या परंपरेचा विचार करूं लागलों, तर ज्याप्रमाणें महानुभावांचा काळ, ज्ञानदेव-नामदेवांचा काळ, एकनाथांचा काळ, तुकाराम-रामदासांचा काळ, श्रीधरांचा काळ, मोरोपंतांचा काळ, शाहीरांचा काळ, आधुनिकांचा काळ हे परंपरागत कालविभाग नजरेसमोर येऊन त्या त्या काळांतील विशिष्ट कवींच्या कृति अंतःकरणांत उचंबळूं लागतात, त्याप्रमाणें कवयित्रींच्या मालिका आठवत नाहींत. कवींच्याच काळांत उदयास आलेल्या कांहीं कवयित्रींचीं नांवें ध्यानांत येतात हें खरें; पण तीं दोन पंजांच्या बोटांवर मोजण्याइतपत तरी भरतील कीं नाहीं याची शंकाच वाटते.

प्रसिद्ध कवयित्री आणि त्यांचीं काव्यें यांचें मोजमाप केल्यास प्रथम **महानुभावपंथीय महदंबेचें स्मरण** होतें. त्या पंथाचे संशोधक महदंबेचा काळ

तेराव्या शतकांत धरतात. महदंबा ही महानुभावपंथाचे आद्य आचार्य नागदेव यांची चुलत वहीण होय. हिचें मूळ नांव रूपाई. परंतु हिची आजी महदंबा ही कन्हरदेव व महादेव यादव यांच्या राजवटींत विदुषी म्हणून ख्यात होती. तेव्हां महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीमच्चक्रधर यांनीं हिला गुरुमंत्र देतांना त्याच नांवानें संबोधलें. अर्थात् पुढें व्यवहारांत तेंच नांव रूढ झालें. एकदां चक्रधरांचे गुरु गोविंद प्रभु यांनीं श्रीकृष्णांच्या विवाहाचा उत्सव केला. त्या प्रसंगीं श्रीकृष्ण हे विवाहास सिद्ध झाले आहेत अशी कल्पना करून त्यांनीं महदंबेस करवली या नात्यानें गाणीं गाण्यास सांगितलें. त्या वेळीं तिनें निर्मळ भावानें श्रीकृष्णकथापर जीं गाणीं रचलीं, तीं 'धवळे' म्हणून प्रसिद्ध आहेत. 'धवळे' म्हणजे श्रीकृष्णांच्या कीर्तीचे स्तोत्र. कारण संस्कृत साहित्यशास्त्र्यांनीं कीर्तीचा लाक्षणिक रंग 'धवल' मानला आहे. हे 'धवळे' कोमल कल्पनांनीं अथवा सुंदर शब्दांनीं मन आकृष्ट करतात असें मुळींच नाहीं. उलट जुनाट भाषा व पद्य म्हणण्याच्या चालीचें अज्ञान यामुळें ते दुर्बोध व नीरसच वाटतात; परंतु आद्य कवयित्रीचें काव्य या दृष्टीनें त्यास महत्त्व आहे. महदंबेची चुलत बहीण **उमांबा** हिचीहि एक चौपदी उपलब्ध आहे. परंतु ती हिंदीमिश्रित गुजराथी भाषेंत असल्यामुळें मराठीच्या दृष्टीनें तिला यत्किंचित् महत्त्व नाहीं.

महदंबा तेराव्या शतकाच्या उत्तरार्धांत नांवारूपास आली, तर— **मुक्ताबाई व जनाबाई** या दोन अजरामर कवयित्री चवदाव्या शतकाच्या पूर्वार्धांत प्रसिद्धि पावल्या. मुक्ताबाई ही निवृत्तिनाथ, ज्ञानदेव व सोपाननाथ यांची सर्वांत धाकटी बहीण. ही आपल्या भावांप्रमाणेंच भक्तिमार्गाची अनुयायी असून विरक्त वृत्तीनें आयुष्य व्यतीत करणारी बालसंन्यासिनी होती. ही आमरण कुमारी होती. तेव्हां हिला कुमारी कवयित्री म्हणण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं. निधनकालींहि हिचें वय सोळा वर्षांहून अधिक नव्हतें. हिची बहुतेक रचना नितांत मधुर असून तींत ठिकठिकाणीं स्त्रीस्वभावसुलभ मार्दवाची रमणीय छटा प्रतिबिंबित झाली आहे. त्यांतल्या त्यांत हिचे 'ताटीचे अभंग' विशेष लोकविश्रुत आहेत. एकदां कुणा कर्मठ टवाळखोरानें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
अनुक्रम ...................... दि: ...................



ज्ञानदेवांची संन्याशाचें पोर म्हणून कुचेष्टा केली; त्यामुळें ते विषण्ण होऊन आपल्या खोलीची दरवाजेवजा लहान 'ताटी'. लोटून आंत बसले. त्यांनीं प्रसन्न चित्तानें बाहेर यावें याकरितां मुक्ताबाईनें त्यांचीं नाना तऱ्हेनें आर्जवें केलीं. तींच आर्जवें सध्यां 'ताटीचे अभंग' म्हणून विख्यात आहेत. 'ताटि उघडा ज्ञानेश्वरा!' हें या अभंगांतलें पालुपद आर्ततेनें ओथंबलेलें असून प्रेमळ अंतःकरणाचा ठाव घेणारें आहे. जनाबाई हिचीच समकालीन होय. ती सुप्रसिद्ध संत नामदेव यांस चंद्रभागेच्या पवित्र वाळवंटांत सांपडलेली बेवारशी मुलगी होती. नामदेवाच्या कुटुंबांतच तिचें लालनपालन झालें व त्यांतच ती सेवाशीलाचा स्वीकार करून आजन्म राहिली. नामदेवाची आई गोणाई व बायको राजाई याहि अभंग रचत. त्यांच्याच सान्निध्यांत जनाईची प्रतिभा उन्मेष पावली. हिनें कृष्णभक्तिपर अनेक अभंग रचले असून ते सर्व प्रेमळ भावांनीं उचंबळलेले व मधुर रसांनीं थबथबलेले आहेत. जनाईची करुणकोमल कृति विलक्षण प्रभावशाली आहे. आजमितीस सहाशें वर्षांचा अवधि लोटला, परंतु तिच्या अभंगांनीं भाविक हृदयाची जी पकड घेतली आहे. ती अजून तशीच कायम आहे. तिच्या भावनांच्या उत्कटतेला व वाणीच्या स्वारस्याला वाङमयांत दुसरी जोड नाहीं. या विधानाचें प्रत्यंत्तर द्यावयाचें झाल्यास सर्वांच्या तोंडीं खिळलेल्या तिच्या अनेक अभंगाकडे अंगुलिनिर्देश करतां येईल. केवळ लोकप्रियतेच्या बाबतींतच नव्हे, तर इतर अनेक बाबतींत सुद्धां मुक्ताबाई व अन्य कवयित्री तिच्या मागें पडतात. 'ये ग! ये ग! विठाबाई,' 'घार हिंडते आकाशीं,' 'गंगा गेली सिंधुपाशीं' इत्यादि तिचे अभंग माहीत नाहींत असा रसिक विरळा. उत्तर हिंदुस्थानांत जशी 'गिरधर नागराची मिरा' सर्वपरिचित आहे, तशीच दक्षिणेंत 'नामयाची जनी' अनेकांच्या घरोब्याची आहे. 'माझी आंधळ्याचीं काठी—अडकली कवणें बेटीं?' या तिच्या हृदयस्पर्शी अभंगांत तर तिनें कल्पनेची कमाल केली आहे. 'चारी बाजूंनीं पाण्यानें वेढ़लेलें बेट व त्यांत अडकलेली कळकीची काठी—आंधळ्याचा एकमेव आधार!' इतकी निरुपम अभिनव व अनुभवजन्य रूपकात्मक कल्पना अन्य कवि-कवयित्रींना स्फुरलेली आढळत नाहीं.

'याती शुद्ध नाहीं भाव—दुष्ट आचरण स्वभाव' याप्रमाणें स्वतःच्या तिरस्कृत व पतित वेश्यावृत्तीचा प्रांजल कबुलीजबाव देऊन मुक्तमनानें भक्तिभावाचा छंद घेणारी मंगळवेढ्याची कान्होपात्रा याच काळाच्या अखेरीस होऊन गेली. यानंतरच्या जवळ जवळ अडीचशें-तीनशें वर्षांच्या अवधींतल्या एकाहि कवयित्रीचें नांव ऐकूं येत नाहीं. त्यास तसें सबळ कारणहि आहे. तें म्हणजे मुसलमानी सत्तेचें दक्षिणेवरील आक्रमण होय. चवदाव्या शतकाच्या आरंभापासूनच महम्मदीयांच्या स्वाऱ्या महाराष्ट्रावर होऊं लागल्या, त्या सतराव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत होत होत्या. या धामधुमीच्या काळांत मराठ्यांना साहित्य निर्मितीस आवश्यक अशी वेळ विश्रांति मिळाली नसल्यास नवल नाहीं. मुसलमानी सत्तेच्या जुलुमानें फक्त त्यांच्या राजकारणासच जबरदस्त धक्का बसला असें नाहीं, तर त्यांच्या विचार, उच्चार, आचारांवरहि चिरकालीन परिणाम झाला. परक्यांच्या राजकीय धोरणापासून प्राण सुरक्षित ठेवणें जेवढें युक्तीचें होतें, तेवढेंच त्यांच्या पाशवी अत्याचारांपासून स्त्रियांचें शील पवित्र राखणें शक्तीचें होतें. अर्थातच या नवीन राज्यक्रांतीपासून स्त्रियांना पूर्वीची मुभामोकळीक राहिली नाहीं. पुरुषांनीं घराबाहेर हिंडून प्राणसंरक्षण करण्याचें कार्य आपल्या शिरावर घेतलें, तर स्त्रियांवर घरांत राहून संस्कृतिसंवर्धन करण्याची जबाबदारी येऊन पडली. पातिव्रत्यरक्षणाच्या निमित्तानें दक्षिणी स्त्रियांवर मुसलमानी बायांतील पडद्याच्या प्रथेचा परिणाम झाला नाहीं हें खरें; परंतु परदेशी पुरुषांसमोर राजरोस वावरणें त्यांना कठीण झालें व त्यामुळें त्यांच्या वाचा मुक्तकंठानें आपलीं भावभरित मंजुल गाणीं आळवण्यास असमर्थ ठरल्या.* मुसलमानी अमलानें स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याचें हरण केलें व अशा प्रकारें त्यांच्या स्वच्छंद प्रतिभेस पायबंद घातला हें ज्याप्रमाणें सत्य आहे, त्याचप्रमाणें त्यांच्या

---

*कांहीं खानदानी मराठा घराण्यांत पडद्याची चाल आहे. ती शील संरक्षणाच्या निमित्तापेक्षां सत्ताधीशांच्या अनुकरणानें रूढ झाली आहे. बडे करतील तें चोखडें हा न्यायच आहे.

आगमनानें विलासप्रिय वृत्तीस साजेल अशा वैषयिक भावनांना विशेष ऊत आला हेंहि सत्य आहे. मराठ्यांचा मुलूख मुळचा विरक्तिमार्गांतला. परंतु मुसलमानी समाजाच्या सहवासांत तो आसक्तीच्या बाजूस झुकला. स्त्रिया या स्वभावतःच संकोचित असतात. त्यांच्या ठिकाणीं पुरुषांचा निर्भीडपणा नसतो. अर्थातच त्यांना मुसलमानी कारकीर्दीपूर्वीच्या अनुकूल वातावरणांत जशी वैराग्यपर कविता सहजगत्या लिहितां आली, तशी ती त्यानंतरच्या प्रतिकूल परिस्थितींत निर्माण करतां आली नाहीं. पुरुषांना शृंगारिक कविता रचतांना संकोचित होण्याचें प्रयोजन नसतें. स्त्रियांची गोष्ट अगदीं वेगळी आहे. त्या सहसा शृंगारिक काव्य रचण्यास धजणार नाहींत. अर्थातच या काळांत कवयित्रींचा अभाव दिसावा हें अगदीं साहजिक आहे.

या मधल्या अडीचशे-तीनशे वर्षांच्या रूक्ष व अफाट वाळवंटानंतर कवयित्रींच्या परंपरेची धारा जी दृष्टीस पडते, ती एकदम सतराव्या शतकांत. या सुमारास **वेणूबाई, बयाबाई** व **अम्बाबाई** या श्रीसमर्थ रामदासांच्या शिष्या प्रसिद्धि पावल्या. ‘देह माझा, मन माझें सर्व नेलें गुरुराजें’ अशी आपल्या गुरुची गोडवे गाणारी वेणूबाई ही मूळ मिरजेची मुलगी असून कोल्हापूरास सासर असल्यामुळें पुढें तेथली रहिवाशी बनली होती. हिनें ‘सीतास्वयंवर’ हा चवदा समासांचा ग्रंथ रचला आहे. स्त्रीनें रचलेला प्रथम काव्यग्रंथ या दृष्टीनें यास विशेष महत्त्व आहे. या ग्रंथांत तिनें लग्नांतल्या सोहाळ्यांचें जें बारिकसारिक तपशीलवार पण सरस वर्णन केलें आहे; त्यावरून तिची सूक्ष्म दृष्टि व वेधक वर्णनपद्धति हीं प्रत्ययास येतात. बयाबाई व अंबाबाई यांची रचना त्यांच्या गुरुच्या लेखनपद्धतीप्रमाणेंच दाठर व खडबडीत आहे. यांची कांहीं रचना हिंदी भाषेंतहि आहे. **बहिणाबाई** व **प्रेमाबाई** या दोन नामवंत कवयित्री याच काळांत मोडतात. यांपैकीं पहिली तुकाराममहाराजांची शिष्या होती. हिनें आत्मचरित्र रचलें आहे. हिची वाणी आपल्या गुरुच्या वाणी-प्रमाणें साधीभोळी पण प्रेमळ आहे. ‘इमारत आली फळा’ या ओळीनें सुरू होऊन ‘तुका झालासे कळस’ या ओळीनें संपणारा व भागवतधर्माच्या संस्थापनेचा इतिहास सांगणारा एक अभंग पुरातन कालापासून प्रचलित आहे.

तो तुकोबांचा असावा अशी सर्वसाधारण समजूत आहे. पण वस्तुतः तो त्यांचा नसून हिचाच आहे. प्रेमाबाईची अधिक रचना उपलब्ध नाहीं. परंतु 'गडे ! हो कृष्णगडी अपुला—राजामथुरेचा झाला' हें तिचें गोड पद मात्र अखिल महाराष्ट्रास विदित आहे.

यानंतर पुन्हा दोन शतकें कवयित्रींच्या परंपरेचा मागमूस लागत नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्रजी काव्यांच्या परिशीलनानें अर्वाचीन मराठी कविता जन्म पावली. तिला गोंडस व बाळसेदार रूप देण्यास अनेक नामांकित कवींची कामगिरी कारण झाली. प्रामुख्यानें त्यांच्याच काव्यांपासून व क्वचित् जुन्यापुराण्या गाण्यांपासून स्फूर्ति घेऊन विसाव्या शतकाच्या प्रारंभीं काव्यक्षितिजावर कांहीं कवयित्री स्वयंप्रभेनें चमकूं लागल्या. त्यांत **लक्ष्मीबाई टिळक** व **लक्ष्मीबाई बेहेरे** या अग्रेसर होत. प्रेमळ पतीच्या साहचर्यांत लक्ष्मीबाई टिळकांना 'नरनारी संगम', 'मी तुझी मावशी' इत्यादि अनेक साध्या व सोप्या पण मन ओढून घेणाऱ्या कविता उत्स्फूर्त झाल्या. तर लक्ष्मीबाई बेहेरे या आपल्या पतीची सुप्त प्रतिभा जागृत करण्यास कारणीभूत झाल्या. टिळकांच्या वाणींत भावनांचा ओलावा आहे, तर बेहेऱ्यांच्या कवितांत कल्पनांची चमक आहे. टिळकांनीं ख्रिस्तवासी पतीच्या अपूर्ण राहिलेल्या 'ख्रिस्तायन' काव्याला शेवटास नेऊन आपल्या भावनांचें आर्द्रत्व लोकांच्या निदर्शनास आणलें, तर स्वर्गवासिनी बेहेऱ्यांनीं 'रामाचा हट्ट' ही लोकप्रिय कविता व 'चालक तो देव जगाचा—परि अर्थ मला देवाचा—ना कळे !' या कल्पनारम्य ओळी गुणगुणून आपल्या पतीनें गुंफलेल्या 'मोत्यांच्या माळे' वर ताण केली. या काळांतील **काशीताई हेर्लेकर, सिंधुसुता, काव्यकल्पलता सारजाबाई बापट, राधाबाई आपटे, लक्ष्मीबाई परांजपे, कृष्णाबाई गाडगीळ, सरस्वतीबाई भिडे** याहि कवयित्री विख्यात आहेत. त्यांतल्या त्यांत 'व्यर्थ जन्म माझा बाई—मायबाप चिंता नाही—निशिदिनीं' ही जुन्या वळणाच्या पांढरपेशा कुटुंबांतील उपवर मुलीच्या मनःस्थितीचें शब्दचित्र उमटवणारी कविता लिहिणाऱ्या शारदाबाई परांजपे व 'निज कांतेला डोहाळे अति प्रीतीं—सरदार शहाजी पुसती' हें सर्वश्रुत डोहाळगाणें रचणाऱ्या

**सत्यभामाबाई केतकर** धन्यवादास विशेष पात्र आहेत. या काळांत टिळक, बेहेरे, सुमंत, फणसे, रानडे इत्यादि अनेक कविकवयित्रींचीं जोडपीं प्रसिद्धीस आलीं. टिळक, केळकर, फणसे इत्यादिकांचीं तर कुटुंबेंच काव्यप्रांताची मिरासदार बनलीं. यावरून काव्यस्फूर्ति ही सहवासजन्य आहे असा सिद्धांत बांधल्यास तो वावगा ठरूं नये असें वाटतें. या सिद्धान्ताच्या पुष्टयर्थ प्राचीन कविमालेपैकीं सुप्रसिद्ध चार संतभावंडें व नामदेवांचें सर्व कुटुंब यांचीं उदाहरणें देतां येतील. अगदीं अलिकडच्या कवयित्रींत **कमलाबाई, विमलाबाई व अपर्णा देशपांडे, मनोरमाबाई नावलेकर, काशीताई नाटेकर, पद्मा, विमला भावे, सरस्वतीबाई सुभेदार** व **संजीवनी मराठे** यांचीं नांवें मोजतां येतील. यांत नावलेकर व मराठे या तर आघाडीस आहेत. या नामावलीवरून कवयित्रींच्या संख्येंत दिवसेंदिवस भर पडत असल्याचें दिसेल. परंतु त्यामुळें त्यांचा काव्यौघहि अव्याहत वाहात असावा अशी कल्पना केल्यास ती मात्र चुकीची ठरेल. कवितेकरितां कविता लिहिणें हें निराळें व तिच्यावरील उत्कट भक्तीमुळें तिची जोपासना करणें हें निराळें. या दृष्टीनें कवयित्रींच्या काव्यसंसाराकडे पाहिल्यास अजूनसुद्धां निराशाच पदरीं पडते असें म्हटल्यास तें अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं अशी खात्री आहे.

येथपर्यंतच्या संकलनात्मक इतिहासावरून कवयित्रींची परंपरा अखंड नाहीं हें सहज समजेल. आतां ती तशी कां नसावी याविषयीं चर्चात्मक मीमांसा करूं.

वस्तुतः कवितेचे व स्त्रियांचे संबंध अधिक जवळचे व जिव्हाळ्याचे आहेत. कवितेप्रमाणेंच स्त्रियाहि जात्याच कोमल आहेत. पुरुष कणखर असल्यामुळें समाजसंस्थेच्या आरंभापासूनच त्यांच्यावर युद्ध, शासन, राजकारण इत्यादि पराक्रमपूर्ण जबाबदारीच्या कामगिऱ्या सोंपवण्यांत आल्या आहेत. कलेच्या उपासनेसाठीं त्यांना सवड सांपडणें कठीण आहे. स्त्रियांची स्थिति याच्या अगदीं उलट आहे. त्यांच्या ठिकाणीं दया, प्रेम, क्षमा, शांति, सहिष्णुता इत्यादि अनेक गुणांचें स्वभावसिद्ध वास्तव्य आहे. त्यामुळें साहजिकच त्यांची वृत्ति कोमल, कलेच्या उपासनेस अनुरूप अशी आहे.

स्त्रियांना त्यांच्या व्यक्तित्वाचा विकास करण्याची संधि दिल्यास त्यांची कलोपासना निःसंशय फलद्रूप होईल. परंतु सर्वसामान्य मनुष्यांच्या संसारांत त्यांना तशा प्रकारची संधि मिळणें जवळ जवळ दुरापास्तच असतें. तेव्हां योग्य संधीचा अभाव हें कवयित्रींची परंपरा खंडित असण्याच्या अनेक कारणांपैकीं एक कारण असूं शकेल. वैदिक कालीन स्त्रियांस अशी संधि मिळत असावी असा कयास आहे. कारण त्यांच्या ज्या थोड्याफार कृति आज उपलब्ध आहेत, त्या कलेच्या सत्य, शिव व सुंदर या तीन कसोट्यांना पूर्णपणें उतरतील अशाच आहेत. यानंतरच्या बौद्धकालांत सुद्धां कलोपासनेच्या बाबतींत स्त्रियांना पूर्वीचीच संधि मिळाली होती. परंतु अखिल मानवजातीला कायम चिकटलेले जे दोन दुर्गुण—प्रमाद व स्खलन त्यांकडे मानस-शास्त्रदृष्ट्या न पाहतां मुद्दाम दुर्लक्ष करण्यांत आल्यामुळें इतर अनेक बाबतींत बौद्धसंस्कृति कुचकामाची ठरली व त्यामुळें स्त्री-पुरुषांचे सामाजिक संबंध दुरावून परस्परांतील स्नेहशील सहकारिता लोप पावली. स्त्रियांना चूल व मूल यांपलीकडे सामाजिक जीवन राहिलें नाहीं. तेव्हां स्त्री व पुरुष यांच्यांतील साहचर्याचा अभाव हेंहि खंडित परंपरेचें एक जादा कारण पुढें करतां येईल. या पुढच्या काळांत बौद्ध संस्कृतीच्या उच्चाटनार्थ आचार्यांचा अवतार झाला. परंतु लवकरच मुसलमानांचें आक्रमण झालें व त्यामुळें एकंदर इतिहासच पालटला. जिकडे तिकडे धामधूम माजली व लोकांना प्राणसंरक्षणावांचून दुसरें कांहीं सुचेनासें झालें. तेव्हां परकी सत्तेचें आक्रमण व तदनुषंगिक धामधूम हेंहि खंडित परंपरेचें तिसरें कारण आहे. या परकीय सत्तेबरोबर शृंगारिक काव्यांस ऊत आला. तो स्त्रियांच्या संकोचित स्वभावास मानवला नाहीं. याविषयींचें विवेचन वर आलेंच आहे. तेव्हां त्याची पुनरुक्ति करत नाहीं. मात्र शृंगाराचा ऊत, स्त्रियांचा संकोचित स्वभाव व त्यांच्या सामाजिक स्वातंत्र्याचें हरण हीं तीन अधिक कारणें उपर्युक्त तीन कारणांना जोडणें अतिशय आवश्यक व महत्त्वाचें आहे. याशिवाय स्त्रियांच्या विशिष्ट परिस्थिती-पासून प्रसव पावणारीं कांहीं कारणें त्यांच्या खंडित परंपरेस मूलभूत म्हणून दाखवतां येतील. घरांतील चुलीपाशीं सदासर्वदा वावरावें लागत

असल्यानें त्यांची कल्पनाशक्ति विकसित होणें जरा बिकट असतें. त्यामुळें त्यांचा दृष्टिकोन आकुंचित राहावा यांत आश्चर्य नाहीं. त्यांच्या मागें असणारी कामाची दगदगहि त्यांच्या काव्यशक्तीच्या आड येत असावी. काव्यनिर्मितीस भरपूर विश्रांति हवी. ती त्यांना मुळींच मिळत नाहीं याखेरीज त्यांच्या उरावर मातृधर्मपालनाचें ओझें असतें, तें वेगळेंच. प्रस्तुत विधानाचा कित्येकांना विस्मय वाटेल; परंतु महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई आदि प्राचीन कवयित्री संसारी स्त्रिया नसून जोगिणी होत्या हें सत्य त्यांनीं लक्षांत घेतल्यास तो विस्मय उरणार नाहीं. स्त्रियांचें पुरुषावलंबन हेंहि खंडित परंपरेस कारण आहे. कारण स्त्रियांना पतीच्या सहवासांत जें वातावरण निर्माण झालें असेल त्याला जुळेल असा स्वभाव बनवावा लागतो. अर्थातच कमीअधिक प्रमाणांत त्यांना आपलें व्यक्तित्व विसरावें लागतें. व्यक्तित्वाचा लोप हा कलानिर्मितीस केव्हांहि प्रतिकूल आहे. क्वचित् स्त्रियांची सहनशीलताहि त्यांच्या काव्यगुणास मारक ठरते. सहनशीलतेमुळे त्यांचे उत्स्फुर्त भाव अंतःकरणांतल्या अंतःकरणांत लोप पावतात. अर्थात त्यांच्यावर शब्दांचा साज चढवणें शक्य होत नाहीं.

या सर्व कारणांच्या प्रतिकूल उपस्थितींतहि, मर्यादित क्षेत्रांतच कां होईना, स्त्रियांची कवित्वशक्ति मधून मधून चमक मारत असली पाहिजे असें सूक्ष्म दृष्टीच्या भेदक बुद्धीस खात्रीलायक पटल्यावाचून राहात नाहीं. मात्र हें कवित्व कामाधामाच्या धांदलींतच स्फुरलें असून या कानांवरून त्या कानांवर व त्यांवरून मग पुढें अशा रीतीनें सर्व समाजांत प्रसृत झालें असावें. त्यांत सर्वसामान्य स्त्रीजातीचे अनुभव व तिला सहज सुचतील अशा कल्पना यांचा सुंदर समन्वय झाला आहे. हें कवित्व त्यांच्या उखाण्यांत, गाण्यांत, ओंव्यांत, देवादिकांच्या पदांत, बाळबोलां व म्हणींत ओसंडे तों भरलें आहे. या सर्व सारस्वताचा लोकगीतांत समावेश होतो. यावरून स्त्रियांच्या मायाममतेचें, हास्यविनोदाचें, आशाआकांक्षांचें, आवडीनिवडींचें ज्ञान होऊन त्यांच्या काव्यात्मबुद्धीचें सादर कौतुक वाटूं लागतें. या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ कांहीं निवडक वेंचे घेऊन हा लेख संपवूं.

## कांहीं निवडक वेंचे

स्त्रियांचा आवडता पद्यप्रकार म्हणजे ओंवी. ओंवीसारखा साधा व सोपा छंद नाहीं. नुसतीं अक्षरें ओंवून प्रत्येक ओळीच्या अंतावर यमकाचा अलंकार चढवला कीं झाला ओंवीचा साज. हा अस्सल मराठी छंद फार पुराणा आहे. कारण नवव्या शतकाच्या अखेरीस व दहाव्या शतकाच्या सुरवातीस कनोजनृपाच्या आश्रयास असलेल्या राजशेखर कवीनें तत्कालीन 'महाराष्ट्री' भाषेंत कर्पूरमंजरी या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यानें त्यांत असा उल्लेख केला आहे कीं, 'महरट्ट' स्त्रिया या दळणकांडणाच्या वेळीं गाणीं म्हणतात. बहुधा हीं गाणीं ओंवी छंदांतच असावींत, किंवा निदान सध्यांचा ओंवीछंद तरी त्या गाण्यापासून उत्क्रांत झाला असावा. ही दळण-कांडणाच्या वेळीं ओंव्या म्हणण्याची जी चाल, ती खेडोपाडी अजूनहि आढळते. ओंव्यांत स्त्रियांचें कवित्व कसें ओतप्रोत भरलेलें असतें तें पुढील सर्वप्रसिद्ध उदाहरणांवरून स्पष्ट होईल. 'पहिली माझी ओंवी' हिच्यांत तुळस व राम यांविषयीं भक्तिभाव प्रकट झाला आहे, तर 'माझ्या ग दारावरनं—कोण गेला चंगीभंगी' हिच्यांत रावबाजींच्या राजवटींतील विलासी व वैभव-शाली 'दादा' चें चित्र उमटलें आहे. 'इंग्रजांनीं स्वारी केली—पुण्यावरी' या ओंवींत तत्कालीन राज्यक्रांति प्रतिबिंबित झाली आहे, तर

**फुलांमध्यें फूल—फूल हुंगावें जाईचें**
**सुख भोगावें आईचें—बालपणीं ॥**

हिच्यांत मातृप्रेमाचा गोडवा गाइला आहे. या उताऱ्यांत स्त्री-हृदयाच्या भावनांची पडछाया पडली असल्यामुळें त्यांचें कर्तृत्व पुरुषांकडे नसून स्त्रियांकडे असावें असें पुनःपुन्हा वाटतें. नागर आयांबायांप्रमाणें खेड्यापाड्यातील बायाबापड्यांनींहि हृदय हलवणारें हळूवार कवित्व केलें आहे. त्यांनीं मातेची महति

**मांडीचा चवरंग—नेत्रांचा केला दिवा**
**उपकार फेडूं कवा ?—मायबाई ॥**

या कल्पनाप्रचुर शब्दांनीं अथवा 'तळहाताचा पाळणा—केला' अशा प्रकारें गाइली आहे.

मातृत्वाची महति अगाध आहे. मातृप्रेमास पार नाहीं. निसर्गनियमानुसार जरी एका विशिष्ट वयांतच स्त्रियांना मातृत्व प्राप्त होत असलें, तरी त्यांच्या ठिकाणीं ती उदात्त भावना अगदीं लहानपणापासून प्रादुर्भूत होत असते यांत संशय नाहीं. लहान मुलींच्या घरकुलाकडे पाहिल्यास या विधानाचा उलगडा आपसूक होईल. आपल्या भावल्यांना लेंकरें मानून न्हाऊंमाखूं घालण्यांत, निजवण्या-थोपटण्यांत त्यांना एक तऱ्हेचा विशुद्ध आनंद होत असतो. यावरून आया स्वतःच्या लहानपणींच आपल्या तान्हुल्याचें कोडकौतुक करण्यास शिकतात हें दिसून येईल. या मातृत्वाच्या भावनेंतूनच 'नीज नीज बाळा—तुझा डोळा काळा' अशा प्रकारच्या अंगाईगीतांचा व 'पाळण्यांचा' संभव झाला असावा. हे काव्यप्रकार हाताळणाऱ्या कवयित्री कोणीतरी 'माता' असाव्यात यांत शंका नाहीं.

"सासू कशी पाहिजे ?" "अश्शी अश्शी"
"नवरा कसा पाहिजे ?" "अस्सा अस्सा"

या प्रश्नोत्तरात्मक 'खेळवण्यां' त सासूच्या अवजडपणावर व नवऱ्याच्या नाजुकपणावर जो कटाक्ष आहे, तो सुद्धां एखाद्या 'लेंकुरवाळीचा' असावा. या प्रकारच्या खेळवण्यांत अभिनयाला अवसर असतो हें लक्षांत घेण्यासारखें आहे. लोकगीतांच्या स्वरूपांत इतस्ततः विखुरलेलीं हीं काव्यें एकत्र जुळवण्याचें कार्य भगिनीवर्गाचें आहे. कांहीं कांहीं काव्यांत खेडुतांच्या नाहत्याधुत्या पोरींच्या प्रणयचेष्टांचें वर्णन आहे. सोंवळ्या रसिकांना तें अश्लील वाटण्याचा संभव आहे. पण त्यांतला सर्वसामान्य अनुभव सर्वमान्य ठरण्यासारखा आहे.

माळ्याच्या मळ्यामंदी—राखीत होतें मका
तिकून आला सखा—त्येनं हळूच घेतला मुका।

ही शहाण्यासुरत्या पोरीची लाडिक तक्रार खोटी आहे असें कोण बरें म्हणेल ?

ओंव्यांप्रमाणेंच महाराष्ट्रांतल्या प्रत्येक घरांत म्हटले जाणारे 'बाळबोल' व 'प्रार्थनाप्रकार' मुळांत 'आयांना' स्फुरले असावेत असें त्यांत व्यक्त

झालेल्या कल्पनांवरून वाटतें. ‘अडगुलं मडगुलं सोन्याचं कडगुलं’ या बाळ-बोलांत ‘तान्हया बाळाला तीट लावणारी’, तर ‘टाळियानंदा-बाळगोविंदा !’ यांत भुकेल्या बाळास केळ खाऊं घालणारी ‘आई’ डोकावली आहे. या बाळबोलांतून स्त्रियांचें वात्सल्य प्रतिध्वनित झालें आहे. स्त्रियांना आपल्या माहेरचें प्रेम फार असतें. सासरच्या वातावरणांतील अपरिचित चेहरे व माहेरची अनोळखी वहिनी ऊर्फ पुढील पिढींतल्या मुलांची मामी त्यांना स्वभावानें कशींशींच वाटतात. “कां ग बाई रोड ?” तर “गांवाची ओढ” या व “सासरच्या वाटे कुचुकुचु कांटे, माहेरच्या वाटे–जातां प्रेम वाटे”. या म्हणींत हीच माहेरची माया प्रकट झाली आहे.

चांदोबा ! चांदोबा ! भागलास कां ?
लिंबोणिच्या झाडाखालिं लपलास कां ?
लिंबोणिचं झाड करवंदी
मामाचा वाडा चिरेबंदी
मामाघरीं जाऊं या
तूप-रोटी खाऊं या

व

लवलव साळुबाइ मामा येतो
हातीं खोबऱ्याची वाटी देतो
मामी येते हिसकून नेते

हे बाळबोल रचणारी कवयित्री कोणीतरी ‘भगिनी’ असावी. कारण त्यांत भावाविषयीं आदर व त्याच्या पत्नीविषयीं संशय व्यक्त झाला आहे. वरील बाळबोलांपैकीं पहिला चंद्राला उद्देशून आहे. त्यांत एक विशेष अर्थ अभिप्रेत आहे. कारण वऱ्हाडी बायांत चंद्राला भाऊ मानून चांदूमामा म्हणण्याचा प्रघात आहे.

स्त्रियांच्या कल्पनांची भरारी बघावयाची असेल, तर

‘दिव्या दिव्या दिपत्कार—कानीं कुंडल मोतीहार।’

हा प्रार्थनाप्रकार व

'माझो पंढरी गाय बरवी ग!
दूध निघे तों भरून जाय चरवी ग!'

हें गायीवरील किरकोळ पद असे दोन नमुने पुढें करतां येतील. विशेषत: गायीवरील पदांतील—

पंढरि गाइचं पुच्छ—जैसं मोतियाचं गुच्छ
व
पंढरि-गाइचं मूत—जैसं सोनीयाचं सूत

या कल्पना बहारीच्या आहेत. या पदाच्या आर्षरचनेवरून व आंत बिंबलेल्या गायीविषयींच्या आदरावरून तें एका 'भाविक आजीबाई' नें रचलें असावें, असा तर्क वाहतो.

डोहाळगाणीं हीं तर उघड उघड स्त्रियांनींच रचलीं असावींत. कारण प्रत्येक 'मासां' त जाणवणाऱ्या आंतरिक वेदनांचें तपशीलवार सूक्ष्म वर्णन अनुभवावांचून लिहितां येणें अशक्य आहे. भराडी गौर, भोंडला, पांडव, भुलाबाई इत्यादि मुलींच्या 'अुत्सवां'तील परंपरागत गाण्यांच्या कर्त्री कोणीतरी 'कवयित्री' च असाव्यात. भुलाबाईच्या गाण्यांत—

आमचं आमचं बऱ्हाणपूर उंच उंच दिसे

अशी एक ओळ आहे. तीवरून भुलाबाई ही मुळची खानदेशी असावी असें दिसतें. अजूनसुद्धां महाराष्ट्राच्या इतर भागांपेक्षां खानदेशांतच तिचा उत्सव अधिक प्रमाणांत प्रचलित आहे. 'भुलोबा' म्हणजे भोळा ऊर्फ शंकर व भुलाबाई म्हणजे त्याची बायको अर्थात् पार्वती—

"आज भुलोबा घरीं नाहीं—
कथा कुणीं करावी?"
"करावी तर करावी
शंकरानं करावी
ऐकावी तर ऐकावी
पार्वतीनं ऐकावी."

या ओळींत वरील आशय स्पष्ट झाला आहे. शंकर ज्या अर्थी घरीं नाहींत, त्या अर्थी कथाच होऊं नये असा त्याचा मथितार्थ आहे. या उत्सवांचा हेतु मुलींच्या मनांत भक्तिभाव जागत राहावा असा असावा.

या विवरणावरून परिस्थितीनें घरांत डांबून टाकल्यामुळें स्त्रियांच्या मनांवर भोंवतालच्या वातावरणाचा कांहींच परिणाम झाला नाहीं असा कोणीं कयास केल्यास तो मात्र चुकीचा ठरेल. कारण '**असा कसा हा सासुरवास ऐकियला नाहीं**' अशा कांहीं गाण्यांतून व '**इंग्रजींत चंद्राला म्हणतात मून व अमक्याचें नांव घेते तमक्याची सून**' अशा कांहीं उखाण्यांतून जे विषय व शब्द दृष्टीस पडतात, त्यावरून तो फोल असल्याचें स्पष्ट सूचित होतें. अशा प्रकारच्या उखाण्यांतील कल्पनावरून व शब्दांवरून उखाणा घेणारी मुलगी कोणत्या काळांतील असावी हें सहज ताडतां येण्यासारखें आहे.

सारांश, कवयित्रींची परंपरा स्पष्टपणें अनुस्यूत नसली, तरी ती गुप्तपणें तशी आहे हें सप्रमाण सिद्ध झालें आहे. त्यांच्या विशिष्ट प्रकृतीमुळें व त्यांना ज्या परिस्थितींत रहावें लागतें तिच्यामुळें, जरी त्यांच्या कवित्वशक्तीची वाढ मोकळेपणानें झालेली दृष्टोत्पत्तीस येत नसली, तरी ती मर्यादित क्षेत्रांत सुखसोयीप्रमाणें हळूहळू वाढत आहे याविषयीं वाद नाहीं. परंतु आतां पूर्वींची परिस्थिति राहिलेली नाहीं. काळानें कुशी पालटली आहे. स्त्रियांना अनेक सुखसोयींची व सवलतींची सामुग्री मिळाली आहे. तेव्हां त्यांनीं या आयत्या आलेल्या संधीचा साहित्यनिर्मितीकडे उपयोग करून घेणें विशेष हितावह व श्रेयस्कर होणार नाहीं का?

—स्त्री. फेब्रुवारी १९३६

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप
अनुक्रम.......................... वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ...............

# ७

# ओवीचा विकास आणि नियमन

प्राचीन व अर्वाचीन मराठी साहित्यसेवकांनी छन्दःशास्त्रावर पुष्कळ लिहिलें आहे. प्राचीनांत भीष्माचार्य, लक्षधीर, नामदेव, निरंजनमाधव, रामजोशी यांनी छन्दोरचनेचा विचार केल्याचे दाखले आहेत. परंतु यांपैकी एकट्या रामजोश्याचाच 'छन्दोमंजरी' ग्रंथ प्रसिद्ध आहे. अर्वाचीनांत कै. गोडबोले यांचें 'वृत्तदर्पण' व प्रो. पटवर्धन यांची 'छन्दोरचना' प्रसिद्ध असून कै. राजारामशास्त्री भागवत, शंकर मोरो रानडे, राजवाडे, प्रो. रंगाचार्य रड्डी, श्री. प्रियोळकर या विद्वानांचे स्फुट निबंध उपलब्ध आहेत. यांपैकी राजवाड्यांचा 'मराठी छंद' पुनर्मुद्रणामुळे अभ्यासकांच्या विशेष परिचयाचा आहे. रानड्यांचा 'वृत्तकुतूहल' ग्रंथ शेवटपर्यंत गर्भांतच राहिला, तो तसा न राहता तर थोड्याफार फिरवाफिरवीने एका वृत्താचें रूपांतर दुसऱ्या वृत्तांत कसें होतें याविषयी नवीन माहिती मिळाली असती.* प्रस्तुत लेखांत ओवी, अभंग व तदंतर्गत इतर कांही अस्सल मराठी म्हणविणाऱ्या छंदांच्या नियमनाचा विचार करावयाचा असून त्यासंबंधी राजवाडे, पटवर्धन, प्रियोळकर प्रभृतींनी जीं विधानें केलीं आहेत त्यांचा परामर्श घ्यावयाचा आहे.

---

*रत्नाकर, व. १ अं. ७.

**छंदांच्या अस्सलपणाविषयी मतभेद**

राजवाड्यांनी मराठी छंदांचा आरंभ गोडबोल्यांच्या 'अभंग, दिंडी, साकी, घनाक्षरी, सवाई, छप्पा, ओवी, कटिबंध, चूर्णिका ह्यांना केवळ मराठी छंद म्हणतात' या वाक्याने केला आहे. त्यांच्या मतें यांपैकी ओवी, अभंग व दिंडीखेरीज इतर सर्व छंद परके आहेत. हे तीनच अस्सल असण्याचें कारण, यांचा उगम संस्कृत, प्राकृत किंवा फारशी यांसारख्या अन्य भाषांतून झालेला नाही. इतर छंदांचा उगम कसा परका आहे हें त्यांनी दाखविलें आहे. मात्र त्यांनी ओवी व अभंग या अस्सल म्हणविणारांचा उगम जसा दाखविला आहे तसा तो दिंडीचा दाखविला नसल्याने, प्रियोळकरांनी ओवी—अभंगाबरोबरीने तिचाहि विचार केला आहे.[१] राजवाडे म्हणतात म्हणूनच प्रियोळकर या तीनहि छंदांना अस्सल समजत आहेत. परंतु त्यांच्या अस्सल-पणाबद्दल वाद आहेत हें लक्षांत घेतलें पाहिजे. श्री बेंद्रे ओवीचा उगम कानडी मुलुखांतला ठरवीत आहेत. त्यांच्या मतें 'ओवी कानडी त्रिपदीचें अनुकरण असून ज्ञानेश्वर-तुकारामांच्या कांही उद्गारांवरून तिची तीच परंपरा असल्याचें दिसतें.'[२] ओवी व अभंग यांच्या रचनेंतला सारखेपणा लक्षांत घेऊन श्री. चिकित्सक 'ओवी हा जातिधर्मवाचक शब्द असून अभंग हा प्रकारभेदवाचक विशिष्ट शब्द आहे' असें विधान करीत आहेत.[३] मी त्यास अनुकूल आहे. त्या विषयीचें विशेष विवेचन पुढे येईलच.

तूर्त मला एवढेंच नमूद करावयाचें आहे की अभंग हा ओवीप्रमाणेंच कानडी आहे. कारण जें जातीचें मूळ तेंच प्रकाराचें. दिंडीच्या उगमाविषयी राजवाडे स्तब्ध आहेत. प्रियोळकर तिला 'निदान सध्या तरी अस्सल मराठी नागर छंद' असें धरून चालत आहेत. परंतु महाराष्ट्रकोश तिचें मूळ कानडी 'दिड्डींत'[४]

---

१. वि. ज्ञा. विस्तार, व. ६४ अं. ११।१२.

२. म. सा. पत्रिका, व. ७. अं. ५.

३. प्रतिभा, व. २ अं. २५.

४. विभाग, ४ पृ. १६५२.

असल्याचें सांगत आहे. आनंदतनय व रघुनाथ पंडित हे दिंडचा रचणारे तंजावरच्या कानडी मुलुखांतले होते हें सत्य लक्ष्यांत घेतलें म्हणजे तर ही समजूत अधिकच दृढ होते. तेव्हा यासंबंधी विशेष चिकित्सा होणें अवश्य आहे. मला तर असें वाटतें की, गोडबोल्यांच्या वरील वाक्याचा अर्थ केवळ 'प्राकृत कवितेंत मात्र येणारे असे कांही छंद' येवढाच असावा. 'केवळ मराठी छंद' म्हणजे 'अस्सल मराठी छंद' हा अर्थ त्यांना मुळीच अभिप्रेत नसावा. परंतु राजवाड्यांनी आपलें विवेचन नेहमीच्या अभिनिवेशाने करून त्यांच्यावर अस्सलपणाचा शिक्का मारला आहे. राजवाड्यांच्या या ठराविक पद्धतीबद्दल प्रो. पोतदार यांच्या शब्दांत असें म्हणतां येईल की, 'राजवाडे यांचा लेख ठसकेदार, प्रौढ आणि प्रत्ययोत्पादक पद्धतीने लिहिलेला असला व जरी त्यांतील विवेचन अभिनव आणि मननीय असलें तरी तें सर्वमान्य होण्याजोगें असेलच असें नाही.'* प्रियोळकरांनी तें तसें समजण्याचें कारण नाही. निदान मी तरी तें तसें समजत नसल्यामळे चूर्णिका व कटिबंध यांखेरीज गोडबोल्यांनी उल्लेखिलेल्या सर्व छंदांचा विचार दोन निरनिराळ्या निबंधांत करणार आहे. त्याबरोबरच पटवर्धनांनी उल्लेखिलेल्या कांही उपछंदांचाहि विचार करीन. विषयमर्यादेच्या सोयीकरिता येथे ओवी, अभंग व तदंतर्गत इतर कांही उपछंदांचें विवरण करणार असून 'हिंदी छंद' या स्वतंत्र निबंधांत घनाक्षरी, सवाई, छप्पा व साकी यांचा परामर्श घेणार आहे. गोडबोले राजवाडे यांनी या प्राकृत छंदांचे नियम, त्यांच्या खऱ्या स्वरूपांचा विचार न करितां, स्वतःसमोर असलेल्या वामनादिकांच्या अवास्तव सयमक पद्यांवरून बांधले असल्यामळे ते सुद्धा चुकले आहेत. दिंडीचें सद्यःस्वरूप पूर्ण नियमबद्ध असल्यामुळे तिचा विचार करण्याचें कारण नाही. चूर्णिका गद्यकाव्यांत मोडत असल्यामुळे व कटिबंध गद्यपद्यमिश्रित असल्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें भाग आहे. ग्रांथिक ओवी देखील सयमक गद्य आहे. तेव्हा वास्तविक तिचाहि विचार करण्याचें कारण नाही. परंतु 'ओवी' या जातिधर्मवाचक व्यापक शब्दाशीं तिचा निकट संबंध येत असल्याने तो कांहीसा अपरिहार्य आहे.

---

*मराठी छंद, प्रस्तावना.

### ओवी

सर्वसाधारण समजुतीप्रमाणें 'ओवी' हा जुन्यांतला जुना मराठी छंद आहे. इ. स. ११२९ पर्यंत याचा उगम मागे नेतां येतो. चालुक्य वंशीय सोमेश्वर याच्या नांवचें, त्या सुमाराचें 'मानसोल्लास' ऊर्फ 'अभिलषितार्थ-चिंतामणी' हें पुस्तक उपलब्ध आहे. त्यांत 'महाराष्ट्रेषु योषिद्‌भिरोवी गेया तु कंडने' असा उल्लेख आहे. त्यावरून दळणकांडण सारतांना महाराष्ट्र-महिला ओव्या आळवीत असें दिसतें. वरील अवतरणांत 'ओवी' संज्ञा छंद' या अर्थीं योजिली आहे. परंतु ती एका विवक्षित पद्धतीच्या सयमक गद्याकरिता सुद्धा उपयोगांत आणीत असत. अर्थाच्या दृष्टीने ती द्विविध होती. थोडक्यांत असें म्हणता येईल की 'ओवी' ही जातिधर्मवाचक व्यापक संज्ञा असून तिच्यांतील निरनिराळ्या प्रकारभेदांनाहि तीच संज्ञा होती. जातिधर्मवाचक व प्रकारभेदवाचक संज्ञांतील भेद लक्षांत न आल्यानेच गोडबोले राजवाडे पटवर्धन प्रभृति छंदोरचनाकारांचा घोटाळा उडाला आहे. 'ओवी' संज्ञेची व्याप्ति फार मोठी असून तिच्यांत गद्य व पद्य या दोन्ही पद्धतींचा अंतर्भाव होतो. जे जे विचार शब्दांच्या सूत्रांत ओवले—मग ते गद्यस्वरूप असोत वा पद्य-स्वरूप असोत—ते ते सर्व ओवी जातीचे होत असा तिचा व्यापक अर्थ दिसतो. पुढील विवेचनाच्या सुगमतेसाठी येथे तिचें वर्गीकरण दाखविणारा 'वृक्ष' काढतों.

### ओवीचें वर्गीकरण दाखविणारा वृक्ष

- ओवी [जातिधर्मवाचक व्यापक संज्ञा]
  - गद्य ओवी [उदा. ज्ञानेश्वरी, दासबोध अि.]
  - पद्य ओवी ऊर्फ अभंग [मुलीबाळींची]
    - मोठा प्रकार
      - अभंग आरती प्रकार १ ला
      - प्रकार २ रा
    - लहान प्रकार
      - लहान ओवी उपप्रकार
      - भूपाळी
        - भूपाळी उपप्रकार

या वृक्षावरून ‘ओवी’ या व्यापक संज्ञेचे गद्य व पद्य हे दोन प्रकार असल्याचें सहज लक्षांत येईल. पद्यालाच अभंग हें दुसरें नांव आहे. मुलीबाळी लहानग्या भावंडाला थोपटतांना अगर झोपाळ्यावर झुलतांना पद्यओव्याच गात असतात. पद्यओवीअभंगाचे मोठा व लहान असे दोन प्रकार आहेत. पुढे ‘अभंग’ या सदरांत त्यांचें विवेचन येईल. प्रस्तुत गद्यओवीशीं कर्तव्य आहे.

**गद्यओवी**

मानसोल्लासांत स्त्रिया ओव्या गातात असें स्पष्ट निर्दिष्ट केलें आहे. परंतु सध्या ज्यांना ‘ओवी’ संज्ञा आहे त्या, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, दासबोध आदि सर्वश्रुत ग्रंथांतील रचना, गातां येत नाहीत. तरी हें कोडें सुटावें कसें? वस्तुथिति अशी आहे की त्या रचना मुळी छंदोबद्धच नाहीत. त्यांचें स्वरूप सयमक गद्यमय आहे. छंदोरचनेंत तालाची आवश्यकता आहे. त्याचा विचार चरणांतील वर्णांच्या लघुगुरुक्रमावरून, मात्रांवरून अथवा विवक्षित वर्णसंख्येवरून करावा लागतो. याशिवाय तिला चरणांचें व यतींचें बंधन आहे. ग्रांथिक ओव्यांत तालबद्धता मुळीच आढळत नाही. कारण त्यांना वर्णांच्या लघुगुरुक्रमाचें, मात्रांचें अथवा विवक्षित वर्णसंख्येचें मुळीच बंधन नाहीं. त्यांना चरण असले तरी ते सम किंवा विषम यांपैकी कोणत्याहि प्रकारांत मोडत नाहीत. त्यांच्यांत चरणांच्या अंतीं जो विराम घ्यावा लागतो तोच तेवढा यतिस्वरूप दिसतो. त्यांना फक्त यमकांचें बंधन दिसतें. त्यांच्या पहिल्या तीन चरणांत अंत्य यमक साधलेलें असतें. मात्र चवथा अर्धचरण निर्यमकच असतो. परंतु यमक हें छंदःशास्त्राचें बंधन नाही. तो अेक शब्दालंकार आहे व छंदःशास्त्रांत विनाकारण लुडबूड करून घोटाळे माजवीत आहे. त्याचा छंदःशास्त्राशीं अर्थाअर्थी संबंध नाही. जो जर तसा मानला तर मग सयमक म्हणींनाहि छंदोबद्ध गणावें लागेल. प्राचीन काळीं लिहिण्याचीं साधनें कमी असल्याने स्मरणसुलभतेकरिता त्याचा अवलंब करीत. त्यामुळे त्याची महती वाढली आहे. त्या काळाचें निर्यमक गद्य फारसे आस्तित्वांत नाही याच्या मुळाशीं हीच वरील सोय आहे. सध्या चुकीनेच ज्ञानेश्वरी आदि ग्रथांतील सयमक गद्यास पद्य म्हणून कवटाळण्यांत येत आहे. यमकाचें

खरें आलंकारिक स्वरूप लक्षांत न आल्याने गोडबोल्यांनी ग्रांथिक गद्यओवी नियमित करण्याचा प्रयत्न केला व राजवाडे पटवर्धनांनी त्यांचें अनुसरण केलें. परंतु या तिघांनाही तिच्या गद्यस्वरूपाचा उलगडा झालेला नाही. मराठीच्या अधिकांश प्राचीन वाङ्मयांत तिचा अवलंब केला असल्याने या अर्वाचीन छंदः-शास्त्रज्ञांची दिशाभूल होणें अगदी स्वाभाविक आहे. परंतु या बाबतींत 'मार्ग-प्रभाकर' कार भीष्माचार्य[१] व 'महाराष्ट्रकाव्यदीपिका' कार लक्षधीर[२] या दोघां प्राचीन महानुभावांचीहि दिशा चुकलेली असावी हें मात्र आश्चर्य आहे.[३]

ओवीच्या उगमासंबंधी सुद्धा विद्वानांत भिन्न भिन्न मतें आहेत. राजवाडे तो वैदिक छंदांत शोधतात[४] तर पांगारकर तो अनुष्टुपांत आहे असें म्हणतात[५] पण या दोन्ही मतांत राम नाही. वैदिक छंदांची रचना स्वरांच्या आघातावर उभारलेली आहे तर अनुष्टुपाच्या प्रत्येक चरणास आठ अक्षरांचें बंधन असून प्रतिचरणाचें पांचवें अक्षर लघु असावें इतका निर्बंध आहे. ओवीला तर कांही धरबंधच नाही. ज्ञानेश्वरांच्या काळीं तिची बैठक

**'ओं नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या।**
**जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा॥'**

अशी जरा व्यवस्थित तरी होती. पण वामनाच्या वेळेपर्यंत ती

---

१. मराठी छंद, पृ. २०.

२. विश्ववाणी, व. ३. अ. १०.

३. या बाबतीत प्रो. रंगाचार्य रड्डी यांचीहि दिशाभूल झाली आहे. सहविचार, व १४ अ. ३ यांत त्यांनी पुढील चमत्कारिक विधान केलें आहे. 'केवळ मराठींत उपलब्ध होणारे अभंग ओवी हे छंद अक्षरमात्रा व गण यावर अवलंबून नसून ते केवळ अनुप्रास व चरण यांवर अवलंबून आहेत.' परंतु अनुप्रास सारख्या शब्दालंकाराचा छन्दःशास्त्राशी संबंध आहे काय किंवा त्यावरून छंदाचें लक्षण बांधतां येतें की काय याविषयी मात्र त्यांनी खुलासा केलेला नाही.

४. मराठी छंद, पृ. ३१.

५. मोरोपंतचरित्र काव्यविवेचन, पृ. ५३१.

'अगा! जो झाला ज्ञानी। त्यास कर्में न बाधों शकती म्हणोनी।
बोलिलें तूंतें पूर्वश्लोकेंकरूनी । या कारणें ।।'

अशी अगदी अस्ताव्यस्त झाल्याचें आढळतें. बेंद्रे समजतात त्याप्रमाणे ती बहुधा कानडी मुलुखांतून महाराष्ट्रांत आली असावी. कारण कानडी त्रिपदीशीं तिचें सादृश्य आहे. शिवाय ओवी अभंगांची रचना ज्याच्या भक्तिपर झाली तो विठोबाहि मूळचा कानडीच आहे.

ओवीच्या गद्यस्वरूपासंबंधी व उगमाविषयी याप्रमाणें अनेकांचे गैरसमज असले तरी ज्ञानेश्वर व मोरोपंत या आदीच्या व अंतांच्या दोघांहि प्राचीन कवींची या बाबतींत अगदी सरळ समजुत होती हें लक्षांत घेण्याजोगें आहे. तिचें अनियमित गद्यस्वरूप लक्षांत घेऊनच मोरोपंतासारख्या नियमनिपुण कवीने तिचा आपल्या वाङमयांत उपयोग केलेला नाही. उलट त्याने बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या मुलींसुनांसाठी सीता, सावित्री व रुक्मिणी हीं तीन 'गीतें' तयार करताना त्या वेळेपर्यंत नियमित झालेला 'अभंग' हाताळला आहे. स्वतः ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरींतील गद्यस्वरूप ओवीला कोठेहि 'छंद' ही संज्ञा दिलेली नाही. त्यांनी जेथेतेथे तिचा 'प्रबंधू' या शब्दानेच निर्देश केला आहे. भास्कर व दामोदर या महानुभावांनीहि त्यांच्यासारखाच उल्लेख केला आहे. वानगीदाखल या तिघांच्याहि ग्रंथांतील कांहीं अवतरणें देतों :—

आतां आपुलेनि प्रसादें। मिया भगवद्गीता वोवी प्रबंधें।
पूर्वखंड विनोदें । वाखाणिलें ।। ज्ञानेश्वरी, अ. १० ।।

तो कृष्णार्जुन संवादु। नागरी बोली विशदु।
सांगौनि दाऊं प्रबंधु। वोवियेचा ।। ज्ञाने. अ. १३ ।।

किंवा

नागार्जुनाचा दातारु। राणेराओ श्रीचक्रधरु।
ओवी प्रबंधु कवि भास्करु। वर्णितुसे ।। शिशुपालवध, ७ ।।

तया नागार्जुनाचा उपदेशु। म्हणौनि बोलावेया शांतिरसु।
भास्करु कवि झाला सौरसु। वोवी प्रबंधी ।। उद्धवगीता, ६ ।।

अथवा

नागार्जुनाचेनि प्रसादें। परमपुरुषाचेनि बोधें।
श्रीकृष्णकथा ओवी प्रबंधें। भणे मुनी केशवराजु ॥ वच्छहरण, ६ ॥

परंतु यावर 'प्रबंध' शब्दाने गद्याप्रमाणें पद्याचाहि बोध होतो असा आक्षेप येण्याचा संभव आहे. जयदेवाच्या गीतगोविंदांतील अष्टपद्यांना 'प्रबंध' संज्ञा आहे.* पण प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांच्याच शब्दांनी या आक्षेपाचें खंडण होण्यासारखें आहे. अठराव्या अध्यायाच्या अखेरी ते स्वतःच्या ओवी-संबंधाने पुढील उल्लेख करतात :

तैसी गाणिवेते मिरवी। गीतेवीणही रंगु दावी-।
तो लोभाचा बंधु वोवी। केली मियां ॥

यावरून स्पष्ट होतें की ओवीचा एक प्रकार गेय आहे. परंतु गाण्याशिवाय रंगतो म्हणजे ऐकतांना आनंद देतो तो प्रकार ज्ञानेश्वरांनी हाताळला आहे.

**पद्यओवी अभंग**

मानसोल्लासांतील उल्लेखावरून व ज्ञानेश्वरांच्या वरील अवतरणावरून ओवी गात हें उघड आहे. तेव्हा तिच्या पद्यस्वरूपाविषयी वाद नाही. मुलीबाळी ज्या ओव्या गातात त्या पद्यच आहेत. पद्यओवीलाच अभंग हें दुसरें नांव आहे. मोरोपंताने मुलींसाठी रचलेल्या ओव्या अभंग म्हणूनच प्रसिद्ध आहेत. पद्यओवी व अभंग या दोन संज्ञा भिन्न दिसल्या तरी त्या एकाच प्रकारच्या छंदोरचनेस लावीत असतात. तेव्हा त्यांच्या संबंधीचें विवेचन एकच असेल हें निराळें सांगणें नकोच. छंदोदृष्टचा अभिन्न असलेल्या या दोहोंत बाह्यतः मात्र किंचित् भेद आहे. तो हा की प्रत्येक ओवी आपल्या ठिकाणीं स्वतंत्र व स्वयंपूर्ण आहे. उलट अभंग उत्तरोत्तर दीर्घता पावणारा आहे. यामुळेंच त्यास बाह्यतः ओवीचा आटोपसरपणा नाही. पण हा भेद नाममात्र असल्याने महत्त्वाचा नाही.

येथे ओघानेच आलें म्हणून प्रतिभा पाक्षिकाच्या २ऱ्या व ३ऱ्या वर्षांत अभंगचर्चा या सदराखाली झालेल्या वादाचा उल्लेख करणें जरूर आहे.

---

*ज्ञानकोश, वि. ५ पृ. १८२.

प्रस्तुत त्याच्याशीं कांही कर्तव्य नाही. परंतु त्यांतून अभंग हा ओवींतून उत्क्रांत झाला असावा या आशयाचा जो सर्वसंमत सिद्धांत बाहेर पडला तो उपेक्षणीय नाही येवढेच सुचवावयाचें आहे. गद्यओवी गेय होतांच अभंग कसा निर्माण झाला याविषयी मी पुढे विवेचन करणार आहें, त्यास पूर्व आधार म्हणून वरील सिद्धांत निर्दिष्ट करीत आहें.

प्रतिभेंतील वादांत अभंगाच्या निर्मितीचा काळ व त्या संज्ञेचा अर्थ हे दोन मुद्दे मुख्य होते. प्रियोळकरांचें म्हणणें 'अभंग' संज्ञा तुकारामानंतर अस्तित्वांत आली असून त्यापूर्वीं तिला 'ओवी' च म्हणत, तर 'चिकित्सक' यांचें म्हणणें तिला ओवी म्हणत हें खरें असलें तरी ती तुकारामापूर्वींपासूनच अस्तित्वांत आहे. तें कांही असो, एवढे मात्र खरें की तुकारामाच्या नांवावर अनेक ओव्या देखील आढळतात. उदाहरणार्थ नवनीताच्या ३ ऱ्या नव्या आवृत्तींतील ४२/४३ हीं प्रकरणें देतों. पहिल्यांत

**'शरीर दुःखाचें कोठार। शरीर रोगाचें भांडार।**
**शरीर दुर्गंधाचा थार। नाही अपवित्र शरीरा ऐसें॥'**

अशी गद्यओवीबद्धरचना असून दुसऱ्यांतहि

**'न करी दंभाचा सायास। शांति राहें बहुवस।**
**जिव्हे सेवी सुगंधरस। न करीं आळस रामनामीं॥'**

अशी वरील प्रकारचीच रचना पुनरुक्त झाली आहे. यावरून उपर्युक्त सिद्धांतास आणखी एक आधार मिळत आहे.

दुसऱ्या मुद्द्यासंबंधी प्रियोळकरांचें म्हणणें असें की, 'तुकारामाच्या वह्या इंद्रायणींत बुडवल्या तरी अभंग राहिल्या म्हणजे नाश पावल्या नाहीत. म्हणून त्या वह्यांतलें जें लिखाण तें 'अभंग' होय'; उलट चिकित्सक 'ज्याच्या पंक्तीच्या संख्येला' नियमन नसल्यामुळे जें वृत्त भंग पावल्याशिवाय वाटेल तेवढे लांबवतां येतें तें म्हणजे 'अभंग' असा त्याचा अर्थ करतात. राज-वाड्यांच्या मताप्रमाणें त्याचा अर्थ 'कर्णमधुर संगीत' तर श्री. नेने यांच्या म्हणण्याप्रमाणें तो 'शेवटीं अगर अंती घालणें' असा आहे. यांपैकी चिकित्स-कांचा अर्थ बऱ्याच अंशीं पटतो. कारण अभंग ओवीप्रमाणें सुटसुटीत नसून

लांबत जाणारा असल्याने त्याच्या पंक्तींस मर्यादा नाही. तेव्हा त्यास 'अभंग' ही यथार्थ संज्ञा मिळणें अगदी स्वाभाविक आहे.

**गेयता**

आता या छंदाच्या उगमाचा विचार करणें योग्य होईल. गद्यओवी वाचतांना जेव्हा उच्चारांची योजना विशेष नादमधुर करण्याचा प्रयत्न होतो तेव्हा तिला गेयत्व प्राप्त होतें. म्हणजे तिचें स्वरूप थोडें आटोपसर बनून तिच्या प्रत्येक चरणांत विवक्षित मात्रा भरतात व तिचें नियमन होतें. अशा प्रकारें तिला निश्चित नियमबद्धता येतांच तिचें छंदत्व प्रकट होतें. मनुष्य गात गात जन्माला आला नाही हें उघड आहे. तेव्हा आधी गद्य व मग पद्य या क्रमासंबंधी वाद असण्याचें कारण नाही. परंतु पद्यओवीच्या नियमना-संबंधाने येथे एक शंका उद्भवणें संभवनीय आहे. ती ही की ज्या अर्थी पद्य-ओवीच्या चरणांत विवक्षित मात्रा भरतात त्या अर्थी तिचा अंतर्भाव मात्रिक छंदांत व्हावयास हवा. पण वस्तुस्थिति तर अशी आहे की गोडबोलेप्रभृतींनी तिचें म्हणजेच अभंगाचें नियमन लगत्वातीत अक्षरसंख्येंत केलें आहे. तरी या दोन परस्परविरुद्ध विधानांचा मेळ कसा बसावयाचा? यास उत्तर असें की ज्या अर्थी पद्यओवी गातां येते त्या अर्थी ती मात्रिकच आहे. संगिताचा व मात्रांचा संबंध अभेद्य आहे. परंतु पद्यओवीची उत्पत्ति गद्यओवींतून यथावकाश झाली असल्याने तिचें मूळ स्वरूप विशेष पालटलेलें नाही. तिचें लगत्वातीत अक्षरसंख्येंत नियमन होण्याच्या मुळाशीं हेंच कारण आहे. ती स्वयंपूर्ण असून देखील तिला दुसरें कोणतेंच स्वतंत्र नांव नाही. उलट ती 'ओवी' या जातिवाचक संज्ञेचाच आश्रय करीत आहे, यावरूनहि तिच्यांत विशेष बदल घडला नसल्याचें स्पष्ट होईल. आणि म्हणूनच गाण्याच्या दृष्टीने तिच्यांत कमी मात्रांची भर घालण्याकरिता लघूचा गुरु व जास्त मात्रा चुकविण्याकरिता गुरुचा लघु उच्चार करावा लागणें अपरिहार्य आहे. या खटाटोपामुळेच लगत्वातीत अक्षरछंद सताल नाहीत असें विधान करण्यांत येत असतें. *

---

*वागीश्वरी, व. ४ अं. ३.

येथे तालाचा अर्थ त्या छंदांतील प्रत्येक अक्षराचा उच्चार संपूर्ण व स्वयं-पूर्ण असतोच असें नाही येवढाच घ्यावयाचा. तरी पण सुटसुटीतपणा व गेयता या दोन वैशिष्ट्यांच्या बळावर 'पद्यओवी' हा छंद भावप्रकटनाचें अमोघ साधन होऊन बसला आहे हें कबूल केलें पाहिजे. त्याला 'अभंग' हें दुसरें नांव कसें मिळालें तें निश्चित नाही. परंतु भावना यथार्थतेने व्यक्त करण्याच्या गुणामुळे त्याने तें अभंग केलें आहे यांत शंका नाही.

**ओवीअभंगांचें अभिन्नत्व**

मागील विवेचनावरून 'पद्यओवी अभंग' गेय असल्याने मात्रिक व सताल आहे हें सहज समजेल. महाराष्ट्रशब्दकोशाने अभंगाला मात्रिकच म्हटलें आहे.* परंतु नामदेवाच्या नांवें प्रचलित असणाऱ्या पुढील अभंगांत 'मोठ्या प्रकारा' चें लगत्वातीत अक्षरसंख्येत नियमन केलें आहे.

अभंगाची कळा । कांही मी नेणत
त्वरा केली प्रीत । केशोराजें ॥
अक्षरांची संख्या । बोलिलो उदंड
मेरू तो प्रचंड । शर आदी ॥
सहा साडे तीन । चरण जाणावे
अक्षरें मोजावे । चौक चारी ॥
पहिल्यापासूनी । तिसऱ्यापर्यंत
आठरा गणीत । मेज आली ॥
चौक चारी आदी । बोलिलों मातृका
साविसाची संख्या । शेवटील ॥
दीड चरणांचीं । दीर्घ तीं अक्षरें
सूक्ष्म विचारें । बोध केलें ॥
नामा म्हणे अेक । शून्य दिलें हरी
प्रीतीने खेचरी । आज्ञा केली ॥

---

*खंड १ पृ. १०४.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
वि: ..........
अनुक्रम .......... नों दि: ..........
स्थळ ..........

या अभंगास प्रियोळकर प्रक्षिप्त ठरवीत आहेत. मीहि त्यांस अनुकूल आहें. कारण स्वतः नामदेवानेच वरील नियम पाळल्याचें दिसत नाही. शिवाय अशा प्रकारें त्याच्या नांवावर फक्त 'मोठ्या प्रकारा' चें नियमन करणारा अभंगच उपलब्ध आहे. ज्यांत 'लहान प्रकारां' चें लक्षण सांगितलें आहे असा दुसरा एखादा अभंग त्यांच्या नांवावर उपलब्ध नाही. 'मोठ्या प्रकारा' प्रमाणे त्यानें 'लहान प्रकार' हि हाताळला आहे. मग असा पक्षपात कां? नमुन्यादाखल त्याच्या व तुकारामाच्या 'मोठ्या प्रकारां' तील सहाहून अधिक अक्षरें असलेले पूर्वचरण व चारांहून अधिक अक्षरें असलेले अर्धचरण आणि तुकाराम व जनाबाई यांच्या 'लहान प्रकारां' तील आठांहून अधिक अक्षरें असलेले चरण पुढे देतों. नामदेवाने नसलें तरी गोडबोल्यांनी 'प्रतिचरणीं आठ अक्षरें' हें 'लहान प्रकारा'चें लक्षण सांगितलें आहे; उदा०—

**( मोठा प्रकार )**

नाम. (१) घालीन लोटांगण वंदीन चरण।
डोळ्यांनी पाहीन। रूप तुझें॥

(२) संसारषडचक्रीं। पडिलों महा डोहीं।
सोडविण्या येई। पांडुरंगा॥

(३) चिरंजीव नामा। कंठीं धरो प्राण।
करी तुझें ध्यान। रात्रंदिवस॥

तुका. (१) गळां तुळसीहार। कांसे पीतांबर।
आवडे निरंतर। हेंची रूप॥
मकरकुंडलें। तळपती श्रवणीं।
कंठीं कौस्तुभमणी। विराजीत॥

**( लहान प्रकार )**

तुका. (१) न लगे मुक्ति धन संपदा।
संतसंग देई सदा॥

जना. (१) इतुक्यासहित त्वां बा यावें।
माझे रंगणीं नाचावें।

सारांश, दोन्ही 'प्रकारां' च्या दृष्टींनी अभंग हा लगत्वातीत अक्षरछंद नसून मात्रिकच आहे याविषयी शंका राहत नाही.

अभंग व पद्यओवी एकच हें यापूर्वीं अनेकवार सांगितलें आहे. परंतु अभंग आळवतांना योजिल्या जाणाऱ्या चालींत व ओव्या गातांना लावण्यांत येणाऱ्या चालींत अंतर असल्याने कदाचित् दिशाभूल होणें संभवनीय आहे. म्हणून येथें उदाहरणांसहित थोडेसें स्पष्टीकरण करतों : उदाहरणार्थ—

(१) **मोठा प्रकार** [अभंग] सुंदऽरऽतें ध्यानऽ।
अुऽभें विऽटेऽवऽरी।
कऽरऽकऽटावऽरी।
ठेऊनिऽया॥

[ओवी] पहिली माझी ओवी।
पहिला माझा नेमऽ।
तुळशी खाली रामऽ।
पोथी वाची॥

वरील अवतरणें एकमेकांच्या चालींवर म्हणतां येणें शक्य आहे. त्या उभयतांच्या पहिल्या तीन चरणांत १२ मात्रा असून चवथ्या अर्ध्या चरणांत ८ मात्रा आहेत. तात्पर्य त्या दोघांत अभेद आहे.

(२) **लहान प्रकार** [अभंग] हेंचिऽज्ञानऽदेगा देवा।
तुझा विऽसऽरऽ नऽ व्हावा॥
गुऽणऽ गाईनऽ आवऽडी।
हेचिऽ माझी सर्वऽ जोडी॥

[ओवी] जऽरी बोलऽते ही मैनाऽ।
माझी अऽजूनऽ बोबडें॥
मऽला लागऽती ते बाई।
खऽडी साखऽरेचे खडे॥

हीं अवतरणेंहि एकमेकांच्या चालींवर गातां येणें शक्य आहे. या उभयतांच्या प्रत्येक चरणांत १६ मात्रा आहेत. तात्पर्य या दोघांत अभिन्नत्व आहे. हा

अभंग प्रकार मुळांत रोजच्या बोलींतील उच्चारानुसार उत्स्फूर्त झाला असल्याने त्यास सांप्रदायिक चाल लावल्यास क्वचित् प्रतिचरणीं १४ मात्राहि भरतात.

पद्य-ओवी-अभंगाचें गेयत्व व मात्रिकत्व दर्शविण्याकरिता वरील लेखनानुसार त्याचे चरण एकाखाली एक लिहिणें व कमी मात्रांची भर अवग्रहाने दाखविणें आवश्यक आहे. अवग्रहाचा अवलंब करावयाचा नसल्यास गुजराथी पद्यलेखनानुसार शिरोरेषा उपयुक्त ठरेल ( उदा० हेंचि दान देगा देवा ). गुरुत्वाचें लघुत्व सूचित करण्याकरिता 'शिरावरील अर्धचंद्रा' ची योजना कामी पडेल. ( उदा० यु ऽ गे अठ्ठावीस ऽ वि ऽ टॅव ऽ री ऊ ऽ भा ). सद्यः लेखनानुसार पद्यओवी अभंगाचे सर्व चरण एकाच ओळींत आवळण्यांत येतात. त्यामुळे तिच्यांतील निरनिराळ्या प्रकारची यमकयोजना पाहून मुळांत एकच असणाऱ्या छंदाचे अनेक अवास्तव उपप्रकार कल्पिण्याची नजरचूक घडते. गोडबोले प्रभृतींनी अशी चूक केली आहे. अशा रितीने जर छंदाचे उपप्रकार कल्पिले तर वामनमोरोपंतादि यमकप्रिय कवींच्या काव्यांतून किती तरी नवीन उपप्रकार अवतीर्ण होतील !

येथपर्यंतचें विवेचन वस्तुस्थितीस धरून झालें. परंतु येथे एका महत्त्वाच्या व्यावहारिक मुद्द्याकडे लक्ष पुरविणें आवश्यक आहे. पद्यओवी अभंग हा छंद मात्रिक असला तरी ज्या सुमारास त्याचा उद्भव झाला तो काळ मराठी भाषेच्या सुरवातीचा असल्याने तिच्या स्वभावानुरूप तो दीर्घत्वाकडे विशेष झुकला आहे. त्यामुळे छंदोरचनेंत त्याच्यातील कांही लघु वर्णांना ओढूनताणून गुरुत्वाचें उसने चंद्रबळ आणणें भाग पडतें. क्वचित् गुरु वर्णांनाहि मुद्दाम लघुत्व वरावें लागतें. या कारणामुळेच न कळत त्याच्या चरणांत वर्णांची ठराविक संख्या पुनरावृत्त झाली आहे. तुकारामाच्या वेळेपावेतो तो तयार होण्याच्या अवस्थेंत होता. गोडबोल्यांनीच प्रथम त्यांचें नियमन केलें. त्यांनी तें साहजिकच लगत्वातीत अक्षरसंख्येंत केलें. मराठीचें वैशिष्टच म्हणून तें तसेंच राहूं देणें इष्ट आहे. शिवाय नामदेव तुकारामप्रभृति ज्या प्रणेत्यांनी या छंदाचें लालनपालन केलें, त्यांच्या अजरामर कृति बव्हंशीं लगत्वांतीत अक्षरसंख्येंतच नियमित होत असल्याने त्या बाबतींत ढवळाढवळ

न करणेंच श्रेयस्कर ठरेल. परंतु त्याचें वास्तविक स्वरूप मात्रिक आहे हें मात्र कबूल केलेंच पाहिजे. मात्रिकत्वामुळेच त्याचे 'मोठा' व 'लहान' असे दोन स्वाभाविक प्रकार पडतात. त्यांपैकी पहिला षण्मात्रिक व दुसरा अष्टमात्रिक आहे. सर्व पदांच्या मुळांशीं याच दोन मात्रिकरचना असतात.

आता पद्यओवीअभंगाच्या दोन्ही मुख्य प्रकारांचा व तदंतर्गत इतर कांहीं अुपछंदांचा मात्रिक व लगत्वातीत अक्षरसंख्याक नियमनांच्या दृष्टीने विचार करतों.

## १ पद्यओवीअभंग ( मोठा प्रकार )

जेव्हां गद्यओवींतील पहिल्या तीन चरणांत प्रत्येकी १२ मात्रा अथवा ६ अक्षरें व चवथ्यांत ८ मात्रा अथवा ४ अक्षरें येतात तेव्हा हा प्रकार संभवतो. याविषयी विशेष विवेचन अन्यत्र आलेंच आहे. कधी कधी यांत

**सुंदऽरऽतें ध्यानऽ।**
**अुऽभे विऽटेवऽरी।**
**कऽरऽकॆऽ टावऽरी।**
**ठेअूनिऽया ॥**

असें २ऱ्या व ३ऱ्या चरणांचें अंत्य यमक साधलेलें असतें, तर कधी कधी

**पंढऽरीसऽजावें।**
**जीवनमुक्तऽव्हावें।**
**केशऽवा भेटावें।**
**जीवऽलऽगा ॥**

असें पहिल्या तिन्ही चरणांचें अंत्ययमक जुळविलेलें असतें. यमकयोजना कवीच्या आवडीनिवडीवर अवलंबून आहे. तिच्या अभावीं छंदाच्या लक्षणास कोणत्याहि प्रकारचा ढळ पोंचत नाहीं. गोडबोल्यांनी यमकाचें वास्तव स्वरूप लक्षांत घेतलें नसल्याने या एकाच छंदाचे दोन प्रकार कल्पिले आहेत. पण तें बरोबर नाहीं.

**(अ) अभंगआरती ( प्रकार १ ला. )**

आजपर्यंतच्या लेखनानुसार वरील अभंग एकाच ओळींत लिहिला म्हणजे तिच्यांत ४४ मात्रा भरतात व यांपैकीं २२/४४ मात्रांवर यति योजिले की अभंगआरतीचा प्रकार १ ला उद्‌भव पावतो. अुदा०—

**सुंदऽरऽतें ध्यानऽ अुऽभें विऽटेवऽ।**
**रीकऽरऽकुऽटावऽरी ठेऊनिऽया ॥**

या अभंग चरणांचें वरीलप्रमाणें एका चरणयुग्मकांत लेखन केलें व मग

**सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची।**
**नुरवी पुरवी प्रेऽम कृऽपा जऽयाची ॥**

या आरतीछंदाच्या चरणांशीं त्यांची तुलना केली म्हणजे त्यांना एकच चाल लागत असून त्यांच्या प्रतिचरणीं २२ ही मात्रासंख्या व १२/१० मात्रांवर यति असल्याचें प्रत्ययास येतें. निव्वळ यतियमकयोजनेनें त्यांच्या मूळ स्वरूपांत भेद दिसतो अितकच !

नामदेवास अभंगाचा प्रणेता मानतात. त्याच्यापूर्वी अभंगरचना नव्हती असें नाहीं. पण त्याने तिला विशेष मान मिळवून दिला व तुकारामाने लोकप्रियत्व प्राप्त करून दिलें. वरील अभंगआरती छंद प्रथम नामदेवानेच हाताळल्याचें दिसतें. त्याची

**युऽगें अठ्ठावीसऽविटेवऽरी उभा ॥**
**वामांगीं रखमाई दिसे दिव्यऽशोभा ॥**

ही आरती त्या छंदांतच आहे. ‘मोठ्या’ प्रकारापासूनच त्याला हा अुपप्रकार न कळत स्फुरला असावा. जानेवारी १९३६ च्या ‘सह्याद्रीं’त ‘आरती हा अक्षरछंद की मात्रावृत्त?’ या मथळ्याची शंका श्री. सहस्रबुद्धे यांनीं प्रकट केली होती. या निबंधाने तिचे निरसन होण्यासारखें आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें ती खरोखरच मात्रिक आहे. कारण मात्रिक अभंगांतून तिचा विकास झाला आहे. पटवर्धनप्रभृति तिला लगत्वातीत अक्षरछंद समजतात तें वास्तविक बरोबर नाहीं पण सारखेपणा राखण्यासाठीं अभंगाप्रमाणेंच तिचें नियमनहि लगत्वातीत अक्षरछंदांत होणें इष्ट आहे. लगत्वातीत अक्षर-

संख्यांकरचना हें मराठींचें वैशिष्टच असून नामदेव तुकारामादि संतांच्या कृति न कळत तिच्यांतच नियमित झाल्या आहेत. त्यांच्या काळीं हा रचनाप्रकार तयार होण्याच्या मार्गांत असल्याने त्याला शास्त्रस्वरूप आलें नव्हतें. राजवाडेपटवर्धन प्रभृतींनी आता त्याला तें स्वरूप दिलें असून अभंगआरतीछंदाच्या १ल्या प्रकाराचें नियमन लगत्वातीत एकादशअक्षरसंख्येंत केलें आहे तें तसेंच राहूं देणें योग्य होईल. या प्रकारचें बहुतेक प्राचीन मराठी वाङ्मय छंदःशास्त्रदृष्टचा आता सुधारतां येण्यासारखें नसल्याने त्यास मात्रिक जातींत अगर अक्षरगणवृत्तांत बसविण्याचा खटाटोप करणें उचित होणार नाहीं. सहस्रबुद्धे आरतीला मात्रिक व अभंगाला लगत्वातींत अक्षरछंद समजतात. परंतु वास्तविक दोन्हीहि मात्रिकच आहेत. पटवर्धन आरतीला शिथिल समजतात. पण याच्या मुळाशीं ती प्रयोगावस्थेंत होती हें सत्य आहे.

## (ब) अभंगआरतीछंद ( प्रकार २ रा. )

प्रतिचरणीं २० मात्रा अथवा १० अक्षरें व १०/२० मात्रांवर अथवा ५/१० अक्षरांवर यति आले म्हणजे अभंगआरतीचा २ रा प्रकार संभवतो. उदा०--

**बोली मैंदाची बऽरऽवी अऽसे ।**
**वाटे अंतऽरीं घालावे फांसे ।।**
**कैसा वरिऽवरिऽ दिसताहे चांगऽ ।**
**नऽव्हे भाविऽकऽ केवऽळऽ मांगऽ ।।**
**( टिळा टोपी माळा कंठीं ) ।**
**अंधारीं नेउऽनिऽ चेपी घांटीं ।।**
**तुऽका म्हणे तो केवऽळऽ पुंडऽ ।**
**त्यावऽरी वाजऽतो यऽमऽ दंडऽ ।।**

( नवनीत आ. ३. अ. ३७ )

[ पांचवा चरण मुळांतच अशुद्ध आहे. ]

## २ पद्यओवीअभंग ( लहान प्रकार. )

जेव्हां गद्यओवीच्या पहिल्या तीन चरणांत १६ मात्रा अथवा ८ अक्षरें येतात व चवथा अर्धा चरण पूर्ण होऊन त्यांत देखील तितक्याच मात्रा अथवा अक्षरें भरतात, तेव्हां पद्यओवीअभंगाचा लहान प्रकार संभवतो. याविषयी विशेष विवेचन अन्यत्र आलेंच आहे. या प्रकारांत यमकयोजना नेहमीच सारखी नसते. बहुधा एक एक पंक्तियुग्मक सयमक असतें : अुदा०—

हेचिऽदानऽ देगा देवा।
तुझ्ऽा विऽसऽरऽनऽ व्हावा ॥
गुऽणऽ गाईनऽ आवऽडी।
हेचिऽ माझी सर्वऽ जोडी ॥

पण क्वचित् पहिले तीन चरण सयमक असून चवथा निर्यमक असतो. अुदा.—

देवा पायीं नाही भावऽ।
भक्तिऽवऽरीवऽरी हावऽ ॥
सऽमर्पिऽला नाही जीवऽ।
जाणःवा हा व्यभिऽचारऽ ॥

या यमकयोजनेने पटवर्धनांची दिशाभूल झाली असून त्यांनी हा एक स्वतंत्र छंद मानला आहे; पण तें बरोबर नाही. ते समजतात त्याप्रमाणें

कऽशासाठीं पोटासाठी।
खंडाळ्याच्या घाटासाठी ॥

ही रचनासुद्धा स्वतंत्र छंद नाहीं. वास्तविक ती पद्यओवी अभंगाचा लहान प्रकारच आहे.*

### (अ) पद्यओवी अभंगाच्या लहान प्रकाराचा उपप्रकार (भूपाळी)

पद्यओवी अभंगाच्या लहान प्रकाराच्या शेवटच्या म्हणजे चवथ्या चरणांत १४ मात्रा अथवा ७ अक्षरें आलीं म्हणजे त्याचा 'भूपाळी' हा उपप्रकार संभवतो. अुदा.—

---

* छंदोरचना पृ. ८१ व ८३.

रामऽ आकाशीं पाताळीं ।
रामऽ नांदे भूमंडळीं ॥
रामऽयोऽगिऽयांचे मेळीं ।
सर्वऽकाळीं तिऽष्टऽतऽ ॥

## (ब) भूपाळीचा उपप्रकार.

भूपाळीपासून एक उपप्रकार संभवतो. यांत एक, तीन, पांच इत्यादि विषम चरण भूपाळीच्या प्रथम तीन चरणांप्रमाणे षोडशमात्रिक अथवा अष्टाक्षरी असून दोन, चार, सहा इत्यादि समचरण भूपाळीच्या चवथ्या चरणांप्रमाणे चतुर्दशमात्रिक अथवा सप्ताक्षरी असतात. उदा०—

पुऽढें आता कैंचा जन्मऽ ।
ऐसा श्रमऽवारेसा ॥
पांडुरंगा ऐशी नाव ।
तारी भावऽअऽसऽता ॥

प्राचीन कवींनी यमकाला विशेष महत्व दिल्याने त्यांना न कळत हे अनेक छंद गद्यओवींतून विकास पावले आहेत.

## (क) पद्यओवी अभंगाच्या लहान प्रकाराचा एक उपप्रकार.

पद्यओवी अभंगाच्या लहान प्रकाराचें विवेचन अन्यत्र केलेंच आहे. या प्रकारच्या ओवीचा चवथा चरण अजिबात गाळला म्हणजे पुढील उपप्रकार संभवतो : अुदा०—

दूरऽनिऽळयाशेवऽटांत ।
व्योऽमधऽरेचे मीलऽनऽ ॥
तुऽझें माझे आलिंगऽनऽ ॥

या उपप्रकारांत तीन चरण असतात तर मुख्य प्रकारांत चार चरण असतात हाच या दोहोंत भेद आंहे. छंदाला बहुधा तीन चरण नसतात. या छंदाचें तें वैशिष्टच आहे.

या एकंदर विवेचनावरून 'ओवी' या जातिधर्मवाचक व्यापक लेखनप्रकाराचा निरनिराळ्या उपप्रकारांत कसा विकास झाला आहे व त्यांचें नियमन कोणत्या स्वरूपाचें आहे यासंबंधीचा थोडा फार बोध होईल असा भरवसा आहे. प्रस्तुत विषय गुंतागुंतीचा असल्याने विवरणांत अनेक दोष राहून जाणें संभवनीय आहे. तरी विद्वानांनी ते माझ्या नजरेस आणल्यास मी आपल्या श्रमांचें सार्थक मानीन.

--सह्याद्रि, डिसेंबर १९३६

# ८

# रघुनाथ पंडित : स्थळ, काळ व व्यक्ति

नलदमयंतीस्वयंवराख्यानं या सर्वश्रुत व सरसरमणीय काव्याचा कर्ता रघुनाथ पंडित याच्याविषयीं विशेष माहिती उपलब्ध नाहीं. त्यामुळें त्यांच्या स्थळांविषयीं व काळाविषयीं विद्वानांत मतभेद आहेत. इतिहासाचार्य राजवाडे आपल्या 'ग्रंथमालें' तील लेखांत म्हणतात, 'हा कवि मद्रास इलाख्यांतील आरणीचा ब्राह्मण असून फुटक्या कवडीलाहि महाग होऊन उतारवयांत वारला.[१] ही माहिती निराधार नाही. रघुनाथाशिवाय आनंदतनय, गोसावीनंदन व सुभानराव हे आणखी तिघे कवि आरणीसच झाले. रघुनाथाचीं गजेंद्रमोक्ष व रामदासवर्णन हीं दोन खंडकाव्यें तंजावरास भाऊस्वामींच्या मठांत सांपडलीं. तेव्हां तो शेजारच्या आरणीचा असावा हें अधिक संभवनीय वाटतें. तंजावरप्रांतीं त्याचा म्हणून

**म्हातारा बहु जाहलों, कवणही त्राता नसे भेटला**
**भाताची तजवीज तेच उदरीं भाता गमे पेटला**
**हातामाजि नसेच येक कवडी हा ताप आतां हरी**
**दातारा मज वाजवी सदय हो माता पिता तूं हरी**

---

१. ग्रंथमालेंतील निवडक निबंध : रघुनाथ पंडित : (पृष्ठ ५ व ७) (ग्रंथमालेंत प्रत्येक निबंध स्वतंत्र छापत असत. त्यामुळें प्रत्येक निबंधाचें पृष्ठांक स्वतंत्र आहेत.)

हा आत्मनिवेदनपर श्लोक तेथील बहुश्रुत लोकांच्या तोंडी आहे. तेव्हां तो दारिद्र्यांत वयस्क होऊन वारला असावा असें गृहित धरण्यास प्रत्यवाय नाहीं. परंतु त्याच्या वसतिस्थलास प्रतिकूल असा एक पुरावा महाराष्ट्र-भाषाभूषण आजगांवकर यांनीं आपल्या 'कविचरित्रां'त पुढें आणला आहे. कारवारला श्री. मळकर्णेकर यांस नलोपाख्यानाचें एक हस्तलिखित उपलब्ध झालें. त्यांत

**नळातें देऊनी वर अमृतपानींहि गगनीं**
**निघाले त्या मार्गें नळसह करीराजगमनी**
**स्वराज्यीं आनदें द्विजऋषि जनांतें सुखि करी**
**कथा ऐसी चंदावरकर रघूनाथाचि करी**

असा एक श्लोक आहे. त्यावरून रघुनाथ कारवार जिल्ह्यांतील चंदावरचा राहणारा असावा असा त्यांचा व 'वसणूक' कर्ते श्री. वालावलीकर यांचा कयास आहे. हा कयासच खरा धरून श्री. शणैगोंयबाब हे रघुनाथास अस्सल गोमांतकस्थ ब्राह्मण ठरवीत आहेत.[१] श्री. प्रियोळकर,[२] श्री. वर्दे[३] व प्रो. पारसनीस[४] या मताविरुद्ध आहेत. त्यांचें म्हणणें नलोपाख्यानाच्या इतर प्रतींत सदरहू श्लोक आढळत नाहीं. तेव्हां तो प्रक्षिप्त असावा. पण तो तसा प्रक्षिप्त न ठरवतांहि रघुनाथ हा तंजावरचाच होता हें सिद्ध करतां येण्यासारखें आहे. तंजावरला प्रथम शहाजीराजे गेले व तेथें त्यांनीं व्यंकोजी-करितां एक स्वतंत्र मराठी 'स्वराज्य' स्थापन केलें. तेव्हांपासून महाराष्ट्राचा या प्रांतांशीं संबंध आला. जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांत तंजावरचा

---

१. वि. ज्ञा. विस्तार. फेब्रुवारी १९३३

२. वि. ज्ञा. विस्तार. मार्च, एप्रिल, मे १९३१

३. वि. ज्ञा. विस्तार. एप्रिल व मे १९३३

४. र. पंडितकृत नलदमयंती स्वयंवराख्यान उपोद्घांत. (पृ. २ व ३) संपादक–प्रो. पारसनीस.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.



‘चंदावर’[1] असा उल्लेख असून जिजीचा[2] ‘चंदी’ असा आहे. दक्षिणेकडील या नवीन ‘स्वराज्या’ चा उल्लेख करतांना पुराण्या लेखकांनीं ‘चंदीचंदावर’[3] असा सामाजिक प्रयोग केला आहे. तेव्हां ‘चंदावर’ म्हणजे त्याच नांवाचें कारवार जिल्ह्यांतील गांव असें समजण्याचें कारण नाहीं. वरील श्लोकांतील ‘**स्वराज्यीं**’ हा शब्द शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीला उद्देशून असावा असा एक तर्क आहे. पण त्याचा अर्थ ‘भोंवतून परकी सत्तांनीं वेढलेलें दक्षिणेकडील एकमेव मराठी संस्थान’ असाहि होऊं शकतो. व्यंकोजीच्या वेळेपासून तंजावरच्या भोंवती मुसलमानांचा गराडा होता हें इतिहासज्ञांस ज्ञात आहे.[4] तेव्हां ‘**स्वराज्य**’ ह्या शब्दाबद्दल शंका असण्याचें कारण नाहीं.

वरील श्लोकांतील ‘रघूनाथ’ या शब्दांतील ‘घू’ च्या दीर्घत्वाबद्दल व तिसऱ्या आणि चवथ्या चरणांचे अंत्ययमक ‘**करी**’ या एकाच अर्थाच्या

---

१. रात्रीचें वेळेस व्यंकोजी राजे पळून चंदावरास बिरुदें घेऊन गेलें ? तेव्हां शिवाजी महाराजांनीं सकाळीं आश्चर्य केलें कीं ‘काय निमित्त पळाले. आम्हीं त्यांस धरींत होतों कीं काय ?’—सभासद बखर. पृ. ९०/९१.

२. (१) **मदेकभक्तियोगेन कर्नाटे प्राप्स्यसिध्रुवं**
**तत्रगत्वाराजगडोपत्यका चंदिपत्तने** — केशवविरचित राजाराम चरितम् १ ॥ ५१ ॥ संपादक—बा. सी. बेंद्रे.
(२) याप्रमाणें करून तेथून दरमजल चंद्रीप्रांतीं गेलें.—म.रा.चिटणीस सप्तप्रकरणात्मक चरित्र. पृ. २८४.
(३) ‘जिंजी’ स मराठी कागदपत्रें चंदी म्हणत असत. —ज्ञानकोश विभाग. १४ पृ. ज. २५८.

३. **चंदीचंदावरचा** नाच पाहती :— (१) गायकवाड घराण्याचे व इतर पोवाडे. पृ. ३५. संपादक—गो. स. सरदेसाई.
(२) महाराष्ट्र शब्दकोश. विभाग ३ रा. पृ. ११३७.

४. महाराष्ट्रीय ज्ञानकोश. विभाग १४. (पृष्ठें त. ४ ते ८ पहा).

शब्दानें साधलें असल्यानें त्याच्या खरेपणाबद्दल श्री. वर्दे यांस शंका आहे. त्यांचें म्हणणें रघुनाथानें आपल्या नांवाचा उल्लेख करतांना कोठेंहि दीर्घ 'घु' केलेला नाहीं.[१] पण श्लोक प्रक्षिप्त ठरवण्यास येवढेंच कारण सबळ नाहीं असें मला वाटतें. कारण रघुनाथानें वृत्तसुखार्थ ऱ्हस्वाचें दीर्घ आणि दीर्घाचें ऱ्हस्व अनेक ठिकाणीं केलें आहे.[२] अंत्ययमकांसंबंधींची शंका बरोबर आहे. पण येथें कारवारप्रतीच्या नकलनवीसाचा हस्तप्रसाद असावा असें वाटतें. तिसऱ्या चरणांत '**सुखकरी**' असा शुद्ध प्रयोग करून तो चवथ्या चरणांतील '**कथे**' चें विशेषण घेतल्यास शंका उद्‌भवत नाहीं. श्री. वर्दे यांच्या इतर शंका अगदींच किरकोळ स्वरूपाच्या आहेत. तेव्हां त्यांचा विचार करण्याचें कारण नाहीं.

रघुनाथानें 'पाटीभर', 'वळी' इत्यादि शब्द आपल्या काव्यांत योजले आहेत. तेव्हां तो कारवारकडचा असावा असा कविचरित्रावर आजगांवकर प्रभृतीचा एक आणखी तर्क आहे. परंतु त्यानें 'तूपकेळें'[३] सारखा अस्सल तंजावरी शब्दहि वापरला आहे हें दाखविल्यास या विधानांत तथ्य राहत नाहीं. उलट त्यानें गजेंद्रमोक्षांत हत्ती पाण्यांत उतरतांना जी ढब (pose) घेतो तिचें, व पाण्यांत डुंबतांना ज्या तऱ्हा करतो त्यांचीं, जीं हुबेहुब शब्दचित्रें रेखाटलीं

---

१. वि. ज्ञा. विस्तार. वर्ष ६४. अंक ५. पृष्ठ १५६.

२. (१) नळा ऐसा तरि कलानिधी वानूं ('धि' ऱ्हस्व हवी.)——
(२) जो राजा असतां समस्त महिला विश्रांति शेषा हिला——
('ही' दीर्घ हवी.)
नलोपाख्यान—र. पंडित

३. तूपकेळें :——फलविशेष. यांस पेंठारें असें म्हणतात. तंजावरकडे पेरू असा अर्थ. —शब्दकोश. संपा.-दाते, पृ. १५५५, खं. ४.
(उदा.-सुरुचिर रचितैसी लागलीं तूपकेळें; गजेंद्रमोक्ष; र. पंडित)

आहेत, त्यांस मुळांत आधार नाहीं.[1] तेव्हां त्यानें तंजावरसारख्या संस्थानांत हत्तीची जलक्रीडा प्रत्यक्ष पाहिली असावी अशी कल्पना केल्यास ती बरीच बरोबर ठरण्याचा संभव आहे. याशिवाय त्यानें आपल्या काव्यांत जीं पदें रचून घातलीं आहेत., त्यांवरून सुद्धां तो कर्नाटकाकडील असावा असा अंदाज होतो. कारण महाराष्ट्रांतील कवींच्या पदांच्या मानानें रघुनाथ आनंदतनयप्रभृति कर्नाटकाकडील कवींचीं पदें अधिक तालबद्ध आहेत. महाराष्ट्रांतले कवि बहुधा लगत्वातीत पदें रचीत. उलट कर्नाटकांतील कवि मात्रिक पदें लिहीत.[2] कर्नाटक संगीतांकरितां पूर्वापार प्रसिद्ध आहे. सारांश रघुनाथ पंडित हा तंजावरप्रांतांतील आरणीचा राहणारा होता हा जो समज आजवर चालू आहे, त्यास ढळ पोंचण्याचें प्रयोजन नाहीं.

रघुनाथ हा तंजावरचा ठरल्यावर श्री. शणैगोंयबाब यांचा 'तो अस्सल गोमांतकस्थ ब्राह्मण होता' हा तर्क उरण्याचें कारण नाहीं. कारण त्यांनीं 'चंदावर म्हणजे कारवार जिल्ह्यांतील गांव' या पायावर तो उभारला आहे. परंतु क्षणभर त्यांचा हा तर्क खरा धरून चाललें, तरी एक अडचण पडतेच. महाराष्ट्रसारस्वतकार भावे यांनीं 'काव्यसंग्रहा' वरून 'रघुनाथ पंडित हा आनंदतनयाचा व्याही होता व आनंदतनयाचें सीतास्वयंवर वाचून त्यास नलोपाख्यान लिहिण्याची स्फूर्ति झाली'[3] अशी माहिती दिली आहे. याच अर्थाची माहिती कै. हरि त्रिंबक बापट यांनीं आपल्या 'रघुनाथ पंडितांचे

---

१. तटाकाचे तोयीं हळुच उतराया चतुर तो । पुढारी दो पायीं तनुभर उपायीं उतरतो ।। व कांहींसा उफळे जळीं गज बळें कांहीं तळा लागतो । हे दोन श्लोक वाचा आणि श्रीमद्भगवतांतील '**विगाह्य तस्मिन्नमृताम्बुनिर्मलं**' पासून पुढील श्लोक वाचा. ( स्कंध ८, अ. २. )

२. नमुन्यादाखल भक्तिमार्गप्रदीपांतील रामदासांचें 'धांव रे ! रामराया' व वामनाचें 'अर्जुना, तूं जाण रे !' हीं पदें व आनंदतनयाचें 'कां रे ! नाठविसी कमलनयन वासुदेव' हें पद पहा.

३. वि. ज्ञा. विस्तार, वर्ष ६४, अं. ४, पृ. ११९.

काव्यग्रंथ' या प्रकाशनांत दिली आहे. पण त्यांत त्यांनीं 'आनंदतनय व रघुनाथ पंडित हे नातेवाईक होते.'[१] येवढाच उल्लेख केला आहे. महाराष्ट्रीय ज्ञानकोशांत याच अर्थाची माहिती आनंदतनय व रघुनाथ पंडित या दोन निरनिराळ्या सदरांत निरनिराळ्या रीतीनें देण्यांत आली आहे. पहिल्या सदरांत 'रघुनाथ पंडित व आनंदतनय समकालीन असून त्यांचें एकमेकांशीं व्याह्याव्याह्याचें नातें होतें.[२] अशी माहिती असून दुसऱ्यांत 'रघुनाथ पंडिताची मुलगी आनंदतनयाच्या मुलास दिली होती'[३] अशी निराधार माहिती आहे. या एकाच अर्थाच्या परंतु तपशीलांत मेळ नसलेल्या माहितीचें सार एवढेंच दिसतें कीं, रघुनाथ पंडित व आनंदतनय यांच्या **घराण्यांत** सोयरिकीचा संबंध असावा. '**व्याही**' या शब्दानें ते उभयतांचे व्याही होते व म्हणून समकालीन असावेत असा निष्कर्ष काढण्याचें कारण नाहीं. त्यापासून फार तर या उभयतांच्या घराण्यांत **केव्हांतरी** वैवाहिक संबंध घडला होता एवढेंच म्हणतां येईल. 'व्याही' या शब्दाचा अर्थ विवाहानें संबद्ध झालेलीं घराणीं' असाहि होऊं शकतो. आनंदतनय व रघुनाथ हे दोघेहि कवि असल्यामुळें त्यांच्या घराण्यांचा संबंधाबरोबरच त्यांच्या नांवांचा संबंध जोडला गेला असावा व त्यामुळें ते समकालीन होते ही समजूत प्रचलित झाली असावी. आनंदतनय हा ज्ञातीचा देशस्थ आश्लायन ब्राह्मण होता. तेव्हां त्याच्या घराण्याशीं सोयरीक जोडलेला रघुनाथ हा गोमंतकस्थ ब्राह्मण असणें शक्य नाहीं. ब्राह्मणांच्या पोटजातींत अजूनसुद्धां वैवाहिक संबंध सर्रास रूढ झालेले नाहींत. तेव्हां त्याकाळीं या उभयतांच्या घराण्यांचा अंतर्जातीय संबंध असावा अशी कल्पना करणें तर अगदींच हास्यास्पद होईल. तात्पर्य, रघुनाथ हा देशस्थ ब्राह्मण असावा ही पूर्वीची समजूतच अधिक सयुक्तिक दिसते.

---

१. र. पंडितासंबंधानें उपलब्ध अल्प माहिती. पृ. ३.

२. ज्ञानकोश, वि. ७, आ. १४६.

३. ज्ञानकोश, वि. १९, र. १०. (या सदरास ज्ञानकोशकारांनीं आधारभूत ग्रंथांची यादी जोडलेली नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.)

येथपर्यंतच्या विवेचनावरून रघुनाथ पंडिताच्या स्थळासंबंधींचा व जातीविषयींचा वाद कसा निराधार आहे हें समजलेंच असेल. तरी आतां त्याच्या काळासंबंधींच्या वादाचा विचार करूं.

रघुनाथ पंडित व आनंदतनय यांच्या सोयरिकीसंबंधीं जी दंतकथा वर दिली आहे, ती तंजावरप्रांतीं जातीनें हिंडून आलेल्या राजवाड्यांच्या माहितींत समाविष्ट नाहीं. तथापि ती अनेक ग्रंथकारांनीं दिली असल्यामुळें व तिच्या तपशिलांत तफावत असली तरी तत्त्वांत ते दोघे नातेवाईक होते या अर्थाचें जे सत्य आहे तें चिकित्सक बुद्धीस पटत असल्यामुळें, ती तेवढ्यापुरती खरी मानण्यास हरकत नाहीं. या दंतकथेच्या आधारावर व राजवाड्यांनीं रामदासवर्णनावरून रघुनाथ पंडिताच्या काळासंबंधीं जो एक स्वतंत्र निष्कर्ष काढला आहे[१] त्याच्या बळावर श्री. प्रियोळकर हे त्यास शिवकालीन ठरवत असून तो शिवाजीमहाराजांच्या अष्टप्रधानांपैकीं होता असें विधान करीत आहेत. कारण दुसऱ्या एका दंतकथेप्रमाणें आनंदतनय हा शहाजी राजांचा गुरु असून शिवकालीन होता. भक्तमंजरींत त्याचा मृत्यु सन् १७२३ दिला आहे;[२] व राजवाड्यांच्या निष्कर्षाप्रमाणें रघुनाथ पंडित हा रामदासांचा समकालीन होता. तेव्हां आनंदतनयाचा व्याही व रामदासांचा शिष्य रघुनाथ हा शिवाजीमहाराजांच्या कारकिर्दींत झाला असावा व तो त्यांच्या अष्टप्रधानांपैकीं रघुनाथ पंडितराव हा असावा अशी श्री. प्रियोळकरांची ठाम

---

१. 'रामदासवर्णनांत कवि आपणा स्वतःस रामदासांच्या शिष्यवर्गांत गणतो; व वर्तमानकालाचा उपयोग करून वर्णनसमयीं समर्थ जिवंत होते असें दर्शवितों; यावरून त्याचा समय शक १५८२ पासून १६४३ पर्यंत असावा असें निश्चयानें विधान करतां येतें.' — राजवाडे. ग्रंथमाला : निवडक निबंध. र. पंडित. पृ. ७.

२. ज्ञानकोश. वि. ७. आ. १४६.

समजूत आहे.[१] परंतु श्री. वर्दे[२] व प्रो. कोलते[३] यांना ही समजूत पटत नाहीं. मलाहि त्यांच्याप्रमाणेंच रघुनाथ हा शिवकालीन नसावा असें वाटतें. रघुनाथ व आनंदतनय नातलग असले तरी समकालीन नव्हते; व व्याही म्हणवले जात असले तरी ते कोणत्या अर्थानें म्हणवले जात याविषयींचें विवेचन मी वर केलेंच आहे. तेव्हां त्याची पुनरुक्ति करीत नाहीं. सारांश रघुनाथ पंडितास आनंदतनयाचा समकालीन समजण्यासारखा सबळ पुरावा नाहीं. राजवाडे त्यास 'रामदासवर्णनां'तील वर्तमानकालीन उल्लेखावरून रामदासांचा समकालीन ठरवितात. पण हा उल्लेख historical presentच्या स्वरूपाचा असून समर्थासंबंधींच्या दंतकथांचें वर्णन त्यानें इतर कवींपासून उचलणें शक्य आहे. याविषयींचें विवेचन श्री. वर्दे व प्रो. कोलते यांनीं आपापल्या निबंधांत केलेंच आहे, तें विचारांत घेणें आवश्यक आहे. तेव्हां त्यांस रामदासकालीनहि ठरवितां येत नाहीं.

निबंधमालाकार चिपळूणकर यांनीं निबंधमालेंत 'रघुनाथ पंडित हा १८ व्या शतकांत पेशव्यांच्या अंमलांत झाला असावा'[४] असा अभिप्राय प्रकट केला आहे. ऐन पेशवाईंतील प्रख्यात कवि मोरोपंत याच्या भाषेंत व रघुनाथाच्या भाषेंत फारसा फरक नाहीं. तेव्हां हे दोघं समकालीन असावेत किंवा रघुनाथ हा मोरोपंतानंतर झाला असावा अशा प्रकारचीं मतें श्री. वर्दे व प्रो. कोलते यांनीं आपापल्या लेखांत व्यक्त केली आहेत. या मतांच्या पुष्टीकरितां त्यांनीं मोरोपंतानें आपल्या सन्मणिमालेंत आनंदतनयास वंदन

---

१. दमयंतीस्वयंवर : संपा.–अ. का. प्रियोळकर.

२. वि. ज्ञा. विस्तार. एप्रिल व मे १९३३.

३. फुलोर. शारदामंडळ; मॉरिस कॉलेज; नागपूर. (पृष्ठें २० तें ३२) व प्रतिभा. वर्ष ४. अंक ८.

४. वि. ज्ञा. विस्तार. व. ६४. अं. ४. पृ. ११८.

केलें आहे.[१] परंतु रघुनाथास वंदन केलेलें नाहीं हा मुद्दा पुढें आणला आहे. त्यांचें म्हणणें रघुनाथ हा मोरोपंतानंतर झाल्यामुळें त्यास माहित नसावा. त्यांच्या या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे यांत संशय नाहीं. इतर कवींच्या काव्यांच्या मानानें रघुनाथाच्या काव्यांची प्रसिद्धिहि अगदीं अलीकडील आहे हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. माझा तर्क तर असा वाहतो कीं रघुनाथ हा मोरोपंतांच्या हयातींतच झाला असावा. परंतु महाराष्ट्रापासून दूर राहत असल्यामुळें त्याचा उदोउदो झाला नसावा. कदाचित् मोरोपंतांच्या लोकप्रिय पल्लेदार आर्याबद्ध आख्यानापुढें त्यांचीं त्रुटित आख्यानें फिकीं पडलीं असावींत. रघुनाथाची भाषा रामदासी पंथीयांच्या भाषेप्रमाणें ओबड-धोबड व फारसीमिश्रित नाहीं. तिच्यांत राजी, गाझी, तजवीज, निगा असे कांहीं फारसी शब्द आले आहेत हें खरें; पण त्यांचें प्रमाण फारच अल्प आहे. त्याची रचनाहि रामदासीयांप्रमाणें वेडीवांकडी नाहीं. ती मोरोपंतांच्या रचनेप्रमाणें व्यवस्थित आहे. त्याची भाषाहि मोरोपंतांच्या भाषेप्रमाणें संस्कृतप्रचुर आहे. मात्र ती तिच्याइतपत क्लिष्ट नाहीं. तेव्हां मोरोपंतांचा रघुनाथावर प्रभाव पडला असावा असें वाटतें.

रघुनाथानें मोरोपंताचें वाङमय वाचलें असावें असें विधान करण्यास थोडाफार पुरावाहि देतां येण्याजोगा आहे. त्याला गजेंद्राचें आख्यान रचण्याची स्फूर्ति होण्यास मोरोपंताच्या 'केकावलीं' तील

---

१. (१) आनंदतनय अरणीकर शोभवि फार कवन यमकांहीं
तत्सूक्ति पाठ ज्याला त्याचे पाहें न भवन यम कांहीं
—मोरोपंत (सन्मणिमाला).

(२) येथें एक खुलासा केला पाहिजे. तो हा कीं आनंदतनयाच्या 'सीतास्वयंवरां' त व रघुनाथाच्या 'दमयंतीस्वयंवरां' त काडीचेंहि साम्य नाहीं हें कोणाहि अभ्यासकास सहज समजण्यासारखे आहे.

**दया प्रकट दाखवि कवण सांग त्या वारणीं ?**
**सतीव्यसनवारणीं ? जयजयार्थ त्या वा रणीं ?** [१]

हा श्लोकार्ध कारण झाला असावा असें वाटतें. कारण रघुनाथाच्या 'गजेंद्र-मोक्षां'त

**सतीचे बोलावे कळतिल गजेंद्रास पुढती** [२]

अशी एक ओळ आहे. तिच्यांतील 'सती' या शब्दाचा अर्थ केकावलींतील भागवतांत हा शब्द अथवा या अर्थाची कल्पना नाहीं.[3] तेव्हां रघुनाथानें हा शब्द व ही कल्पना केकावलीवरून उचलली असावींत असें वाटतें. त्याला गजेंद्राचें आख्यानसुद्धां केकावलींतील वरील श्लोकार्धावरून सुचलें असावें, कारण इतर अनेक आख्यानें वगळून त्यानें नेमकें गजेंद्राचेंच आख्यान निवडलें आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कदाचित् केकावलि वाचतांना त्याला नलोपाख्यानांतील हंसाच्या व गजेंद्रमोक्षांतील हत्तीच्या बंधनस्थितींत विलक्षण विस्मयकारक साम्य दृष्टिगोचर झालें असावें, व म्हणून त्यानें जो धांवा केला आहे, तो वेदांतमय आहे.[४] उलट रघुनाथानें गजेंद्राच्या मुखीं जो धांवा घातला आहे, तो सर्वस्वी स्वतंत्र आहे. त्यांत वेदांतनिरूपणाचें नांव नाहीं; पण श्रीकृष्णाच्या अनेक दयामय लीलांचा उल्लेख आहे. या लीलांपैकीं

---

१. केकावलि. श्लोक ६. निर्णयसागरप्रत.

२. गजेंद्रमोक्ष. श्लोक २१. र. पंडितकाव्यग्रंथ. बापटप्रत.

३. 'स. धर्मतप्तः करिभिः' या श्लोकानंतर भागवतांत वरील अर्थाचा श्लोक नाहीं. तो रघुनाथाचा स्वतंत्र आहे. अष्टमस्कंध. प्र. २. श्लोक २२ पासून पुढें पहा.

४. **'ओं नमो भगवते तस्मै यत एतच्चिदात्मकम्'**—श्रीमद्भागवत अष्टमस्कंध. अ. ३. श्लोक २ पासून पुढें पहा.
व 'पदविदारविलास विशारदें'—गजेंद्रमोक्ष. श्लोक ३४. बापटप्रत. यांतील सर्व धांवा वाचा.

बहुतेक सर्वांचा मोरोपंतानें आपल्या केकावलींत उल्लेख केला आहे.[१] तेव्हां रघुनाथानें केकावलि अभ्यासिली असावी हा तर्क अधिकच बळावतो. मोरोपंताच्या 'सभापर्वा'तील द्रौपदीच्या धांव्यांत व रघुनाथाच्या 'गजेंद्रमोक्षां'-तील गजेंद्राच्या धांव्यांत साम्य नाहीं. परंतु सभापर्वांतील धांव्यांतसुद्धां गजेंद्राचा उल्लेख आलेला आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे.[२] केकावलींत मोरोपंतानें ज्याप्रमाणें ईश्वराचा आठव केला आहे; त्याचप्रमाणें रघुनाथानें तो गजेंद्रमोक्षांत केला आहे. त्यांत फरक येवढाच आहे कीं त्यानें तो गजेंद्राच्या आडपडद्याने केला आहे.

---

१. (१) अजांड शतकोटि ज्या उदरिं सर्वदा नांदवा.—केका. १७
चोज काय भुवनत्रय पोटीं. —ग. मो. ४१

(२) व्रजावन करावया बसविलें नखाग्रीं धरा. —केका. ५
(अ) वाहसी नग तसा नग बोटीं —ग. मो. ४१
(ब) देवेंद्र जै रिचवलाच बलाहकातें । तैं गोकुळावरि तुवां धरिलें नगातें. —ग. मो. ४३

(३) सतीव्यसनवारणीं ? जयजयार्थ त्या वा रणीं.—केका. ६
(अ) हे रजोयुत इला न शिवावें । हें न मानुनि तुवां निज भावें द्रौपती पटशतावृत केली. इ.—ग.मो.४२
(ब) वांचावया विजयवीर उपाय केला । भीष्मासमीप पणही तृणतेस नेंला. —ग. मो. ४५

(४) दवाग्नि जठरीं अतिक्षुधित. इत्यादि. —केका. १८
वोणवा गिळिसि गोपविलासा. —ग. मो. ३७

(५) जशी पृथुकतंदुल प्रसृति आप्तकामा. इत्यादि —केका. ३८
पोहे पसाभर करीं तुज दे सुदामा । पोहे तयास्तव तया सदनीं सदा मा. —ग. मो. ४४

२. बिरुदावळी तुझी हे **गजवरवरदा** ! कधीं न हो गलिता. अ. ५. आ. ७२.

मोरोपंत व रघुनाथ यांच्या समकालीनत्वासंबंधी अथवा रघुनाथ हा मोरोपंतानंतर झाला असावा या संबंधीं एक आणखी प्रमाण देतां येण्याजोगें आहे. पण तें असावें तितकें बळकट नाहीं. दिंडी हा असंस्कृत मात्रिक छंद रघुनाथाच्या नलोपाख्यानामुळेंच विशेष प्रसार पावला आहे.[१] हिंदी भाषेंतील दोहा, सुरा इत्यादि छंद हाताळणाऱ्या मोरोपंतानें दिंडी रचलेली नाहीं. त्याच्या पूर्वीं झालेल्या आनंदतनयानें मोजक्याच दिंड्या लिहिल्या आहेत;[२] व उद्धवचिद्घनानें ध्रुवाख्यान, श्रियाळचरित्र व रंभाशुकसंवाद हीं तीन आख्यानें दिंडी छंदांत रचलीं आहेत. मोरोपंतानें आपल्या सन्मणिमालेंत या दोघांनाहि वंदिलें आहे.[३] तेव्हां त्यास दिंडी अपरिचित असावी असें दिसत नाहीं. पण त्याकाळीं तिचें नियमन झालें नसल्यामुळें व नलोपाख्यानाच्या प्रसिद्धीनंतरच तिला नियमित स्वरूप प्राप्त झालें असल्यामुळें कदाचित् अनियमित ओवीं-प्रमाणेंच त्यानें तिचा स्वीकार केला नसावा. मोरोपंतानें नियमित अक्षर-संख्याक अभंग रचले आहेत.[४] परंतु त्याच्यापूर्वीच्या बहुतेक सर्व कवींनीं हाताळलेला सोपा पण अनियमित ओवी छंद लिहिलेला नाहीं हें लक्षांत घेण्या-सारखें आहे. मोरोपंतानें त्याच्या वेळेपर्यंत अनियमित असणारी दिंडी

---

१. नलोपाख्यानांत वसंततिलका ७६ व त्याखालोखाल दिंड्या ७२ आहेत.

२. आनंदतनयाच्या कवितासंग्रहांतील (काव्यसंग्रह प्रत) विश्वामित्राभि-गमन, शिबीआख्यान व पूतनावध हीं प्रकरणें पहा.

३. (१) आनंदतनयाविषयींची उक्ति मागें दिलीच आहे. उद्धवचिद्घना विषयींची उक्ति अशी :—

(२) उद्धवचिद्घन केवळ मी मोर तयासमोर हर्षानें
तांडव करितों होऊनि गतताप तदीय सूक्तिवर्षानें

—मोरोपंत. (सन्मणिमाला.)

४. 'रुक्मिणीहरणगीत' व 'सीतागीत' हीं दोन मुद्दाम मुलींकरितां रचलेलीं चिमुकलीं काव्यें पहा.

मराठी ग्रंथ संग्रहालय,



रचलेली नसली,[१] तरी रघुनाथानें त्यानें लोकप्रिय केलेल्या आर्या लिहिल्या आहेत हें ध्यानांत घेण्याजोगें आहे. इ. स. १७२९ ते १७९४ हा मोरोपंतांचा जीवनकाल होता. तेव्हां रघुनाथ हा त्या सुमारास किंवा त्यानंतर उदयास आला असावा असा तर्क होतो. येथें एक आणखी मुद्दा विचारांत घेण्यासारखा आहे. रघुनाथाच्या गजेंद्रमोक्षांतील 'थोर हे उपेक्षा माझी– आदरिली काय ? मुकुंदा !' हें पद मध्वमुनीच्या 'उद्धवा ! शांतवन कर जा' या सुप्रसिद्ध पदाच्या चालीवर आहे. तेव्हां रघुनाथ हा त्या सुमारास पेशवाईंत झाला असावा या अनुमानास जोर येण्यास भरपूर जागा आहे.

पण आतांपर्यंतचें एकंदर विवेचन बाजूस ठेऊनहि रघुनाथ पंडित हा सुविख्यात वऱ्हाडी संत देवनाथ यांच्या १७५४ ते १८२१ या जीवनकालांत विद्यमान होता असें विधान करण्यास मुबलक पुरावा आहे.[२] 'पंढरपुरास रघुनाथाची व देवनाथाची गांठ पडली असतांना रघुनाथानें आपलें नलोपाख्यान देवनाथास देऊन त्यांस त्याचा कीर्तनांत उपयोग करण्याची विनंति केली. परंतु देवनाथ हे ज्ञानेश्वर एकनाथांप्रमाणें संतकवि असल्यामुळें त्यांनीं रघुनाथा-सारख्या पंडितकवीचें काव्य आपले शिष्य दयाळनाथ यांच्या हवालीं केलें' अशी एक दंतकथा कै. अ. सी. साठे यांनीं नाथांच्या कवितासंग्रहांत दिली आहे.[३] त्या दंतकथेंत बरेंच तथ्य दिसते. कारण रघुनाथाप्रमाणेंच दयाळनाथांनीं अक्षरगणरचना केली आहे;[४] देवनाथांनीं ती केलेली नाहीं. जरी क्षणभर ही दंतकथा असत्य धरली, तरी देवनाथांच्या 'संतमालिकेंत' रघुनाथाच्या

---

१. दिंडीसंबंधीं सविस्तर विवेचन श्री. प्रियोळकर यांच्या 'अस्सल मराठी छंदांचा ऐतिहासिक विचार.'–लेखांक २ यांत पहा. (वि. ज्ञा. विस्तार व. ६४. अ. ११ व १२.)

२. वैदर्भकाव्यसंग्रह. गुच्छ २ रा. श्री. देवनाथांची कविता. पृ. २९ पहा.

३. „ „ श्री. देवनाथांची कविता. पृ. ६६ पहा.

४. „ गुच्छ १ ला. श्री. दयाळनाथाची कविता. शेवट पहा.

नांवाचा निर्देश केलेला आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे.[१] मोरोपंतांच्या सन्मणिमालेंत रघुनाथाच्या नांवाचा निर्देश नाहीं; परंतु देवनाथांच्या संतमालिकेंत तो आहे. तेव्हां हे दोनहि पुरावे जमेस धरून प्रो. कोल्ते हे 'नलदमयंतीस्वयंवराख्याना' ची रचना इ. स. १७९४ ते १८२१ मध्यें केव्हांतरी झाली असावी' असा निष्कर्ष काढतात.[२] तो बराच सयुक्तिक आहे यांत शंका नाहीं. पण तो असावा तितका अचूक नसल्यामुळें येथें त्यासंबंधीं थोडासा सविस्तर पण खोल विचार करूं.

रघुनाथ हा बराच म्हातारा होऊन दारिद्र्यांत वारला. त्याच्या उभ्या आयुष्यांत त्याला कोणी दाता भेटला नाहीं. या त्याच्या आत्मनिवेदनपर गोष्टींच्या प्रकाशांत तंजावरच्या राजकीय इतिहासाकडे पाहिलें, तर तो इ. स. १७३५ तें १७९८ च्या दरम्यान केव्हांतरी होऊन गेला असावा असें बरेंचसें बिनचूक विधान करतां येते. साठी उलटली म्हणजे म्हातारपण आलें असा सार्वत्रिक समज आहे. वयाच्या ६५ व्या वर्षीं दिवंगत झालेल्या मोरोपंतानेंहि 'केकावलि' या आपल्या अखेरच्या काव्यांत स्वतःच्या वृद्धावस्थेचा 'कृतांतकटकामलध्वज जरा दिसों लागली'[३] असा उल्लेख केला आहे. तेव्हां वर दिलेला काळ लक्ष्यांत घेऊन रघुनाथ हा साठी उलटल्यावर वारला असावा अशी कल्पना करण्यास हरकत नाहीं. शिवाय तो आपणाला कोणी दाता भेटला नाहीं अशी तक्रार करतो. तो शिवाजीचा समकालीन व रामदासांचा शिष्य मानल्यास इ. स. १६७९ सालीं स्वतः रामदासांनीं व्यंकोजी राजांच्या खास निमंत्रणाचा स्वीकार करून तंजावरास एक मठ स्थापन केला

---

१. रघुनाथपंडित राणा कवि थोर समर्थ.
अद्‌भुत रस केला टीका नैषध ग्रंथ. --देवनाथकविता. पृ. ४२२.

२. 'रघुनाथपंडिताच्या कालनिर्णयाची एक दिशा'—फुलोर. पृ. ३१.

३. केकावलि. केका. ४६.

दा. क. ११५२३

होता त्यांत तो असावा असें गृहित धरावें लागतें.[१] तेथले मठस्थ गोसावी व्यंकोजीच्या आश्रयास अंतरले असतील हें सुतराम् संभवत नाहीं. तेव्हां रघुनाथ हा त्याकाळीं नसावा असेंच स्पष्ट होतें. तंजावरचे सुरवातीचे राजपुरुष व्यंकोजी ( इ. स. १६३१–१६८२ ), शहाजी (१६८२–१७११), व सरफोजी ( १७११–१७२८ ) या सर्वांच्या कारकिर्दी सुबत्तेंत गेल्या. तेव्हां रघुनाथासारख्या पंडितानें त्याकाळीं आपल्या दारिद्र्याचें रडगाणें गाण्याचें कारण नव्हतें असें वाटतें. इ. स. १७२८ ते १७३५ तुकोजी गादीवर होता. हा तर मोठा 'राजकारणी, कुशाग्र, विद्याभिलाषी व विद्वानांचा पोशिंदा होता. यास संस्कृत तामीळ, मराठी व फारसी भाषा अवगत होत्या.' तेव्हां रघुनाथासारखा पंडितकवि याच्या राज्यांत आश्रयहीन राहिला असावा हें शक्य वाटत नाहीं. इ. स. १८०८–१८३२ दुसरा सरफोजी हा राज्य करीत होता. त्यानें आपला काळ ग्रंथसंग्रह, विद्याप्रसार व विद्याव्यासंग यांत घालवला. त्यानें अनेक ग्रंथ विद्वानांकडून तयार करविले व राजवाड्यांत एक सरस्वती मंदिर स्थापन केलें. अशा उदार नृपाच्या आश्रयास रघुनाथासारखा व्युत्पन्न पंडित मुकला असावा हें संभवनीय दिसत नाहीं. इ. स. १७६३–१७८६ तुळजाराजा हा राज्य करीत होता. त्याच्या राज्यांत देशांत भयंकर दुष्काळ व सांथ पसरून अनेक लोक मेले. 'भाताची तजवीज होत नाहीं' असे करुण उद्गार काढणारा विद्वान् परंतु दुर्दैवी रघुनाथ पंडित याच सुमारास झाला असावा असें अनुमान विशेष संभवनीय दिसतें. यावेळीं

---

१. (१) ग्रंथमाला निवडक निबंध. श्रीसमर्थ रामदास. राजवाडे पृ. ४.
(२) ( राजवाड्यांना गजेंद्रमोक्ष व रामदासवर्णन हीं काव्यें ज्या भाऊस्वामींच्या मठांत मिळालीं, तो रामदासीच मठ आहे असें येथील एक साहित्यिक श्री. भाई कल्याण हे सांगतात. विहंगम– मार्च, एप्रिल १९३६ च्या जोड–अंकांत त्यांचा 'दक्षिणेकडील मराठे' हा तंजावरच्या राजघराण्यावरील लेख आला आहे. तो जिज्ञासूंनीं अवश्य वाचावा. )

तो पन्नाशीच्या घरांत असल्यामुळें ‘म्हातारा बहु जाहलों’ हे उद्‌गार सार्थ वाटतात व या काळचा राजाहि ‘दुबळा व गैरमुत्सद्दी’ असल्यामुळें त्या पुढचे ‘कवणही त्राता नसे भेटला’ हे उद्‌गारहि पटतात. सारांश इ. स. १७३५–१७९८ हा रघुनाथ पंडिताचा काळ मानण्यास कोणताच प्रत्यावाय नाहीं.[1]

आतांपर्यंत रघुनाथ पंडिताच्या स्थला–व–काळासंबंधींच्या वादांचा विचार करून योग्य वाटला तो निकाल लावला. आतां त्याच्या वाङ्मयांतील अंतर्गत प्रमाणांवरून त्याचा ‘व्यक्ति’ या नात्यानें तर्कशुद्ध विचार करूं.

रघुनाथ हा व्युत्पन्न पंडित असून आयुष्याच्या पूर्वार्धांत एखाद्या राजकीय खात्यांत कामकाज करीत असावा असें दिसतें. त्याच्या वाङ्मयांत फारसी शब्दांचें प्रमाण फारसें नाहीं. परंतु राजी, गाझी, शिपाई, हेजीब, निगा, जागा इत्यादि जे निवडक शब्द आले आहेत, ते त्या काळच्या उर्दू शब्दांनीं गजबजलेल्या कचेऱ्यांच्या परिस्थितीचे द्योतक आहेत. गजेंद्रमोक्षांत मूळ भागवतांत नसलेली अशी आयुधाची

**श्रृंगाभिधानक विशाळ धरूनि भाला**
**तेणें करूनि गिरि तो गिरितो नभाला.**[2] —ग. मो. श्लोक ४.

एक कल्पना आहे. यावरून त्यानें राजकीय कामकाजांत, विशेषतः सेनाखात्यांत, हे शब्द ऐकले असावेत असा तर्क केल्यास तो चुकूं नये असें वाटतें. आयुष्याच्या मध्यांत त्यानें कथेकऱ्याचा पेशा पत्करला असावा. कारण त्याचीं कथाबद्ध आख्यानें नेमकीं दोनच आहेत. त्याच्या या पेशासंबंधीं ‘कथा ऐसी चंदावरकर रघूनाथचि करी’ हे उद्‌गार लक्षांत घेण्यासारखे आहेत. हा पेशा पत्करण्यास त्याला सरकारी कामकाजांतील एखादी चूक नडली असावी असें दिसतें. कारण ‘हातामाजि नृपा! तुझ्या गवसलों आतां

---

१. तंजावरच्या इतिहाससंबंधांचीं ही सर्व माहिती ज्ञानकोश विभाग १४ तील तंजावर या सदरांतून घेतली आहे.

२. श्रीमद्‌भागवत अष्टम स्कंध प्र. श्लो. २.
‘तावता विस्तृतः पर्यक त्रिभिः श्रृंगैः पयोनिधिम्’ पासून पुढें पहा.

करावें कसें ?' या चरणास मूळ नैषधांत आधार नाहीं.[1] शिवाय हंस व गजेंद्र यांच्या अगतिक स्थितीचीं जीं सारख्या प्रकारचीं करुण शब्द-चित्रें त्यानें रंगविलीं आहेत, त्यावरून तोहि तशा प्रकारच्या पेंचांत सांपडला असावा असें अनुमान करतां येतें. नाहींतर एकाच रंगाचीं चित्रें रंगवून तेच ते सूर काढण्याचें कारण काय ? कदाचित् हंस व गजेंद्र यांच्या पडद्याआड त्यानें स्वतःची दयनीय दशा प्रकट करून दुःख हलकें करण्याची संधि साधली असावी. त्याचप्रमाणें 'कठिण समय येतां कोण कामास येतो ?' व 'तसे ते गेले कीं विषम समयीं सोडुनि कसे' या त्याच्या निराशापूर्ण उक्तींतहि त्यानें संसारांतील विषम अनुभवांचा थोडाफार तरी कडवटपणा चाखल्याची ग्वाही मिळत आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आयुष्याच्या उत्तरार्धांत जरेनें ग्रासल्यावर व दारिद्र्यानें वेढल्यावर रघुनाथ वैरागी बनून रामदासी मठांत प्रविष्ट झाला असावा असें वाटतें. कारण प्रियोळकर समजतात त्याप्रमाणें तो मूळचा रामोपासक दिसत नाहीं. वर्दे हे समजतात त्याप्रमाणें तो कृष्णोपासकच असावा. कारण त्याच्या तीनहि काव्यांत त्यानें आपण कृष्णोपासक असल्याचें दर्शविलें आहे.[2] 'रामदासवर्णन' त्यानें त्या पंथांत शिरल्यावर केवळ कर्तव्य म्हणून रचलें असावें. म्हणूनच तें साधें व सांप्रदायिक स्वरूपाचें उतरलें आहे. 'नलोपाख्यान' हें त्याचें सुरवातीचें काव्य आहे. कारण त्यांत त्याच्या

---

१. मूळ नैषधांतील चरण असा :—... ... ... ... ..

... ... ... ... ...

न्नहो विधे त्वां करुणा रुणद्धि न।

२. (१) बोले त्या रघुनाथ पंडित कवी भेटे हरी सादरें. —न. द. आ. श्लोक (बा. प्र.) २४२.

(२) सुलभलभ तयाला श्रीहरी होत नाहीं. —ग. मो. श्लोक ५७. (बा. प्र.)

(३) दातारा मज वाचवी सदय हो माता पिता तूं हरी (बा. प्र. पृ. ३.)

(४) याशिवाय गजेंद्रमोक्षांत कृष्णाच्या लीलांचाच निर्देश आहे.

विद्वत्तेचें प्रदर्शन दिसतें. बहुधा प्रत्येक कवि आरंभीं आरंभींच आपल्या काव्यांत स्वतःचें ज्ञानसर्वस्व कोंबण्याचा खटोटाप करीत असतो. ‘गजेंद्रमोक्ष’ हें उपरति झाल्यानंतरचें काव्य असावें. कारण त्यांत उत्कृष्ट भक्तिरस प्रतिबिंबित झाला आहे.

रघुनाथ पंडिताच्या वाङमयाचा विचार केल्यास तें सुशिक्षित रसिकाच्या हृदयाचा ठाव घेणारें आहे हें पटल्याशिवाय राहत नाहीं. मात्र त्याची प्रतिभा खंड पावणारी असून नवनवोन्मेषशालिनी नसावी असें दिसतें. उदाहरणादाखल दमयंतीस्वयंवरांतील व गजेंद्रमोक्षांतील ठराविक शब्दांनीं केलेलीं तींच तींच वर्णनें निर्दिष्ट करतां येतील.[१] इतकें असूनसुद्धां तीं आकर्षक उतरलीं आहेत हें मात्र कबूल केलें पाहिजे. त्याचें ‘नलदमयंती स्वयंवराख्यान’ हें नैषधाच्या फक्त एका विवक्षित भागावरील टीका म्हणून अवतरलें आहे.

---

१. (१) (अ) लतेतळीं रुंद निरुंद कालवे, (ब) उपरि सकंटक साचे इ., (क) तया वनीं एक तटाक तोयें, (ड) वीतां मरंद उदरंभर बंभरांचे व (इ) अमृतही पयहि म्हणवीतसे. —हे पांच श्लोक दमयंतीस्वयंवर व गजेंद्रमोक्ष या दोनहि आख्यानांत पुनरुक्त झाले आहेत.

(२) तेणें तसें नगर तें धरितां **निडारीं** —द. स्व. बा. प्र. श्लो. ८८.
तंव वन वरूणाचें लक्ष झालें **निडारीं**—ग. मो. „ २

(३) हस्तीं करी वलय उंच अशा **उपायीं**—द. स्व.
पुढारीं दो पायीं तनुभर **उपायीं** उतरतो—ग. मो.

(४) भूपें हळूच धरिला कलहंस **पायीं** —द. स्व.
नक्रें तया अवचितेंचि धरोनि **पायीं**—ग. मो.

(५) **गजबज** बहु झाली माय धांवोनि आली —द. स्व.
**गजबजोनि** घनध्वनि भैरवें —ग. मो.

(६) **कठिण समय** येतां कोण कामास येतो ?—द. स्व.
तसेही गेले कीं **विषम समयीं** सोडुनि कसें ?—ग. मो.

या काव्याविषयीं तो स्वतः ‘ होय शृंगारा करुण रसा थारा ’ असें म्हणतो. पण वस्तुतः त्यांत शृंगार बेताचाच असून नल हा द्यूतांत राज्य गमावून वनांत दमयंतीचा एका अर्धवस्त्रानिशीं त्याग करतो हा जो अत्युत्कट हृदयस्पर्शी प्रसंग आहे, त्याचा तर मागमूससुद्धां नाहीं. यावरून संपूर्ण काव्य रचण्याइतपत त्याच्या प्रतिभेंत चिकाटी नसावी असें वाटतें. तेव्हां त्याची प्रतिभा खंड पावणारी होती असें विधान केल्यास तें चुकूं नये असें वाटतें. असो.

रघुनाथ पंडिताच्या व्यक्तित्वाविषयीं व वाङमयाविषयीं मला जे चार विचार सुचले ते येथें मांडले आहेत. ते सर्वांना पटलेच पाहिजेत असा आग्रह नाहीं. संशोधनाची वालुकामय इमारत ही उपलब्ध असलेल्या तुटक्या-फुटक्या साधनांच्या वाहत्या वाऱ्यांत, सहज सुचलेल्या तर्कांच्या पोकळ पायावर उठवावयाची असते. तेव्हां ती अवचित ढांसळून पडल्यास रचनाकाराला दुःख होण्याचें कारण नाहीं.

—प्रतिभा, १५ जून १९३६

• • •

# ९

# चंडीदास
# व
# विद्यापति

कलकत्ता येथील विख्यात न्यू थिएटर्सच्या रजतपटावर पुष्कळांनीं चंडीदास व विद्यापति यांचीं चालतीं बोलतीं चित्रें सहगल व संन्याल यांच्या स्वरूपांत पाहिलीं असतील. रामी रजकीच्या स्वरूपांतील उमाशशीच्या स्वभावसुंदर अभिनयानें अनेकांचे डोळे निवले असतील आणि अनुराधेच्या स्वरूपांतील काननबालेच्या किन्नरकंठानें कित्येकांचे कान तृप्त झाले असतील. या दोघां वंगवागीशांच्या चित्रपटांइतपतच त्यांचीं काव्यें-हि मनोरम आहेत. तीं वाचतां वाचतां अथवा ऐकतां ऐकतां भाविक रसिक मंत्रमुग्ध झाल्याविना रहात नाहींत. सरसरमणीयतेंत या दोघांचें गीतगोविंदाचा कर्ता जयदेव याच्याशीं विलक्षण साम्य आहे. यामुळेंच

**जय जय देव कवि नृपति शिरोमणि विद्यापति रसधाम।**
**जय जय चंडीदास रसशेखर अखिल भुवने अनुपाम॥**

या दोन ओळीं बंगाल-विहारांत सर्वप्रसिद्ध झाल्या आहेत.

## चंडीदास

वीरभूमि जिल्ह्यांतील छटनागांव चंडीदासाची जन्मभूमि होय. परंतु बोलपुराच्या अग्नयेस दहा मैलांवर नन्नुरा गांव आहे. तेथें तो लहानपणापासून रहात होता. तेथील बाकुली देवीच्या मंदिराचें पुजारीपण त्याच्याकडे आलें होतें. त्या गांवीं त्याच्या राहत्या घराचें भग्नावशेष अजून दृष्टीस

पडतात. देवीच्या मोडक्या तोडक्या देवालयाचा जीर्णोद्धार झाला असून सध्यां तें नवीन स्वरूपांत विद्यमान आहे.

### त्याचा प्रेमवेडेपणा

चंडीदास प्रेमवेडा होता. एखादा पुरुष तऱ्हेवाईक व चमत्कारिक स्वभावाचा असल्यास त्यास अद्यापि पूर्वबंगालांत 'पगलाचंडी' असें म्हणण्याची वहिवाट आहे. रामी नांवाच्या परिटीणीवर चंडीदासाचें प्रेम होतें. लोकनिंदेंकडे दुर्लक्ष करून त्यानें तिच्यावरील आपलें प्रेम आमरण टिकविलें. हें प्रेम विमल, विशुद्ध व वासनारहित होतें.

### त्यासंबंधींची आख्यायिका

रामीवरील त्याच्या प्रेमासंबंधींची एक अद्‌भुत आख्यायिका प्रचलित आहे. एकदां मासोळी आणण्यासाठीं चंडीदास हाटांत गेला असतांना कोळिणीनें ज्या भावानें त्यास मासोळी विकत दिली होती, त्यापेक्षां स्वस्त भावानें ती एका दुसऱ्या गिऱ्हाईकास विकली. हें पाहून चंडीदासास आश्चर्य वाटलें व त्यानें कोळिणीस तसा पक्षपात करण्याचें कारण विचारलें. त्यावर तिनें लाजत मुरकत हंसून उत्तर दिलें, "तुझ्याहून त्याची गोष्ट अगदीं वेगळी आहे. माझे त्याच्यावर व त्याचें माझ्यावर प्रेम आहे. हें ऐकतांच चंडीदास गप्प झाला व विचार करूं लागला. त्याच दिवशीं अचानक त्याची रामीशीं गांठ पडली. त्या युवतीच्या प्रेमपाशांत तो नकळत गोंवला गेला. याचा परिणाम असा झाला कीं मंदिरांतील कामकाजांची त्यांच्याकडून हेळसांड होऊं लागली. रामीच्या प्रणयाराधनांत त्याचा सर्व वेळ व्यतीत होऊं लागला.

### त्याच्यावरला बहिष्कार

त्यावेळच्या कट्टर ब्राह्मण समाजास हा उजळमाथ्याचा प्रेमसंबंध आवडणें अशक्य होतें. त्यांनीं चंडीदासावर बहिष्कार पुकारला. तेव्हां चंडीदासाचा बंधु नकुल त्याच्या सहाय्यास धावून आला. त्यानें चंडीदासास पंक्तिपावन करून घेण्याची खटपट केली. चंडीदासानें रामीवरील प्रेमाचा त्याग करावा आणि ठरेल तो ज्ञातिदंड भरावा अशा दोन अटी घालण्यांत आल्या.

याप्रमाणें चंडीदासास ज्ञातिप्रवेश मिळण्याची सोय झाली. परंतु ही वार्ता रामीच्या कानीं पोंचतांच ती अत्यंत व्याकुळ झाली व लोकलज्जेची तमा न बाळगतां सर्वांसमक्ष चंडीदासापुढें येऊन उभी राहिली. आपल्या हृदयेश्वरीला प्रत्यक्ष पाहतांच चंडीदासाचें भान हरपलें व त्याच्या बंधूचा सर्व खटाटोप अगदीं फुकट गेला. त्याप्रसंगीं रामीच्या रूपांत प्रकट होऊन कालीमातेनें अनेकांना दर्शन दिलें अशी एक दंतकथा बंगालांत प्रसिद्ध आहे.

**त्याचा शोकजनक अंत**

चंडीदास ब्राह्मण होता व रामी रजकी होती. परंतु त्यांचें परस्परांवरील प्रेम निःस्वार्थ व उदात्त होतें. प्रेमाच्या पवित्र साम्राज्यांत जातगोत, उच्चनीच इत्यादि भेदभावांना थारा नसतो हें त्यांनीं आपल्या चरित्राच्या द्वारें लोक-निदर्शनांस आणलें.

चंडीदासाचा अंत मात्र अत्यंत करुण व शोकजनक परिस्थितींत घडून आला. किर्णहार नांवाच्या गांवांत आपल्या एका स्नेह्याच्या घरी प्रेमगीतें आळवत असतांना एकाएकीं वरील छप्पर अंगावर कोसळलें व त्याच्या भाराखाली चंडीदासाच्या पार्थिवतेचा लय झाला.

**विद्यापति**

चवदाव्या शतकाच्या अंतीं विद्यापतीचा जन्म झाला व पंधराव्या शतकाच्या अखेरपर्यंत तो विद्यमान होता. त्याचे पूर्वज विद्यासंपन्न व शुद्धशील होते. मिथिलाधिपतीच्या राजसभेंत त्यांचा मोठा आदर असे. वीरेश्वर पद्धतीचा कर्ता वीरेश्वरदत्त हा विद्यापतीचा पणजा होय. त्याचा आजा जयदत्त संस्कृतज्ञ होता. सच्चारित्र्य व धार्मिकता या गुणामुळें त्यास योगेश्वर पदवीचा लाभ झाला होता. त्याच्या पित्याचें नांव गणपति ठाकुर होतें.

**त्याचा राजाश्रय**

विद्यापति मैथिली ब्राह्मण असून पंचगौडाधिप शिवसिंहाचा आश्रित होता. शिवसिंहानें त्यास बिस्की गांव दान दिला होता. शिवसिंहाची पत्नी महाराणी लक्ष्मीदेवी इची विद्यापतीवर कृपादृष्टि असे.

## त्याची चंडीदासाशीं भेट

विद्यापतीस चंडीदासाची कविता अतिशय आवडत असे. याकरितां त्यानें एकवेळां मुद्दाम चंडीदासाची भेट घेतली होती. एकमेकांच्या प्रेम-विषयक कविता ऐकण्यांत या दोघा वागीशांचा वेळ खरोखर अत्यंत आनंदांत व सुखांत गेला असेल. चंडीदासाच्या प्रखर प्रतिमेचा विद्यापतीवर विलक्षण प्रभाव पडला अशी प्रसिद्धी आहे. विद्यापतीच्या काव्यांत त्याचे समकालीन शांतिपुराचे वैष्णव महर्षि अद्वैताचार्य, गयासुद्दीन, नासिरशहा इत्यादिकांचे उल्लेख आहेत.

## त्यांचें संस्कृत साहित्य व बंगाली गाणीं

संस्कृतज्ञ या नात्यानें मैथिली महासभेंत विद्यापतीस मान होता. पुरुषपरीक्षा, कीर्तिलता इत्यादि आठ संस्कृत ग्रंथ आज त्याच्या नांवावर उपलब्ध आहेत. परंतु आपल्या देशी भावगीतामुळेंच तो बहुजन समाजाच्या ओळखीचा आहे. त्यानें जवळजवळ आठशें गाणीं रचलीं असून बंगाल-बिहारांत त्यांचा प्रसार फार आहे.

## दोघांच्या काव्यांतील साम्य

चंडीदास व विद्यापति समकालीन असून दोघेही वैष्णव सांप्रदायी कवि होते. दोघांनीही राधाकृष्णांच्या विशुद्ध भक्तीवर कविता लिहिली असून तिच्यांत पूर्वराग, दौत्य, अभिसार, संभोग, मीलन, माधुर्य, भावसंमीलन आदि शृंगाराचे सर्व प्रकार अंतर्गत झाले आहेत. कृष्ण हा वैष्णवांचा आराध्य देव आहे. तो ईश्वराचा अवतार आहे. तो परमात्मा आहे. राधा जीवात्मा आहे. वात्सल्य, सख्य, दास्य, शांत आदि निरनिराळ्या प्रेमभावांत वैष्णवांना ईश्वराच्या विभूतीचा साक्षात्कार होत असतो. या सर्वांत मधुरभाव अर्थात् स्त्रीपुरुषप्रेम उत्कट व उत्कृष्ट आहे. त्याद्वारें ईश्वराच्या संपूर्ण स्वरूपाची प्रतीति पटते. हाच मधुरभाव चंडीदास व विद्यापति यांच्या काव्याचा विषय आहे. वंग-वाङमयांत या दोघांचेंही स्थान महान असून दोघेही सारखेंच लोकप्रिय आहेत.

## दोघांच्या काव्यांतील विरोध

### चंडीदासाचें काव्य

चंडीदासाचें काव्य प्रकृतिप्रेरित आहे, स्वयंस्फूर्त आहे. त्यांत त्याच्या हृदयाच्या आंतरिक भावनांचे उद्‌गार प्रकट झाले आहेत. त्यावर कृत्रिमतेचें कीट नाहीं कीं परिश्रमाचें पुट नाहीं. त्यांत मनुष्याच्या सर्व मनोभावनांचें उठावदार चित्र उमटलें आहे. निरोप देण्याच्या वेळेची विरहव्यथा, चोरटचा भेटीगांठी, त्या घेण्यासाठीं योजलेल्या युक्त्याप्रयुक्त्या इत्यादि प्रसंगांचें साधें व सरळ वर्णन त्यांत पाहण्यास सांपडतें. अगदीं सोप्या शब्दांत कवीनें गहनगूढ भाव व्यक्त केलेले पाहून वाचकांस त्याच्या दिव्य प्रतिभेचा अचंबा वाटतो. चंडीदासाच्या पद्याची ओळन् ओळ मनाच्या डोळयांपुढें एक एक स्वयंपूर्ण चित्र उभें करते. त्यांत अंधुकपणा नांवालाहि नसतो. तें स्पष्ट असतें हें विशेष होय. त्यांत मानवांना आपल्या भावनांचें प्रतिबिंब दिसतें. आपल्या वर्णनांत चंडीदास कुठेंही अलंकारांचा आश्रय घेत नाहीं हा त्याचा दुसरा विशेष आहे. प्राचीन कवींनीं हाताळलेलें ठराविक ठशांचे अलंकार व संकेत तो उपयोगांत आणत नाहीं. त्याचीं वर्णनें सरळ व सुगम आहेत. तीं भावनेच्या पायावर अधिष्ठित आहेत. त्यांच्यांतला जिव्हाळा जिवाला भिडणारा आहे. या स्वाभाविक सौंदर्यामुळें चंडीदास बंगाली वाङ्मयांत अजरामर झाला आहे. वानगीदाखल त्याच्या दोन कलाकृति पहा. एकींत निरोप घेण्याच्या वेळेची वेदना व्यक्त झाली आहे व दुसरींत रामीवरील विशुद्ध प्रेम व्यक्त झालें आहे :—

### प्रभाती

आमि जाई आमि जाई बले तिन बोल
　　कतना चुंबन देई कत बार कोल।
करे कर धरि कए शपथि देय मोरे
　　पुन दरशन लागि कत चाटु बोले।

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
ग्रंथांक ........................ नों दि ....................


पद आध जाय प्रिया चाय पालटिया
बदन निरखे कत कातर हइया।
पिया पीरिती हियाय जागिया रहिल
चंडीदासे कहे से कुलशील गेल।

'मी जातों, मी जातों असें तीन तीनदां सांगून किती वेळां तरीं चुंबन घेतो व किती वेळां तरी आलिंगन देतो. हातावर हात ठेऊन कितीदां तरी शपथा खातो आणि मी पुनः भेटावें म्हणून आर्जवें करतो. एक दोन पावलें पुढें चालून पुनः मागें परततो व प्रियेकडे टकमक टकमक पाहूं लागतो. अत्यंत केविलवाणा होऊन तोंडाकडे पाहूं लागतो. प्रियेवरलें प्रेम हृदयांत जागृत होतें. चंडीदास म्हणतो कीं आतां तें कुलशील गेलें.'

### रामीप्रत

एक निवेदन करि पुन पुन
शुन रजकिनि रामि!
युगल चरण शीतल देखिया
शरण लइलाम आमि॥
रजकिनी रूप किशोरी स्वरूप
काम गंध नाहि ताय
ना देखिले मन करे उचाटन
देखिले पराण जुडाय॥
तुम रजकिनी आमार रमणी
तुमि हओ मातृपितृ
त्रिसंध्या याजन तो मारि भजन
तुमि वेदमाता गायत्री॥
तुमि वाग्बादिनी हरेर धरणी
तुमिसे गलार हारा
तुमि स्वर्ग मर्त्य पाताल पर्ब्बत
तुमिसे नयनेर तारा॥

तुमा बिना मोर सकल आँधार
देखिले जुडाय आखि
ये दिने ना देखि ओ चाँद बदन
मरमे मरिया थाकि ॥
ओ रूपमाधुरी पासरिते नारि
कि दिये करिब बश
तुमिसे तंत्र तुमिसे मंत्र
तुमि उपासना रस ॥
भेबे देख मने ए तिन भुवने
के आछे आमार आर
बाशुली आदेशे कहे चंडिदासे
धोपानिचरण सार ॥

'अगे रामी परिटीणी, ऐक, मी एक गोष्ट तुला वारंवार सांगत आहे. तुझे शीतल चरण पाहून मी त्यांना शरण आलों आहे. हे परिटीणी, तुझें हें रूप किशोरीस्वरूप आहे. यांत कामुकतेचा गंधही नाहीं. तुझें हें रूप दिसलें नाहीं तर हृदय तळमळतें. परंतु तें दिसलें कीं हृदय गारीगार होतें. तूं माता आहेस, तूं पिता आहेस, तूंच माझी सर्वस्व आहेस. प्रातः-मध्याह्न आणि सायं या तीनही संध्यासमयीं मी तुझीच उपासना करतों आणि रात्रंदिवस तुझेंच भजन करतों. तूं वेदमाता गायत्री आहेस, तूं सरस्वती आहेस, तूं गौरी आहेस. स्वर्ग, मृत्यु, आकाश, पाताळ आणि पर्वत आदि सर्व कांहीं तूंच आहेस. तूं माझ्या गळयांतली माळा आणि डोळयांतील तारका आहेस. तूं नसलीस म्हणजे मला सर्वत्र अंधारच अंधार भासमान होतो. परंतु तूं दिसतांच डोळे थंडगार होतात. ज्या दिवशीं मला तुझें चंद्रासारखें वदन दिसत नाहीं, त्या दिवशीं माझ्या अंतरात्म्यास फार फार दुःख होतें. मला तुझ्या या रूपमाधुर्याचें पान निरंतर करतां येत नाहीं. हें मी कसें प्राप्त करूं? तूंच तंत्र आहेस, तूंच मंत्र आहेस आणि तूंच उपासनापात्र आहेस. तूंच थोडासा विचार करून बघ. तुझ्याशिवाय माझें या तीनही जगांत

कोण आहे बरे ? चंडीदास म्हणतों कीं या परिटीणीचे पायच माझें सर्वस्व आहे.'

### विद्यापतीचें काव्य

चंडीदासाच्या कवितेपेक्षां विद्यापतीची कविता जरा वेगळ्या प्रकारची आहे. तिच्यांत कल्पनांच्या भराऱ्या आहेत, अलंकारांचे चमत्कार आहेत व शब्दांचे खेळ आहेत. ती मधुर, सरस व चित्ताकर्षक आहे यांत शंका नाहीं. परंतु चंडीदासाच्या कृतीइतपत ती स्वभावसिद्ध नाहीं. साधारण रसिक विद्यापतीच्या कृतीनें आश्चर्यचकित होईल. त्याचें सुंदर शब्दशिल्प व कमनीय कल्पनाकौशल्य त्यास भुरळ पाडील. परंतु चंडीदासाच्या काव्यांत अतिशय सूक्ष्म व अतींद्रिय भावनांचें जें प्रकटीकरण आढळतें, त्याच्याशीं तुलना केल्यास खऱ्या रसिकांस विद्यापतींत न्यूनत्व दिसेल. विद्यापतींत चातुर्य अधिक आहे व प्रतिभा कमी आहे. भावाभिव्यक्तींत तो कुठें कुठें चंडीदासाची बरोबरी करतो. परंतु तो त्याचा विशेष नाहीं. विद्यापतीच्या आरंभिक काव्यांत इंद्रियलिप्सा अधिक आहे. त्यांची सजावट अलंकारांच्या द्वारें झाली आहे. परंतु ते योजतांना विद्यापतीनें नाविन्य व चातुर्य दाखविलें आहे हें कबूल केलें पाहिजे. या गुणामुळेंच जुन्यापुराण्या अलंकारांचा उपयोग करूनही त्याचें काव्य नवीन उतरलें आहे. विद्यापतींत आध्यात्म मुळीं नाहींच असें नाहीं. परंतु इंद्रियलिप्सेच्या मानानें त्याची मात्रा कमी आहे एवढेंच.

पुढील अवतरणांवरून विद्यापतीच्या काव्यशक्तीचे प्रत्यंतर पटेल. एकांत सजीव शब्दांत ओलेतीचें चित्र रेखाटलें आहे. दुसऱ्यांत सौंदर्याच्या सदेह स्वप्नास शब्दाचें रूप दिलें आहे :—

**ओलेती**

आजु मझु शुभ दिन भेला
कामिनी पेखल सनानक भेला।
चिकुर गलय जलधारा
मेह बरिस जनि मोतिय हारा।

वदन पोछल परचूरे
माजि धएल जनि कनक मुकूरे।
तेइ उदसल कुच जोरा
पलटि वैसा ओल कनक कटोरा।
नीविबंध करल उदेस
विद्यापति कह मनोरथ शेस।

'आज शुभ दिवस उगवला. कारण मी कामिनीस अंग धुतांना पाहिलं. तिच्या केसांवरून जलधार ओघळत होती. जणुं पाऊस मोत्यांचे हार वरसत होता. जेव्हां ती अंग पुसूं लागली, तेव्हां असें वाटलें कीं, जणु कांहीं सुवर्णाचा दर्पण स्वच्छ करून समोर ठेवला आहे. त्यावेळीं कुचही उजेडांत आले. सोन्याच्या वाटचा पालथ्या ठेवाव्या त्याप्रमाणें ते वाटत होते. शेवटीं निरगांठही सुटली. विद्यापति म्हणतो कीं मनोरथ पूर्ण झालें.'

## सदेह सौंदर्यस्वप्न

जहाँ जहाँ पदयुग धरइ
तँहि तँहि सरोरुह भरइ।
जहाँ जहाँ झलकत अङ्ग
तँहि तँहि बिजुरी तरङ्ग।
की हेरल अपरुब गोरि
पैठल हिय माहा मोरि।
जहाँ लहुहास संचार
तँहि तँहि अमिय बिकार।
हेर इते से धनि थोर
अव तिन भुवन अगोर।
विद्यापति कह जानि
तुय गुणे देयव आनि

'ही सुंदरी जेथें जेथें आपले पाय ठेवते, तेथें तेथें कमलें उमलतात. जेथें जेथें तिचे अवयव झळकतात, तेथें तेथें बीज लवून लखलखते. त्या अनुपम सुंदरीस मी पाहिलें कसचें! ती तर माझ्या हृदयांतच प्रविष्ट झाली ती ज्या दिशेकडे स्मित करते, त्या दिशेस अमृताची वृष्टि होते. दिसण्यांत ती बाला लहान आहे. परंतु तिनें तीनही भुवनें व्यापून टाकलीं आहेत. (अर्थात् ज्या ज्या बाजूस माझी दृष्टि वळते, त्या त्या बाजूस मला तिचीच मूर्ति दिसते.) विद्यापति म्हणतो कीं, तुम्हांत सुद्धां असेच गुण आहेत म्हणून तुमच्याशीं मी तिची गांठ घालून देईन.'

## सारांश

सारांश, चंडीदास स्वयंसिद्ध कवि आहे, तर विद्यापति सावध कलाकार व विज्ञ पंडित आहे. चंडीदास पृथ्वीपासून दूर अंतराळांत संचार करणारा विहंगम आहे. तर विद्यापति पृथ्वीवरच भ्रमण करणारा आहे. मात्र क्वचित् तो उंच उड्डाण करून चंडीदासाला गांठण्याचा प्रयत्न करतो यांत कांहीं संशय नाहीं.

—कला. मे १९३९

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम.......................... वि: ....
क्रमांक .......................... नों. दि
REFBK-0011563
REFBK-0011563
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ११५६३

नवीं
नागविदर्भ
प्रकाशनें

वसंत फार दूर नाही !
अंबादास अग्निहोत्री

निवारा
शांताराम

राजपुत्र
वसंत वरखेडकर

वनवासी फूल
ना. वा. टिळक

आपलें मुके मित्र
दे. ना. टिळक

पतंग-प्रीत
म. वि. कुळकर्णी

वासवदत्ता
दे. गो. उदापुरे

बडबडमामा
लीलावती भागवत

मडकोबा
भा. रा. भागवत

व्हराड्-माती
शरश्चंद्र

ज्ञानासमवेत
मनोरंजन
साधणारी पुस्तकें